संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
२९ जानेवारी २०२२
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४४)



नरहर कुरुंदकर : आठवणीतले बाबा
तेजस्विनी देव

## गांधीजींच्या कार्यपद्धतींमागचे विज्ञान

डॉ. अभय बंग



२०१४ नंतरच्या प्रत्येक निवडणुकीत
मी भाजपविरोधी काम केले!
प्रशांत किशोर





उद्याच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास!
MS-CIT मध्ये आता शिका
चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Big Data
Augmented Reality
Machine Learning
Virtual Reality
Artificial Intelligence
Internet of Things
Robotics
3D Printing
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
Tally Prime with GST
Advanced Excel
Digital Freelancing
C & C++ Programming
DTP Corel & Photoshop
Mobile Apps Development
Coding
IT Hardware & Networking
Retail Management
Internet of Things (IoT)
BFSI
IT for Teachers
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
MKCL
कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी स्पेशल बॅच !
नव्या वर्षात आजच प्रवेश घ्या डिजिटल करियरच्या जगात !
अधिक माहितीसाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा. 8956537496

# अनुक्रम

Follow us :
weeklysadhana.in
facebook.com/weeklysadhana/
twitter.com/WeeklySadhana
YouTube/WeeklySadhana

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
२९ जानेवारी २०२२
वर्ष ७४ / अंक - २४

संपादक :
**विनोद शिरसाठ**
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001**, **बँक ऑफ महाराष्ट्र**, बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)



४
संपादकीय
**जिरायती प्रकाशक आणि बागायती प्रकाशक**



७
**२०१४ नंतरच्या प्रत्येक निवडणुकीत मी भाजपविरोधी काम केले!**
**प्रशांत किशोर**
संवादक : शेखर गुप्ता व नीलम पांडे



१९
**नरहर कुरुंदकर : आठवणीतले बाबा**
तेजस्विनी देव



२९
**गांधीजींच्या कार्यपद्धतींमागचे विज्ञान**
डॉ. अभय बंग

या अंकात तीन दीर्घ लेख आहेत. पहिल्याला निमित्त २६ जानेवारी- प्रजासत्ताक दिनाचे, दुसऱ्याला निमित्त १० फेब्रुवारी- कुरुंदकरांच्या स्मृतिदिनाचे, तिसऱ्याला निमित्त- गांधीजींच्या स्मृतिदिनाचे.

०

मुखपृष्ठावरील छायाचित्र : १९३८ मध्ये सेवाग्राम आश्रमात आंतरराष्ट्रीय फोनकॉल सुविधा केली तेव्हाचे...

संपादकीय

# जिरायती प्रकाशक आणि बागायती प्रकाशक

गेल्या आठवड्यात मराठी ग्रंथ प्रकाशनाच्या क्षेत्रात विशेष दु:खदायक म्हणावेत असे दोन मृत्यू झाले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक-प्रकाशक सुनील मेहता यांचे १३ जानेवारीला निधन झाले आणि त्यानंतर तीनच दिवसांनी पद्मगंधा प्रकाशनाचे संस्थापक-संचालक अरुण जाखडे यांचे निधन झाले. त्यातील मेहता हे वयाने साठीच्या आतच होते आणि जाखडे यांनी नुकतीच पासष्टी ओलांडली होती. दोघेही इतके कार्यक्षम व कर्तृत्ववान होते की, आणखी एक-दोन दशके चांगले कार्यरत राहू शकले असते आणि त्यांच्याकडून उत्तमोत्तम अशी हजार-दोन हजार तरी पुस्तके सहज प्रकाशित होऊ शकली असती. कारण दोघेही आता पूर्ण आत्मविश्वासाने घोडदौड करीत होते, महत्त्वाचे म्हणजे राज्य व राष्ट्रीय स्तरांवरील ग्रंथव्यवहाराची नस त्यांना सापडली होती. आणखी विशेष हे की, त्या दोघांच्या वृत्ती, अभिरूची, कार्यपद्धती आणि ध्येयधोरणे यात बरीच तफावत होती; तरीही त्यांची वाटचाल परस्परांना पूरक व मराठी ग्रंथव्यवहाराला पुढे घेऊन जाणारीच होती, त्या दोघांच्या वाटचालीवर ओझरता दृष्टिक्षेप टाकला तरी हे स्पष्ट होईल.

सुनील मेहता हे १९८७ पासून प्रकाशन व्यवसाय करीत होते, मात्र मेहता प्रकाशनाची स्थापना त्यांचे वडील अनिल मेहता यांनी त्याच्या दहा वर्षे आधीच केली होती. अर्थात, ग्रंथविक्रेते म्हणून कोल्हापूरात दीर्घकाळ काम केल्यानंतर अनिल मेहता यांनी प्रकाशनसंस्था सुरू केली होती आणि पहिल्या दशकात कमी पुस्तके प्रकाशित केली असली तरी मेहता प्रकाशनाची चांगली ओळख निर्माण केली होती. मात्र सुनील मेहता यांनी सूत्रे हातात घेतली आणि पुढील साडेतीन दशकांत मेहता पब्लिशिंग हाऊसला मराठी प्रकाशन व्यवसायात अव्वल स्थानावर घेऊन जाण्याइतपत मजल मारली. या काळात त्यांनी लहान-मोठी अशी साडेतीन हजार पुस्तके प्रकाशित केली. म्हणजे वर्षाला कमीत कमी शंभर आणि आठवड्यात दोन असे ते प्रमाण आहे. यात प्रामुख्याने इंग्रजीतून मराठीत आणि हिंदी, कन्नड, बंगाली इत्यादी भारतीय भाषांतून मराठीत आणलेली पुस्तके अर्ध्याहून अधिक असतील. उर्वरित पुस्तके मराठीतील नव्या-जुन्या साहित्यिकांची आहेत. दर्जेदार निर्मिती, वितरणाचे मोठे जाळे, मोठ्या जाहिराती आणि आक्रमक पद्धतीने मार्केटिंग ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये राहिली आहेत. राष्ट्रीय स्तरावरील अनेक दिग्गज नेत्यांची चरित्रे वा आत्मचरित्रे, आंतरराष्ट्रीय स्तरावरील नोबेल व अन्य पुरस्कार विजेत्यांची पुस्तके धडाकेबाज पद्धतीने त्यांनी मराठीत आणली. त्याशिवाय भारतातील सुधा मूर्ती यांच्यापासून गुलजार यांच्यापर्यंतच्या अनेक लेखकांची पुस्तकेही मराठीत आणली. मराठीतील व्यंकटेश माडगूळकर ते विश्वास पाटील या दरम्यानच्या लेखकांची यादीही खूप मोठी सांगता येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक दिग्गजांना पुण्यात आणून वाचक-लेखक संवाद घडवणे हे काम आज तुलनेने सोपे झाले असले तरी, सुनील मेहता यांनी त्याचा





प्रारंभ दोन दशकांपूर्वी केला तेव्हा त्याची अपूर्वाई खूप जास्त होती. शिवाय इ-बुक हा प्रकारही जेव्हा मराठी वाचकांना केवळ ऐकून माहीत होता आणि मराठीतील बहुतेक सर्व प्रकाशक त्याकडे उदासीनतेने किंवा तुच्छतेने पाहत होते तेव्हा, म्हणजे २०१३ मध्येच सुनील मेहता यांनी त्यांची दोनेक हजार पुस्तके इ-बुक स्वरूपात आणली होती. गेल्या वर्षी कोविड काळात आठ-दहा महिने प्रकाशन व्यवहार ठप्प होता तेव्हा त्या इ-बुक्सच्या विक्रीत दोनशे ते तीनशे पटीने वाढ झाली, तेव्हा त्यांची 'व्हिजन' काय प्रकारची होती याचा प्रत्यय आला. मेहता यांनी देश-विदेशातील किती लेखकांशी, प्रकाशकांशी, अनुवादकांशी संपर्क-संवाद ठेवला याचा विचार केला तर आचंबित व्हावे लागते. हे सर्व करायचे तर आर्थिक व्यवहार तेवढेच चोख व प्रवाही ठेवावे लागतात आणि ती कसरत सतत करावी लागते.

अरुण जाखडे यांची प्रकाशकीय वाटचाल अगदी वेगळ्या पद्धतीने झाली. अहमदनगर जिल्ह्यातून पुणे शहरात ते आले एका कंपनीत नोकरी करण्यासाठी. शेतकरी कुटुंबातून आलेले व विज्ञानाचे पदवीधर असल्याने त्यांचा साहित्याशी थेट संबंध कमीच आला. पण वाचन-लेखनाची आवड जोपासत गेल्यावर, कंपनीतील कामगारांसोबत काही कृती-कार्यक्रम सुरू झाले आणि त्यातून पद्मगंधा दिवाळी अंक व पद्मगंधा प्रकाशन यांचा जन्म झाला. अगदीच नवख्या किंवा रूढ अर्थाने लेखक म्हणता येणार नाही अशांचे लेखन प्रकाशित करण्याचे काम त्यांनी १९८८ नंतरची पाच-सात वर्षे केले. आणि त्यानंतर मात्र अभिजात साहित्य, समीक्षा, गंभीर, वैचारिक लेखन यासाठी पद्मगंधा प्रकाशन क्रमाक्रमाने लहान-मोठे प्रकल्प राबवत राहिले. त्यांनी साडेतीन दशकांच्या वाटचालीत साडेसातशे पुस्तके प्रकाशित केली. म्हणजे वर्षाला २५ आणि महिन्याला दोन असे ते प्रमाण दिसते. पण त्यांनी हाताळलेले लेखक व विषय यावर नजर टाकली आणि त्यांची एकहाती काम करण्याची शैली लक्षात घेतली तर हे प्रमाण निश्चितच कमी नाही. रा.चिं.ढेरे, गणेश देवी अशा अभ्यासक संशोधकांची लोकसाहित्य व भाषा या विषयांवरील मोठी पुस्तके काढणे आणि ती सर्वदूर पोहोचवणे हे सोपे काम नव्हते. शिवाय, र.धो.कर्वेपासून आगाथा ख्रिस्ती यांच्यापर्यंतचे मोठे प्रकल्प मार्गी लावणे हे खूप जिकिरीचे काम होते. अनुवादाच्या क्षेत्रांतही त्यांनी काही महत्त्वपूर्ण पुस्तके आणली. पाऊलो कोएलोची ओळख पहिल्यांदा मराठीला झाली ती पद्मगंधामुळेच आणि सिमोन द बोव्हुआर यांचे 'सेकंड सेक्स' किंवा हिलरी क्लिंटन यांचे आत्मचरित्र ही अशी यादीही खूप मोठी आहे. अरुण जाखडे यांचे

वर्तन व व्यवहार हे वरवर पाहता जुन्या पठडीतील जाणवत असे, पण आतून पाहिले तर ते बराच पुढचा विचार करीत असत हे त्यांना लक्षात येत असे. अन्यथा दिल्लीतील जागतिक पुस्तक मेळाव्यांना भेटी देणे आणि ग्रंथविक्री व ग्रंथनिर्मितीसाठी नवनवे प्रस्ताव पुढे आले तर त्याला उत्साहाने प्रतिसाद देणे हे त्यांना शक्य झालेच नसते.

सुनील मेहता आणि अरुण जाखडे यांचे योगदान नीट समजून घ्यायचे असेल तर सर्वप्रथम त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांची सूची नजरेखालून घालायला हवी. नंतर त्यांतील लेखक आणि त्या पुस्तकांचे आशय-विषय किती विविध व सखोल आहेत हे समजून घ्यायला हवे. त्यानंतर ही पुस्तके महाराष्ट्रातील व राज्याच्या बाहेरील किती संस्था, संघटना, विद्यापीठे यांना कशी उपयुक्त ठरली याचा तपास करायला हवा. आणि मग किती प्रकारचे वाचक, लेखक, अभ्यासक, संशोधक यांना ही पुस्तके उपयुक्त ठरली यांचा शोध घ्यायला हवा. त्यानंतर त्यांनी किती विविध लेखक, अनुवादक मराठीत नव्याने आणले किंवा नावारूपाला आणले याची उजळणी करायला हवी. शेवटी किती प्रकारचे विषय, लेखनप्रकार पहिल्यांदा मराठीत आणून किंवा पुन्हा पुन्हा आणून किती नवी दालने खुली केली किंवा समृद्ध केली याचाही शोध घ्यायला हवा. अशा पद्धतीने व टप्प्याटप्प्याने फक्त तपशील उभे केले आणि त्यांची नीट जुळवणी केली तर कोणीही जाणकार माणूस थक्क होऊन जाईल. या दोन्ही प्रकाशनसंस्थांच्या वाटचालीत अनेक घटकांचा सहभाग होता, म्हणूनच इतके होऊ शकले हे खरे; पण त्यांच्या मागची दूरदृष्टी, कल्पकता व अथक मेहनत या दोघांची होती हे निर्विवाद!

त्यामुळे त्यांचे हे काम कोणत्याही चांगल्या व मोठ्या साप्ताहिकाने, दैनिकाने, शिक्षणसंस्थेने केलेल्या कामाइतकेच किंबहुना जास्त तोलामोलाचे आहे असेच म्हणावे लागेल. मात्र तशी मान्यता किंवा प्रतिष्ठा या दोघांना आणि असे काम करणाऱ्या अन्य प्रकाशकांनाही मिळत नाही. याचे कारण 'प्रकाशन' व्यवहाराकडे पाहण्याचा आपल्या समाजाचा दृष्टिकोन पुरेसा विकसित झालेला नाही. अनेक वेळा तर बराच सदोष असतो. याचे कारण लेखक व वाचक या दोन्ही वर्गात प्रकाशन व्यवसायाबाबत अद्याप बरेच अज्ञान, गैरसमज आहेत. किंबहुना निरक्षरता आहे असे म्हणावे लागेल. मुळात प्रकाशन चालवणे म्हणजे वाचक, लेखक, अनुवादक, संपादक, मुद्रित शोधक, चित्रकार-मुखपृष्ठकार, मुद्रक, बाईंडर, जाहिराती इत्यादी अनेक घटकांची मोट बांधावी लागते. यातील प्रत्येक घटकाच्या कमी-अधिक लहरी सांभाळणे, अव्यवस्थितपणा अनुभवणे, अनेक घटकांमध्ये सातत्याचा व परिपूर्णतेचा अभाव असणे हे सर्वच प्रकाशकांच्या वाट्याला कमी-अधिक प्रमाणात येतेच. आणि ते करताना नवनिर्मितीचा आनंद व व्यवहाराची गणिते जुळवण्याची धाकधूक अशी संमिश्र भावना सतत मनात बाळगावी लागते. कारण एवढे करूनही प्रकाशन व्यवसाय १० ते २० टक्के यापेक्षा अधिक परतावा देऊ शकत नाही. त्यातील काही पुस्तकेच नफा देतात, काही पुस्तके भरपूर तोटाही देतात. शिवाय प्रकाशकाने स्वत: खर्च केलेला वेळ, ऊर्जा व श्रम लक्षात घेतले तर बहुतांश वेळा तो आतबट्ट्याचाच व्यवहार असतो. त्यामुळे एका मर्यादित अर्थाने प्रकाशन व्यवहार हा शेती करण्यासारखाच प्रकार असतो. अर्थातच, जिरायती व बागायती शेतीत जेवढा फरक असतो तो इथेही असतोच. आणि म्हणून तसा विचार केला तर अरुण जाखडे हे जिरायती तर सुनील मेहता हे बागायती शेती करीत होते, असे म्हणावे लागते. पण मूलत: ते दोघेही शेतकरीच होते हे लक्षात घ्यावे लागेल.

एक चांगली गोष्ट अशी आहे की, या दोन्ही प्रकाशनसंस्था पुढील काळात अधिक भरभराटीला येऊ शकतील अशी अनुकूल परिस्थिती आहे. कारण सुनील मेहता व अरुण जाखडे यांच्या मुलांना या कामात नुसताच रस व गती आहे असे नसून, नव्या काळाशी सुसंगत राहता येईल अशी व्हिजनही आहे. त्या मुलांवर विशेषत: अखिल मेहता व अभिषेक जाखडे यांच्यावर आता दु:खाचा डोंगर कोसळलेला असणे साहजिक आहे. मात्र त्यांची इतकी पूर्वतयारी झालेली आहे की, इतका भक्कम पाया व विस्तार असलेल्या प्रकाशनसंस्था चालवताना त्यांच्या कर्तृत्वाला नवे धुमारे फुटतील. अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यांना आपल्या पित्यांनी मागे ठेवलेल्या आठवणी पूर्वीचे प्रत्येक पुस्तक हाताळताना प्रेरणा देत राहतील, प्रत्येक नवे पुस्तक प्रकाशित करताना आंतरिक बळ देत राहतील. आणि त्यासाठी हजारो लेखक व लक्षावधी वाचकांच्या शुभेच्छा त्यांच्या पाठीशी राहतील! त्यामुळे त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा आणि सुनील मेहता व अरुण जाखडे यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

००

मुलाखत

प्रशांत किशोर

# २०१४ नंतरच्या प्रत्येक निवडणुकीत मी भाजपविरोधी काम केले!

२०१४ मध्ये मोदींपासून वेगळे झाल्यानंतर आम्ही नितीशकुमार यांच्या सोबत बिहारमध्ये निवडणुकीत काम केले. ते भाजपविरोधात लढत होते. त्यानंतर पंजाबमधल्या निवडणुकीत आम्ही काम केले ते काँग्रेससोबत. तिथे अकाली दल आणि भाजपविरोधात होते. त्यानंतर उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत आम्ही काम केले. (तिथेच आमचा आतापर्यंतचा एकमेव पराभव झाला.) तिथेही आम्ही काँग्रेससह काम करत होतो आणि विरोधात भाजप होता. त्यानंतर आंध्र प्रदेशमध्ये आम्ही जगनमोहन रेड्डी यांच्यासह काम केले. जगनमोहन रेड्डी तेव्हा एनडीएविरोधात लढत होते. तेलुगू देसम पार्टी आणि भाजप केंद्रात व राज्यातही एकत्र होते. त्यानंतर आम्ही काम केले ते बंगालमध्ये आणि तामिळनाडूमध्ये. दोन्ही ठिकाणी भाजप विरोधी स्थानी होता. त्यामुळे, आम्ही कधी इकडे तर कधी तिकडे असतो- हा लोकांचा भ्रम आहे.



**प्रश्न** – राजकीय विश्लेषक, राजकीय सल्लागार असे अनेक शब्द तुमच्यासाठी वापरले जातात. आपण स्वतःला कोण मानता?

– राजकीय विश्लेषक, राजकीय सल्लागार असे शब्द माझ्यासाठी वापरले जातील असे मला कधीही वाटले नव्हते. मी स्वतःला त्या स्थानी पाहत नाही, परंतु कदाचित मी जे काम करतो त्याचे वर्णन काही प्रमाणात त्या शब्दांनी सूचित होत असावे. "Political aid to the politicians to choose to work with me in the context and settings of elections and beyond" असे मी स्वतःविषयी सांगतो.

मी स्वतःला 'राजनैतिक सहयोगी' मानतो. 'राजकीय सल्लागार' किंवा 'राजकीय रणनीतीकार' अशी अभिधाने म्हणजे केवळ शब्दच्छल आहे.

**प्रश्न –** ''माझ्यासोबत काम करू इच्छिणाऱ्या राजकारण्यांना मी सहयोग करतो'' असे आपण म्हणता. सर्वसाधारणपणे ''ज्याच्यासोबत 'मी' काम करू इच्छितो त्या राजकीय नेतृत्वाचा सहयोगी म्हणून मी काम करतो'' असे एखाद्याने म्हटले असते...

– मी ज्यांच्यासह काम करू इच्छितो त्यांची निवड मी कशी करतो असा प्रश्न मला नेहमी विचारला जातो. ती निवड केवळ माझी नसते. त्याचप्रमाणे जे आमच्या सोबत काम करू इच्छितात त्यांचीही ती नसते. निवड दोन्ही बाजूंनी होते. सुरुवातीच्या काळात आम्ही मोदींसोबत काम केले. त्या वेळी निवडीचा मुद्दाच नव्हता, संधी मिळाली म्हणून काम केले. काही काळ गेल्यानंतर भाजपशी आमचा संपर्क कमी झाला आणि या क्षेत्रात टिकून राहण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे राजकीय रणनीतीकार बनण्याची स्वप्ने घेऊन आम्ही आलो होतो असे काही नाही. परिस्थितीअनुरूप आणि संधीच्या अनुकूलतेअनुसार काही वेळा आम्हांला कुणासोबत काम करावे लागले, काही वेळा ती आमची निवड होती, तर काही वेळा ओघाने गोष्टी घडत गेल्या.

**प्रश्न –** तुमची काही आयडियॉलॉजी आहे का?

– नक्कीच आहे. परंतु काही वेळा माझी ओळख 'Ideology agnostic' अशी करून दिली जाते. मी माझ्या एका मुलाखतीत या मुद्द्यावर सविस्तर बोललो आहे. मानवी इतिहासातील काही अत्यंत वाईट गोष्टी आयडियॉलॉजीच्या नावाखाली घडलेल्या आहेत. आयडियॉलॉजी या शब्दात गुंतवून ठेवणे नेत्यांच्या सोयीचे असते. जेणेकरून त्यांना आपल्या प्रत्येक कृतीचे समर्थन करता येते आणि त्यांच्या अनुयायांनी त्यांना प्रश्न विचारणे अपेक्षित नसते. या प्रकारचा दृष्टिकोन मला मान्य नाही. माझा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन गमावण्यास भाग पाडेल अशी आयडियॉलॉजी मी स्वीकारू शकत नाही. समजा, आपण भाजपच्या आयडियॉलॉजीवर विश्वास ठेवत असाल तर त्यांच्या नेत्यांची इच्छा अशीच असेल की, त्या आयडियॉलॉजीच्या नावाखाली लिंचिंग जरी होत असेल तरी तुम्ही त्याला समर्थन द्यायला हवे. तसे जर आपण केले नाही तर ते म्हणतील की, 'तुमची काही आयडियॉलॉजी नाही.' समजा, कम्युनिस्ट बंगालमध्ये सत्तेत आहेत आणि तिथे त्यांचे काम फारसे चांगले नाही; तर समजा कम्युनिझमवर माझा विश्वास असला तरी एक तरुण म्हणून मला तिथे हस्तक्षेप करणे भाग आहे. मात्र कम्युनिस्ट नेते आयडियॉलॉजीच्या नावाखाली तुम्हांला तसे करण्याची मुभा देणार नाहीत. आम्ही आधी एका राजकीय पक्षासह काम केले आणि कालांतराने दुसऱ्या पक्षासह काम केले, यामुळे आमची आयडियॉलॉजी नाही असे जर तुम्ही म्हणत असाल तर मग देशाच्या निम्म्या जनतेकडे आयडियॉलॉजी नाही असे म्हणावे लागेल. कारण, तुम्ही या वेळी भाजपला मतदान केले तर पुढच्या वेळी काँग्रेसला करू शकता आणि त्यानंतर इतर कुणाला... आयडियॉलॉजी असणे ही आंतरिक बाब आहे; पण तिच्या नावाखाली तुम्ही चुकीचे काही करत असाल तर मी त्याला समर्थन देणार नाही.

**प्रश्न –** तुमची आयडियॉलॉजी काय आहे?

– मी स्वतःला 'लेफ्ट टु द सेंटर' समजतो. आणि गांधींनी या देशासाठी जे म्हटले आहे त्याच्या जवळ जाणारी विचारसरणी मी मानतो. गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेमुळे ते समाजवादी वाटतात, राज्यसंस्थेचे नियंत्रण (State ownership) असावे या कल्पनेमुळे ते कम्युनिस्ट वाटतात, काँग्रेसमध्ये तर ते स्वतःच होते, काही मुद्द्यांवर तर ते रा. स्व. संघाच्या विचारसरणीच्या जवळपास जाणारे वाटतील...

**प्रश्न –** अनेक भांडवलदारांशी त्यांचे सौहार्दाचे संबंध होते...

– होय. मग आजच्या राजकीय परिप्रेक्ष्यात गांधींची विचारसरणी कुठे बसते?

**प्रश्न –** पण गांधीजी निवडणुका लढवत नव्हते...

– निवडणुका तर मीही लढवत नाही! गांधींनी सांगितले की, 'योग्य कृती हेच उत्तम राजकारण आहे. जी जनतेसाठी योग्य आहे, तीच उत्तम विचारसरणी आहे.'

**प्रश्न –** तुमची तुलना मी जॉन राईट यांच्याशी केली तर तुम्हांला ते कसे वाटेल? ते न्यूझीलंडचे कप्तान होते आणि भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, वेस्ट इंडीज या संघांविरोधात खेळले होते. पण नंतर ते भारतीय संघाला प्रशिक्षण देण्याकरता भारतात आले आणि गांगुली कप्तान

असतानाच्या काळात त्यांनी भारतीय संघाला उच्च स्थानी नेऊन ठेवले. असेच ग्रेग चॅपेल यांच्याही बाबतीत म्हणता येईल. आपण या दोघांप्रमाणे आहात असे आपल्याला वाटते का?

– खरेच मला असे वाटत नाही. मी माझा राजकीय प्रवास नरेंद्र मोदींसह सुरू केला आणि त्यांच्यासह तीनच वर्षे काम केले.

**प्रश्न –** त्यांनी तुम्हांला किंवा तुम्ही त्यांना कसे शोधून काढले?

– आम्ही दोघांनी एकमेकांना शोधून काढले असे म्हणायला हवे. मी संयुक्त राष्ट्र संघात होतो. गुजरातमधल्या कुपोषणासंदर्भात माझा त्यांच्याशी पहिल्यांदा संबंध आला. तेव्हा संवाद सुरू झाला आणि कालांतराने मी भाजपचा 'राजकीय सहयोगी' बनण्यापर्यंत तो वाढत गेला. हा आमचा नंतरचा प्रवास, सुरुवातीच्या काळात त्यांच्या किंवा माझ्याही कल्पनेत नव्हता. २०१४ मध्ये मोदींपासून वेगळे झाल्यानंतर आम्ही नितीशकुमार यांच्या सोबत बिहारमध्ये निवडणुकीत काम केले. ते भाजपविरोधात लढत होते. त्यानंतर पंजाबमधल्या निवडणुकीत आम्ही काम केले ते काँग्रेससोबत. तिथे अकाली दल आणि भाजपविरोधात होते. त्यानंतर उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत आम्ही काम केले. (तिथेच आमचा आतापर्यंतचा एकमेव पराभव झाला.) तिथेही आम्ही काँग्रेससह काम करत होतो आणि विरोधात भाजप होता. त्यानंतर आंध्रमध्ये आम्ही जगनमोहन रेड्डी यांच्यासह काम केले. जगनमोहन रेड्डी तेव्हा एनडीएविरोधात लढत होते. तेलुगू देसम पार्टी आणि भाजप केंद्रात व राज्यातही एकत्र होते. त्यानंतर आम्ही काम केले ते बंगालमध्ये आणि तामिळनाडूमध्ये. दोन्ही ठिकाणी भाजप विरोधी स्थानी होता. त्यामुळे, आम्ही कधी इकडे तर कधी तिकडे असतो– हा लोकांचा भ्रम आहे. मी सुरुवात जरी भाजपसोबत केली असली तरी त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुकीत मी भाजप किंवा त्यांच्या मित्रपक्षांच्या विरोधातच काम केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे लोक आमच्याविषयी सांगत आहेत की, 'हे भाजपचे एजंट आहेत.' म्हणजे भाजप हा इतका हुशार पक्ष आहे की, भाजपने आपल्या 'एजंट'ला भाजपच्या दृष्टीने सर्वाधिक प्रतिष्ठेच्या अशा पश्चिम बंगालच्या निवडणुकीत भाजपलाच पराभूत करण्याचे काम दिले! बंगालमध्ये काही काँग्रेसने लढत दिली नाही. कोविडच्या नावाखाली ते दिल्लीत बसून राहिले. मात्र कोविड असूनही तिथे आम्ही भाजपशी लढत दिली. भाजपला हरवण्यासाठी आम्ही जोर लावला आणि तुम्ही आम्हांलाच भाजपचे एजंट म्हणता? तुम्ही इथे दिल्लीत बसून पत्रकार परिषदा घेता, ट्विट करता तेव्हा तुम्ही मात्र भाजपशी लढत आहात! आता कोण खरा भाजपचा एजंट आहे याचा निर्णय मी लोकांच्या बुद्धीवर सोपवतो. बंगालमध्ये डावे आणि 'इंडियन सेक्युलर फ्रंट'सारख्या पक्षांशी युती करून तुम्ही कुणाची मते विभागत होता? ती तर भाजपला थेट मदतच होती. 'काँग्रेस लढो न लढो, जिंको किंवा पराभूत होवो; भाजपविरोधकाची जागा फक्त त्यांचीच आहे,' ही मांडणी अजब आहे. आणि जे इतर लोक भाजपशी लढून त्यांना पराभूत करण्याचा प्रयत्न करत आहेत ते मात्र (केवळ काँग्रेसच्या पथ्यावर पडत नाही म्हणून) भाजपचे एजंट आहेत! आपल्या देशात 'तुम्ही राष्ट्रवादी आहात,' असे प्रमाणपत्र देण्याचा मक्ता जसा भाजपने स्वतःकडे घेतला आहे त्याचप्रमाणे 'मोदीविरोधी असण्याचे' आणि 'सेक्युलॅरिझम'चे प्रमाणपत्र देण्याचा नवा मक्ता काँग्रेसने घेतलेला दिसतो. देशातल्या ६०–७० टक्के जागांवर तुम्ही लढत आहात; तिथे भाजपला पराभूत करा की! कशाला आम्हां किरकोळ लोकांच्या नादी लागता?

**प्रश्न –** तुम्ही मोदींसोबत कामाला सुरुवात केलीत. अनेक जण असेही म्हणतात की, मोदींच्या केंद्रातील सत्तेच्या उदयाला तुम्ही मुख्यत्वे साहाय्यभूत ठरलात. मग नंतर दुरावा कशामुळे आला?

– मुळात मोदींच्या उदयाला मी साहाय्यभूत ठरलो हे विधान अतिशयोक्त आहे. मी हजार वेळा सांगितले आहे की, माझ्यासारखे लोक कुणी निवडणूक जिंकले किंवा हरले यासाठी कारणीभूत होत नाहीत. पक्ष किंवा नेते ज्या मुद्द्यांच्या आधारावर मते मागतात त्यावरच त्यांची हार किंवा जीत अवलंबून असते. आमच्यासारखे लोक ओव्हररेटेड आहेत. एका विशिष्ट मर्यादेत, काही एक शिस्त आणून अधिक ऑर्गनाइज्ड पद्धतीने निवडणुका लढवण्यासाठी राजकीय पक्षांना आमची मदत होते. त्यामुळे मोदींचा उदय हा त्यांचा स्वतःचा आहे. त्यांची स्वतःची लोकप्रियता, ताकद यांच्यामुळे तसेच देशातल्या

काही एका विशिष्ट परिस्थितीमध्ये संघ-भाजप यांनी लोकांना जे काही ऑफर केले त्यामुळे त्यांना मिळालेला तो विजय आहे. या प्रक्रियेत त्यांच्या सोबत माझ्यासारखे शेकडो लोक असतील. त्यामुळे त्यांच्या विजयाकरता मी मुख्यत्वे साहाय्यभूत असल्याचा दावा मी कधीही केलेला नाही. ज्या लोकांना माझ्यावर टीका करायची असते, ते आधी माझ्या वतीने स्वतःच तसा दावा करतात आणि मग म्हणतात की, हा दावा खोटा आहे! मी पुन्हा पुन्हा हेच सांगतो आहे की, मोदींच्या किंवा ममता यांच्या विजयाला मी कारणीभूत नाही. आम्ही एका मर्यादित अवकाशामध्ये त्यांचे सहयोगी होतो.

तुमचा पुढचा प्रश्न असा होता की, तुम्ही मोदींना का सोडले. आमच्या दोघांमधले अंडरस्टँडिंग पुढे नेणे शक्य नव्हते असे त्या वेळी मला वाटले. व्यावसायिक पद्धतीने काम करणाऱ्या प्रशिक्षित व्यक्तींना राजकीय कामांमध्ये कामाच्या स्वरूपानुसार विशिष्ट काळासाठी सहभागी होता यावे यासाठी एक संस्थात्मक यंत्रणा असावी अशी कल्पना मोदींनीच मांडली होती. तत्सबंधीचे काम लवकरात लवकर सुरू व्हावे अशी माझी इच्छा होती. वास्तविक हेच काम आम्ही निवडणूककाळात करत असतो. ऑर्गनाइज्ड पद्धतीने अनेक प्रशिक्षित व्यावसायिक राजकीय पक्षाच्या यंत्रणेशी संलग्न होतात आणि त्या पक्षाची कार्यक्षमता व परिणामकारकता वाढवण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकीपश्चात मात्र ते पक्षाचा भाग असत नाहीत. अशीच कार्यप्रणाली २०१४च्या निवडणूक निकालाच्या कितीतरी आधीपासून सरकारी कामकाजासाठीही प्रस्तावित होती. ती कधी प्रत्यक्षात आणायची या बाबतीत आमचे मतभेद होते. एखाद्या कल्पनेवर तुम्ही एकत्र काम करायचे ठरवले आहे; मात्र विशिष्ट काळात तुम्ही ती प्रत्यक्षात आणू शकत नसाल तर तुम्ही विभक्त होणे चांगले असा मी विचार केला. माझ्या करिअरचे भवितव्य काय असेल याची चिंता अर्थातच मोदींना असण्याचे कारण नव्हते, ती मलाच करणे भाग होते. त्यामुळे यात कुणावरच कुणी दोषारोप करण्याची गरज नाही. काही माध्यमांमध्ये अशीही चर्चा चालते की, अमित शहांशी आमचा वाद झाला, वगैरे. वास्तविक २०१४च्या निवडणूक निकालादरम्यान माझी-त्यांची भेटही झालेली नाही. २०१२ ते १४च्या दरम्यान मी मुख्यतः मोदींच्या सोबतच काम केले. त्यामुळे विभक्त होण्याचा निर्णयही माझा आणि मोदींचाच होता. आणि त्या निर्णयामागे कुठल्याही पदाशी संबंधित कुठला मुद्दा नव्हता तर पंतप्रधान कार्यालयापासून ते पंचायतीपर्यंत - आधी उल्लेख केला त्याप्रमाणे - एखादी संस्थात्मक यंत्रणा असावी असा मुद्दा होता.

**प्रश्न –** एरवी भारतात अशा प्रकारच्या प्रवेशात खूप अडथळे आहेत.

– अडथळे तर आहेतच. पण समजा, तुम्ही जलतज्ज्ञ आहात आणि सरकारसोबत काम करू इच्छिता तर त्यासाठी कोणतीही व्यवस्थात्मक तरतूद सध्या नाही. एखाद्या मंत्र्याला किंवा सेक्रेटरीला वाटले तर तो कुणाला तरी सहभागी करून घेऊ शकतो. परंतु नियमितपणे अशा लोकांना कामांत सहभागी करून घेता येईल, ते इच्छित मुदतीत सरकारचा भाग बनून काम करू शकतील आणि काम पूर्ण झाल्यावर सरकारचा भाग असणार नाहीत अशी कोणतीही व्यवस्था सध्या नाही. अशा प्रकारची व्यवस्था आम्हांला तयार करायची होती. मुळात ते मोदींचेच व्हिजन होते; माझे नाही. आम्ही दोन वर्षे जे एकत्र काम केले, त्या कामाचा एक भाग राजकीय होता - ज्यायोगे निवडणूक प्रचारात असे प्रोफेशनल्स सहभागी झाले होते. त्याच धर्तीवरची आणखी एक व्यवस्था सरकारी कामकाजासाठी तयार करणे अभिप्रेत होते आणि मला अपेक्षित काळामध्ये ते घडू शकत नव्हते. त्यामुळे आम्ही विभक्त झालो.

**प्रश्न –** तुम्ही सध्या निवडणुकीच्या राजकारणात नाही. पण एकदा जेडीयू सोडल्यानंतर आता तुम्ही बिहारला परत जाणार आहात का? आणि निवडणुकीत सहभागी होणार आहात का?

– निवडणूक लढवण्याचा एक प्रयत्न मी करून पाहिला. मी नापास राजकारणी आहे! नितीशकुमारांशी माझे खूप चांगले संबंध होते आणि मी बिहारचाच असल्यामुळे माझी आणि त्यांचीही इच्छा होती की, मी तिथे काम करावे. सध्या त्यांची मर्यादा अशी आहे की, तिथे ते भाजपसोबत आहेत आणि जेडीयूचा अवकाश आक्रसत चालला आहे. त्यांचे वय पाहता त्यांच्याकरता तो कदाचित पुरेसा असेल, ते मुख्यमंत्री आहेत. मला मात्र तिथे दीर्घ काळ काम करता येणार नाही असे मला वाटले. पूर्वी जेडीयूचे तिथे वर्चस्व होते, आता भाजपचे वर्चस्व आहे. माझे व त्यांचे मतभेद या आक्रसलेल्या

अवकाशापोटीच होते. ‘आपण ज्या मार्गाने चाललो आहोत तो आपल्या वाढीला फारसा उपयुक्त नाही; उलट त्या मार्गाने आपला अवकाश अधिकाधिक आक्रसत जाणार आहे आणि भाजप बिहारमध्ये वर्चस्ववादी पक्ष होत जाणार आहे,’ असे माझे मत होते. पण त्या वेळी तरी नितीशकुमारांना ते समीकरण बदलणे योग्य वाटत नव्हते. त्यामुळे आम्ही विभक्त झालो.

**प्रश्न –** सुरुवात भाजपपासून करून पुढे तुम्ही जेडीयूमध्ये गेलात, दरम्यान काँग्रेसच्याही तुम्ही बऱ्यापैकी जवळ होतात. तुम्हांला ज्या राजकीय पक्षांसह काम करायचे होते त्या पक्षांच्या यादीमध्ये भाजप होता की नव्हता?

– नव्हता. मला भाजपमध्ये जाण्याची अजिबात इच्छा नाही. कारण, भाजपमध्ये जाणे मला आयडियॉलॉजिकली फारच त्रासदायक ठरणारे आहे. मी भाजपसह काम केले; पण तेव्हा मी पक्षाचा सभासद नव्हतो. गुजरातमधल्या कुपोषणाच्या प्रश्नावर आम्ही मोदींसोबत काम सुरू केले आणि पुढे माझी भूमिका – ज्याला ‘कॅम्पेन मॅनेजर’ वगैरे म्हटले गेले त्या स्वरूपात – विस्तारत गेली. परंतु ते पूर्वनिश्चित नव्हते. त्या दोन- तीन वर्षांच्या काळात तशा घटना घडत गेल्या. त्याच मार्गाने मी पुढे गेलो असतो तर आज काय चित्र असते, ठाऊक नाही. पण आता वेगळे होऊन भाजपविरोधी पक्षांसोबत काम केल्यानंतर पुन्हा भाजपसोबत जावे असे मला वाटत नाही.

**प्रश्न –** भाजपच्या विचारसरणीशी तुमचे तात्त्विक मतभेद काय आहेत?

– या देशाच्या संविधानात अनुस्यूत तत्त्वांशी असणारी कुठलीही लक्षणीय फारकत ही माझ्यासाठी अडचण आहे. संविधानाच्या प्रस्तावनेत जी चार-पाच तत्त्वे आहेत त्यांच्याशी काहीशी फारकत घेणारी अशी भाजपची विचारसरणी आहे, तिच्याशी दीर्घ काळ मेळ घालणे माझ्या दृष्टीने अवघड आहे.

**प्रश्न –** अमित शहा यांना ‘भारतीय राजकारणातील चाणक्य’ असे म्हटले जाते. त्याविषयी आपले मत काय?

– कुठल्याही व्यक्तीकरता अशा उपमा वापरणे अनाठायी आहे. केवळ निवडणुका जिंकण्याने तुम्ही चाणक्य ठरत नाही. चाणक्यासारखी व्यक्ती इतिहासात एखादीच होते...

**प्रश्न –** अमित शहांनी आपल्या दिवाणखान्यात ‘कौटिल्य’ आणि ‘सावरकर’ यांच्या प्रतिमा लावलेल्या आहेत.

– मी त्यांच्या वतीने कोणतेही विधान करू इच्छित नाही. पण अमित शहादेखील स्वतःला या प्रकारच्या प्रतिमेत पाहत असतील असे वाटत नाही. माझे त्यांच्या विषयीचे जे काही आकलन आहे त्याअनुसार, एखाद्या राजकीय पक्षाचे संघटन करण्यातली त्यांची क्षमता मोठी आहे. त्याचप्रमाणे, ग्राउंड लेव्हलला समाजातील जातीय समीकरणे काय आहेत याचे त्यांना उत्तम भान आहे. या दोन्ही गोष्टी एकत्र पाहिल्या आणि त्यांच्या मागे असणारी संघ-भाजप यांची ताकद व मोदींचे लोकप्रिय नेतृत्व हेही मुद्दे लक्षात घेतले तर या सगळ्यांतून एक जबरदस्त मिश्रण तयार होते.

**प्रश्न –** भाजपची तीन बलस्थाने कोणती? तुम्ही कदाचित म्हणाल, स्ट्राँग आयडियॉलॉजी, स्ट्राँग नेता, तळागाळापर्यंतचा उत्तम जनसंपर्क?

– अनेक लोकांना हेच मुद्दे वाटतात. पण अनेक लोक आम्हांला असेही विचारतात की, ‘काही मुद्द्यांवर अगदी ढळढळीतपणे भाजपच्या विरोधात जाऊ शकणारी मांडणीही भाजपला मोठा धक्का का पोहोचवू शकत नाही? महागाई, कोविड अशा गोष्टी भाजपला का नुकसानकारक ठरत नाहीत? डिझेलची किंमत ५० पैशाने वाढवायची असेल तरी पूर्वीची सरकारे महिनोन्‌महिने विचार करत असत; आज डिझेलची किंमत ५० रुपयांनी वाढलेली आहे. मग याने भाजपचे राजकीय नुकसान का होत नाही?’ या प्रश्नांकडे आपण लक्ष पुरवायला हवे. तुम्ही सांगितलेली बलस्थाने तर योग्यच आहेत; पण त्याशिवाय मला वाटणारी त्यांची तीन बलस्थाने अशी आहेत : पहिले बलस्थान, भारतातला हिंदू-मुस्लिम प्रश्न; दुसरे, राष्ट्रीय स्तरावर भाजपने उभा केलेला अतिराष्ट्रवाद (hyper-nationalism). या दोन मुद्द्यांमुळे त्यांच्यावर हल्ला चढवणे अतिशय अवघड आहे. सध्या असे लोक भारतात बहुसंख्येने आहेत ज्यांनी एरवी निश्चलनीकरणासारख्या निर्णयांवर, महागाईवर टीका केली असती. पण तेही आज म्हणत आहेत की, ‘मी अनेक वस्तूंसाठी पूर्वीपेक्षा अधिक किंमत चुकवतो आहे. पण त्यातून देशाचे भलेच होत आहे. मोदी नव्या भारताची निर्मिती करत आहेत.’ पण या

प्रकारच्या विचारप्रवाहाला मोदीविरोधक कमी लेखतात. भाजपच्या अतिराष्ट्रवादामुळे एरवी सरकारच्या थेट विरोधात जाऊ शकणाऱ्या गोष्टी सध्या काही मर्यादेत खपून गेल्या आहेत. तिसरे बलस्थान असे की, घरगुती आणि व्यक्तिगत पातळीवर 'उज्ज्वला', 'जनधन'सारख्या योजनांतून थेट पैसे किंवा सुविधा पोहोचवणे त्यांनी मोठ्या प्रमाणावर केले आहे. या तीन बलस्थानांना एकत्र पाहिले तर तेही एक जबरदस्त मिश्रण तयार होते. ज्यांना भाजपविरोधी मांडणी करायची असेल त्यांनी या तिन्ही मुद्द्यांवर भाजपहून चांगला प्रस्ताव लोकांना द्यायला हवा.

**प्रश्न –** 'हे सर्व उदात्त हेतूने केले जात आहे,' या भावनेने मतदार सरकारच्या चुकांकडे दुर्लक्ष करत आहेत?

– मी मतदारांच्या बुद्धीवर अविश्वास दाखवू इच्छित नाही. लोक कदाचित असा विचार करतात की, 'काही ना काहीतरी मिळते आहे ना!' आणि जिथे लोकांना झळ बसते आहे तिथे ते म्हणत आहेत, 'इतके तरी मी देशाकरता सहन करू शकतो किंवा हे मी सहन करेन. कारण मी हिंदू आहे आणि हे सरकार हिंदूंसाठी काम करते आहे.' तुम्ही ग्राउंड लेव्हलला जाऊन डिझेलची वाढीव किंमत द्यावी लागते आहे तुम्हांला वाईट वाटत नाही का– असे लोकांना विचारले तर त्यावर लोक म्हणतात की, 'द्यावी लागते आहे. पण त्यातून देशाचे निर्माण होते आहे!'

तुम्ही आकडेवारी पाहिली तर विधानसभांमध्ये भाजपची कामगिरी घसरते आहे. त्याविषयी विरोधक म्हणतात की, मोदींच्या वाईट कामगिरीमुळे भाजपला राज्यांत मतदान कमी होते आहे. पण मला असे वाटते की, स्थानिक पातळीवर अतिराष्ट्रवादाचा मुद्दा कामी येत नाही हे त्याचे एक कारण आहे. आणि बंगालमध्ये बंगाली माणूस किंवा बिहारमध्ये बिहारी माणूस सत्ता चालवेल अशी प्रांतीय मांडणी स्थानिक पक्षांना करता येणे शक्य होते. त्यामुळे राष्ट्रीय निवडणुकांच्या तुलनेत स्थानिक निवडणुका जिंकणे भाजपला अवघड जाते आहे. परंतु जेव्हा राष्ट्रीय निवडणुका येतील तेव्हा वर उल्लेख केलेली भाजपची तीन बलस्थाने आपल्याला लक्षात ठेवावी लागतील. विधानसभेत पराभूत झाला त्यामुळे लोकसभेतही भाजप पराभूत होईल असे काही लोक मानतात; तसे होणार नाही.

**प्रश्न –** भाजपच्या तीन मर्यादा कोणत्या?

– एके काळी काँग्रेस ज्याप्रमाणे इंदिरा गांधींच्या व्यक्तिगत करिष्मा आणि लोकप्रियतेवर अतिरिक्त प्रमाणात अवलंबून होता, त्याप्रमाणे भाजप दिवसेंदिवस केवळ मोदींच्या करिष्म्यावरील आणि लोकप्रियतेवरील स्वतःचे अवलंबित्व वाढवत चालला आहे. मोदींइतकी लोकप्रियता लाभलेले दुसऱ्या फळीतले नेतृत्व भाजपमध्ये आपल्याला कदाचित दिसणार नाही.

पूर्व आणि दक्षिण भारतात भाजपला फारशी चमक दाखवता आलेली नाही, ही मला त्यांची दुसरी महत्त्वाची मर्यादा वाटते. भारताच्या लोकसभेतल्या ५४० जागांची दोन भागांत विभागणी केली आणि पूर्व-दक्षिण भारतातल्या बिहार, बंगाल, ओडिशा, आंध्र-तेलंगणा, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांचा विचार केला तर २००च्या आसपास जागा होतात. तिथे भाजप केवळ ५०च्या आसपास जागा राखू शकला आहे. मोदींची लोकप्रियता, संघ-भाजपची ताकद, अमित शहा इत्यादी सगळ्या गोष्टी जमेस धरूनही या प्रदेशांत भाजपला जम बसवता आलेला नाही. हे काय दर्शवते? पश्चिम-उत्तर भारतात उर्वरित ३०० जागांमध्ये भाजपने लक्षणीय कामगिरी केली आहे. तिथे कोणत्याही मुद्द्यावर एखादा पक्ष/ नेता/ राजकीय समीकरण यांना १०० जागा जरी वळवता आल्या तरी सत्ताबदल शक्य आहे. म्हणजे भाजपविरोधी शक्ती २५० हून अधिक जागांवर जातील आणि भाजपच्या जागा कमी होतील. माझ्या मते, ही भाजपकरता मोठी धोक्याची बाब आहे. अद्याप भाजप खऱ्या अर्थाने विधानसभेतील 'पॅन-इंडिया' पक्ष झालेला नाही, जसा काँग्रेस आहे.

**प्रश्न –** काही प्रमाणात १९७७ च्या जनता पक्षाप्रमाणे भाजपची स्थिती आहे? 'हिंदी हार्टलँड'मध्ये जनता पक्षाने जागा मिळवल्या; पण श्रीमती गांधींची लोकसभेतील पकड कायम राहिली.

– काही अंशी मी याच्याशी असहमत आहे. पण 'हिंदी हार्टलँड' आता पश्चिमेकडेही विस्तारला आहे. गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटकचा काही भाग या सगळ्यांचाही आता त्यात समावेश करावा लागेल. आताच्या भाजपसाठी हिंदी हार्टलँड म्हणजे केवळ गंगेचे खोरे नाही. कर्नाटक ते हिमाचल प्रदेश, काश्मीर आणि उत्तर प्रदेश ते

गुजरात या प्रदेशांत भाजपला सध्या कोणतेही आव्हान नाही. त्यामुळे या प्रदेशांत त्यांना कुणी राजकीय आव्हान दिले तर सत्ता टिकवण्यासाठी त्यांना पश्चिम व दक्षिण भारतात फारसे स्थान नाही, जे काँग्रेसला त्यांच्या उत्कर्षकाळात होते.

**प्रश्न –** बिहारमधील येत्या विधानसभा निवडणुकीत तुम्ही उमेदवारी करू इच्छिता का?

– मी तसा विचार केलेला नाही. बंगालच्या निवडणुकीनंतर मी म्हटले की, I-PAC सोबत पूर्वी मी ज्या प्रकारचे काम केले तितके आणि तशा पद्धतीचे काम आता मी करणार नाही. निवडणुकीत सहभागी होण्यासंदर्भात काय करायचे ते मी अद्याप ठरवलेले नाही. मघाशी सांगितल्याप्रमाणे, मी एकदा निवडणुकीत उतरलो आणि जोरदार अपयशी ठरलो. त्यामुळे घाईघाईने पुन्हा पुढची पावले उचलावीत असे मला वाटत नाही. राजकारणी म्हणून काम करण्यासाठी स्वतःच्या जाणिवांमध्ये कोणत्या सुधारणा करायला हव्यात याविषयी मला शांतपणे विचार करायला हवा, अभ्यास करायला हवा. त्यांची स्पष्टता मला स्वतःला जोवर येत नाही, तोवर मी कोणतेही पाऊल उचलणार नाही. आणि त्यासाठी मी सध्या अक्षरशः घरी बसलेलो आहे.

**प्रश्न –** मोदी तर दिवसातले १८ तास काम करतात. पण तुम्ही मात्र अभ्यास-रजेवर (sabbatical) असूनही अतिशय व्यस्त आहात...

– ज्यांच्या पाठीशी कोणताही मोठा वारसा, मोठे घराणे वगैरे नाही अशा माझ्यासारख्या व्यक्तीला काम करणेच भाग आहे. अशी पार्श्वभूमी असलेल्या कुठल्याही व्यक्तीला तिच्या तरुण वयात कठोर मेहनत घ्यावीच लागते. त्याला कोणताही पर्याय नाही.

**प्रश्न –** तुम्ही काँग्रेसविषयी निराश का आहात?

– भाजपेतर राजकीय पक्षांमध्ये काँग्रेस हा प्रमुख राजकीय पक्ष राहिलेला आहे. विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसने म्हणावी तशी कामगिरी बजावलेली नाही. सत्तेत मोदी आणि भाजपचा उदय होऊन आता सात-आठ वर्षे झालेली आहेत. माझ्या मते, कुठल्याही पक्षाला पुनर्विचारासाठी, पुनरावलोकनासाठी किंवा पुनर्रचनेसाठी हा पुरेसा काळ आहे. त्या पातळीवर मी काँग्रेसच्या कामगिरीबाबत निराश आहे असे म्हणता येईल. हे सर्व केल्याने तुम्ही सत्तेत याल अशी शाश्वती देता येणार नाही, परंतु त्यावर तुम्ही मेहनत घेत आहात असे चित्र तरी दिसेल.

काँग्रेसच्या कुठल्याही पुढाऱ्याला विचारले तर तो सांगतो की, 'आमच्यातला संवाद परिणामकारक राहिलेला नाही. आमचे म्हणणे आम्ही परिणामकारकरीत्या खालच्या स्तरावर पोहोचवू शकत नाही.' सोनियाजींपासून ते बूथ लेव्हलच्या व्यक्तीपर्यंत सगळ्यांचे हेच म्हणणे आहे. २०१४ मध्ये काँग्रेसमध्ये 'कम्युनिकेशन'च्या मुख्य पदावर जी व्यक्ती होती, तीच तिथे आजही आहे. रणजीतसिंग सुरजेवाला हे त्या पदावर आहेत. त्यांच्या क्षमतांविषयी काही भाष्य करण्याचा माझा हेतू नाही. पण तुम्हीच म्हणता की, 'आमच्यात संवाद नाही ही आमची सगळ्यांत मोठी अडचण आहे'

स्वतःच्या बलस्थानांवर काम करण्याऐवजी काँग्रेस सावरकरांवर वाद घालण्यात आपली ऊर्जा खर्च करतो आहे. ही खेळी माझ्या मते भाजपच्या पथ्यावर पडणारीच आहे. तुमच्याच पक्षातील कित्येक महापुरुषांचा वारसा तुमच्याकडे आहे, ज्यांना आता सोईस्करपणे विस्मृतीत ढकलले जाते आहे. त्यांच्याविषयी तुम्ही का बोलत नाही? भाजपला सावरकरांच्या स्मृती साजऱ्या करायच्या आहेत तर त्यांना ते करू देत, त्याने काय आभाळ कोसळणार आहे? गांधी, नेहरू, पटेल यांच्या बाजू तुम्ही लढवू शकला नाहीत; मग सावरकरांना कोण आणि का साजरे करते आहे याविषयी बोलण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे? सावरकरांचे समर्थन करणे/न करणे हा माझा विषय नाही; माझा मुद्दा इतकाच आहे की, काहीएक रणनीती म्हणून किंवा डावपेचाचा भाग म्हणूनही काँग्रेसचे हे वर्तन फार काही साध्य करणारे नाही.

आणि तरीही तुम्ही त्याच व्यक्तीकडे ते पद अद्याप ठेवले आहे; त्याच संपर्काच्या रणनीतीने गेली सात वर्षे तुम्ही काम करत आहात आणि तरीही आशा ठेवून आहात की, काहीतरी घडेल. प्रयत्नच करायचा म्हणून तरी इतर कुठल्या व्यक्तीचा विचार करायला हवा. काँग्रेससारख्या एवढ्या मोठ्या पक्षात तुम्हांला दुसरी व्यक्ती सापडत नाही?

दुसरा महत्त्वाचा मुद्दा मला असा वाटतो की, काँग्रेससारख्या मोठ्या पक्षात हंगामी अध्यक्ष असणे गैर आहे. तिथे पूर्ण वेळ अध्यक्षच असायला हवा. हे लक्षात आणून देण्यासाठी तुम्हांला कुठल्या सल्लामसलतीची गरज आहे? अमुक एकाच व्यक्तीला अध्यक्ष बनवायला हवे असे काही नाही. परंतु ज्या कुणाला बनवायचे असेल त्याला पूर्ण वेळ अध्यक्ष बनवावे. तुम्ही कोणत्याही हंगामी यंत्रणेसह भाजपसारख्या पक्षाला दीर्घ काळ तोंड देऊ शकत नाही. अशा आणखी १० गोष्टी मी सांगू शकतो, ज्या खरे तर 'कॉमन सेन्स'च्या आहेत.

**प्रश्न –** पूर्वी जेव्हा जेव्हा टेनिसमध्ये भारताने चमकदार कामगिरी केली तेव्हा त्या संघात नॉन-प्लेइंग कॅप्टन होता. त्यामुळे काँग्रेसमध्येही 'नॉन-प्लेइंग' का असेना, परंतु 'कॅप्टन' असण्याची आवश्यकता आहे?

– माझी त्यांच्याशी इतरही अनेक मुद्द्यांवर बातचीत झाली. परंतु या उघडउघड लक्षात येणाऱ्या गोष्टींवर त्यांनी काम केले पाहिजे. यासाठी कुणाच्याही सल्ल्याची गरज का भासावी?

**प्रश्न –** 'नवा सीईओ नियुक्त करा' हा सल्ला घेण्याकरता हजारो कोटी रुपये देण्यासारखे हे आहे.

– तुमच्या सीईओकडे कोणत्या क्षमता असाव्यात यासाठी तुम्ही तज्ज्ञांची मदत घेऊ शकता. पण सीईओची गरज आहे, हे तर तुम्हांला कंपनीचा मालक या नात्याने माहीत असायला हवे.

**प्रश्न –** इतक्या कमतरता असूनही काँग्रेस पक्षाकडे २० टक्के व्होटबँक आहे.

– हासुद्धा एक गैरसमज आहे की, काँग्रेस पक्ष हाच एकमेव विरोधी पक्ष आहे. काँग्रेस पक्ष जो अवकाश व्यापून आहे तो अवकाश आणि काँग्रेस ज्या विचारधारेने चालतो असे मानले जाते ती विचारधारा आपल्या देशात अतिशय बळकट आहे हे नक्की. त्यामुळे ज्यांना भाजपला तात्त्विक आणि राजकीय पातळीवर विरोध करायचा असेल त्यांना काँग्रेसचा अवकाश मिळवावा लागेल. कारण आता विरोधकांमधून काँग्रेसला वगळले तर त्याची जागा घेऊ शकणारा दुसरा पक्ष नाही. परंतु 'काँग्रेस' म्हणजे आताचा काँग्रेस पक्ष नव्हे. काँग्रेस पक्षाची ही जी २० टक्क्यांची व्होटबँक आहे त्यातली बव्हंशी मते काँग्रेस पक्षासोबत आहेत कारण त्या त्या राज्यांमध्ये भाजपविरोधात लढणारा एकमेव पक्ष काँग्रेसच आहे. परंतु तुम्ही काँग्रेसचे ट्रॅक रेकॉर्ड पाहिले तर लक्षात येईल की, २०१४ मध्ये ज्या जागांवर केवळ काँग्रेस आणि भाजप अशी लढत होती, तिथे काँग्रेसचा स्ट्राइक रेट सहा टक्के होता. म्हणजे शंभरातल्या केवळ सहा जागा त्यांनी जिंकल्या होत्या. २०१९ मध्ये तो चार टक्के झाला. या वेळी त्यांच्या जागा लोकसभेत १० ने वाढल्या आहेत. पण त्या केरळ, तामिळनाडू आणि पंजाबमधून आलेल्या आहेत, भाजपशी लढून आलेल्या नाहीत. भाजपच्या तुलनेत काँग्रेसचा स्ट्राइक रेट कमी होतो आहे. लोकसभेतल्या भाजपच्या ३००-३५० जागांमधल्या १८० जागा अशा आहेत, जिथे गेल्या पाच निवडणुकांपासून काँग्रेस उमेदवार भाजपकडून पराभूत होत आहेत. आणि आजवरची काँग्रेसची रणनीती काय आहे? एखाद्या व्यक्तीला पक्षाने तिकीट दिले, तिने निवडणूक लढवली आणि ती व्यक्ती पराभूत झाली तर पुढच्या वेळी इतर कुणालातरी संधी द्यावी. काँग्रेसने स्वतःची बलस्थाने पुन्हा तपासून पाहिली पाहिजेत. कोणत्या जागांवर कोण निवडणूक लढवू शकतो याचा विचार केला पाहिजे. विरोधकांच्या संघटनाच्या अग्रस्थानी तुम्ही असाल आणि जर तुम्ही निवडणुकीत विजयी होत नसाल तर त्याचा उपयोग काय आहे? लोकशाही व्यवस्थेमध्ये तुम्ही मुख्य विरोधकाच्या स्थानी असाल तरी ते मोठेच बक्षीस आहे.

अनेक पक्षांना असे वाटते की, 'भाजपला आपण पराभूत तर करू शकत नाही; मग निदान मुख्य विरोधक म्हणून आपण टिकून राहू.' हा दृष्टिकोन बरोबर नाही. आणि हा दृष्टिकोन ठेवून तुमचे एकत्र गोळा होणे, 'युनायटेड अपोझिशन'च्या नावाखाली झाकण्याचा प्रयत्न तुम्ही करू नका. इतर एखादा पक्ष भाजपविरोधात जोर लावत असेल, तर तो विरोधी पक्षांची मोट कमजोर करतो आहे असे काँग्रेसचे म्हणणे असते. तर मग उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस काय करतो आहे? पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसने

काय केले? ‘ज्या पक्षाला पाच टक्क्यांहून कमी मते आहेत तो पक्ष विरोधी पक्षाच्या भूमिकेत असणार नाही’ असा निकष तुम्ही लावून पाहा. याचे सगळ्यांत जास्त नुकसान कोणाला होईल? काँग्रेसलाच होईल! कारण मग बिहार, बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, तामिळनाडू यांपैकी कोणत्याही राज्यात काँग्रेस लढू शकणार नाही. आता तर महाराष्ट्रातही काँग्रेस चौथ्या क्रमांकावरचा पक्ष आहे. त्यामुळे आम्हीच प्रमुख विरोधी पक्ष आहोत असे म्हणणे ही जुनी गोष्ट झाली. त्या हिशोबाने तर तुम्ही देशातला सत्ताधारी पक्ष होतात!

**प्रश्न –** तुम्ही विरोधी पक्षांना विरोधी पक्षांशी लढायला लावून विरोधकांचा पक्ष मजबूत करत आहात.

– लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांमध्ये चलणारी घुसळण ही योग्यच असते. ‘युनायटेड अपोझिशन’ हे मजबूत असेलच असे नाही. अमेरिकेसारख्या देशात प्रायमरीज होतात आणि त्यांतून आव्हान देणारा उमेदवार निर्माण होतो. जर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकांत विरोधक भाजपला पराभूत करू शकलेले नाहीत, तर २०२४ च्या निवडणुकीत भाजपचा सर्वांत मोठा विरोधक कोण असेल हे ठरवण्यासाठी येती दोन-तीन वर्षे विरोधी पक्षांमध्ये घुसळण होण्यात काहीच धोका नाही. त्यामुळे ‘हे विरोधक एकत्र का नाहीत?’, ‘एकमेकांशी लढत का आहेत?’ असे वाटून घाबरून जाण्याचे कारण नाही. हा लोकशाहीचाच एक भाग आहे. उदाहरणार्थ, गोव्यामध्ये तृणमूल निवडणूक लढवत आहे, तर तिथे काँग्रेसही ताकद लावून निवडणूक लढवतो आहे. पाच राज्यांमध्ये निवडणुका होत आहेत. पाच राज्यांपैकी काँग्रेसने गोव्यातच सर्वाधिक प्रचार केला आहे. काँग्रेसने सगळ्यांत आधी आपल्या उमेदवारांची यादी कुठे जाहीर केली आहे? गोव्यातच! हे काय दर्शवते? तिथे विरोधकांमध्ये केवळ एकटा काँग्रेसच असता तर जितके प्रयत्न त्यांनी केले असते त्याहून कितीतरी अधिक प्रयत्न ते आता करत आहेत. त्यामुळे हे एक प्रकारे ‘प्रायमरीज’सारखेच आहे; अर्थात आपल्या संसदीय लोकशाहीच्या मर्यादेत. आणि मला त्यात काही गैर वाटत नाही. या प्रकारच्या घुसळण होण्याच्या लोकशाही प्रक्रियेतून कुठला पक्ष, कोणते सूत्र किंवा कोणता नेता २०१४ आणि २०१९च्या तुलनेत भाजपविरोधात अधिक प्रभावी आहे हे समोर येईल. मग तो पक्ष खुद्द काँग्रेसदेखील नक्कीच असू शकेल. पण ते स्थान त्यांनी लढून मिळवले पाहिजे. काँग्रेस सध्या आहे त्याच पद्धतीने काम करणार असेल तर मात्र त्याला काही अर्थ नाही.

**प्रश्न –** अशी विरोधकांची आघाडी मोदींना पराभूत करू शकते असे तुम्हांला वाटते का?

– मी मघाशी सांगितल्याप्रमाणे, एखादे पक्षसमीकरण पश्चिम आणि उत्तर भारतातल्या केवळ १०० जागांवर भाजपला पराभूत करू शकत असेल तरी सत्तापालट शक्य आहे. म्हणजेच, भाजपला पराभूत करणे शक्य आहे.

**प्रश्न –** अगदी ५० जागांवरदेखील भाजपला पराभूत करता आले तरी केंद्रात एनडीएचे सरकार असेल, पण केवळ भाजपचे असणार नाही.

– अगदी खरे आहे. चालू स्थितीत काँग्रेस जर भाजपच्या ३०० जागांवर विरोधात लढतो आहे आणि त्यातल्या १० जागा मिळवू शकतो आहे. मग समजा इतर एखाद्या पक्षसमीकरणातून (ज्याचा घटकपक्ष काँग्रेसही असेल) ५० ते ६० जागा भाजपविरोधकांना राखता आल्या तर काय होईल? भाजप सत्तेत येईल, पण विरोधकांचे स्थान प्रबळ होईल. त्यामुळे सगळ्या विरोधी पक्षांची मोट बांधण्याच्या नावाखाली हे आपण थांबवू नये. ‘महागठबंधन’ ही कल्पनाच २०१५ मध्ये आलेली आहे, त्यापूर्वी ती नव्हती. या महागठबंधनने २०१५ मध्ये बिहारमध्ये बाजी मारली. नितीशकुमार, लालूप्रसाद आणि काँग्रेस यांनी एकत्र लढत दिली आणि भाजपला पराभूत केले. मात्र २०१५ नंतर कोणत्याही राज्यात, कोणतेही महागठबंधन निवडणूक जिंकू शकलेले नाही. पण तुम्हांला भाजपविरोधी ताकद एकत्र करायची असेल तर केवळ सगळ्या भाजपेतर पक्षांना एकत्र आणून निवडणुका लढवण्याने काही होणार नाही. विरोधकांची मोट बांधण्याची ही कल्पनाच मोडीत काढायला हवी. एक तर ते लोकशाहीविरोधीही आहे. केवळ एकसंध विरोधी गटाच्या नावाखाली तुम्ही भाजपला पराभूत करू शकत नाही. त्याने तुम्ही केवळ लोकसभेत संख्येने मजबूत दिसू शकाल. तुमच्याकडे राजकीय समीकरणही असले पाहिजे. पण त्याशिवाय तुमचे स्वतःचे ‘नॅरेटिव्ह’ असले पाहिजे, चेहरा असला पाहिजे, भाजपला तोंड देण्यासाठी तुमच्याकडे वास्तवाधारित रणनीती आखण्याचे शास्त्र

असले पाहिजे. जगनमोहन रेड्डींनी प्रयत्न केले नसते किंवा ममतांनी तृणमूल काँग्रेस स्थापन केलीच नसती तर तिथेही एकटा काँग्रेसच विरोधकांत असता आणि तिथेही त्यांना पराभूत करून भाजप सत्तेत आला असता.

**प्रश्न –** विरोधकांना चेहरा असला पाहिजे असे तुम्ही आता म्हणालात, भाजपकडे मोदींचा चेहरा आहे; विरोधकांकडे काय आहे?

– विरोधकांनाही लोकशाही मार्गाने नवा चेहरा मिळेल. हीच चर्चा समजा आपण १९७३ मध्ये करत असतो तर आपल्याला जेपींच्या उदयाचे भाकीत वर्तवता आले असते? १९८५–८६ मध्ये आपण ही चर्चा करत असतो तर व्ही. पी. सिंगांच्या उदयाचे पूर्वानुमान आपल्याला करता आले असते? जेव्हा तुम्ही एखादे राजकीय समीकरण तयार करता आणि एखादे नॅरेटिव्ह मांडता तेव्हा त्यातूनच एखादा चेहरा समोर येतो. भूसंपादन विधेयक, सीएए, एनआरसी आणि कृषी कायदे या तीन बाबींवर सरकारला – मग ते कितीही ताकदवान असले तरी – नमते घ्यावे लागले आहे. या तिन्ही प्रश्नांविरोधात सरकारला नमते घ्यायला भाग पाडणारा कुणी एक विशिष्ट चेहरा नव्हता. त्यामुळे तुमचा मुद्दा बरोबर असेल, नॅरेटिव्ह योग्य असेल आणि आपल्या मुद्द्यावर दीर्घ काळ लढा देण्याकरता तुमच्याकडे राजकीय व इतर स्रोत असतील तर तुम्ही सरकारला बॅकफूटवर जायला भाग पाडू शकता.

**प्रश्न –** ममता बॅनर्जींकडे पंतप्रधानपदाच्या क्षमता आहेत?

– हे सांगणारा मी कोण? हे लोकांच्या विवेकबुद्धीवर अविश्वास दाखवण्यासारखे आहे. लोकशाही यंत्रणेअनुसार लोकांना ठरवू देत की, सत्तेवर राहण्यास योग्य चेहरा कोण आहे आणि विरोधी पक्षाचा चेहरा कोण असेल? निवडणुकीत केवळ सरकार निवडले जाते हा समज अपुरा आहे; निवडणुकीत विरोधी पक्षही निवडले जातात. त्यामुळे विरोधी पक्षही पुन्हा निवडला गेलाच पाहिजे. सरकारच्या कामगिरीची कठोर चिकित्सा होते तशीच विरोधी पक्षांच्या कामगिरीचीही होते. तुम्ही लोकांच्या कल्पना ताडू शकलात तर तुम्ही सत्तेत जाल, सरकार म्हणून तुम्ही लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाहीत तर विरोधी बाकांवर जाल.

**प्रश्न –** कौटिल्य–चाणक्य यांनी भाजपला पछाडले आहे त्याविषयी आपण बोललो. पण चंद्रगुप्ताशिवाय कौटिल्याला अर्थ नाही. तुम्ही बिहारचेच आहात आणि बिहार कौटिल्याची कर्मभूमी आहे. तर तुम्हांला कुणी चंद्रगुप्त दिसतो का ज्याच्यामध्ये रग आहे, ज्याने सत्ता गमावली असेल; पण त्याला सत्तेची आकांक्षा आहे आणि तो लढायला तयार आहे. मलातरी असे कुणी दिसत नाही. दुसरा प्रश्न असा की, भाजपच्या मुळाशी असलेल्या हिंदुत्वाच्या विचारसरणीचा आणि भाजपच्या राष्ट्रवादाचा प्रतिकार करण्याचा काही मार्ग असू शकतो का? तो कोणता आणि त्यांना कुणी आव्हान देऊ शकेल का?

– इतर सर्वच विचारसरणींप्रमाणेच 'हिंदुत्वा'लाही मर्यादा आहेत. गेल्या वीस वर्षांतला (विशेषतः भाजप प्रबळ होऊन सत्तेत येण्याचा काळ) निवडणुकींच्या संदर्भातला डेटा पाहिला तर लक्षात येईल की, हिंदुत्वाच्या आधारावर तुम्ही ५० ते ५५ टक्के हिंदूंना एकत्र करू शकता. त्याच्यापुढे अजून भाजप जाऊ शकलेला नाही. कारण, भाजपने सरासरी ३८ टक्के मते घेतली आहेत. हे काय दर्शवते? साध्या आकडेमोडीने हे दाखवता येईल की, जिथे ८० टक्के हिंदू समाज आहे तिथे, जी कुणी व्यक्ती भाजपला मतदान करते आहे त्या प्रत्येक व्यक्तीमागे एक व्यक्ती भाजपविरोधात मतदान करते आहे. त्यामुळे, 'सगळा देश भगवा झाला', 'भाजपला जी मतदान करत नाही अशी कुणीही हिंदू व्यक्ती उरलेली नाही' अशी विधाने जे लोक करतात त्यांना मला सांगावेसे वाटते की, हा भ्रामक समज पसरवू नका. डेटा असे सांगतो की, निवडणुकांमध्ये भलेही ध्रुवीकरण झाले असेल, तरी भाजपला ५० ते ५५ टक्क्यांच्या वर हिंदू मत मिळालेले नाही. बंगालसारख्या राज्यांमध्ये जिथे मुस्लिमही बहुसंख्येने आहेत तिथे भाजपला अधिक काम करावे लागते, कारण तिथे त्यांना त्यांच्या हिंदू मतदाराची (जो त्यांनी स्वतःहून निवडला आहे) अधिक मते मिळवावी लागतात. त्यामुळे ज्या कुणाला भाजपशी लढत द्यायची आहे त्यांनी असे मानायचे कारण नाही की, आता त्यांच्याकरता हिंदू मतदार उरलेला नाही. आणि त्याकरता 'हिंदू विरुद्ध हिंदुत्ववादी', 'हिंदुत्व विरुद्ध हिंदूइझम' असल्या वायफळ चर्चा करण्याचीही गरज नाही. तुम्हांला मते मिळवण्यासाठी पुरेसे लिबरल हिंदू मतदार आहेत, जे भाजपशी असहमत आहेत.

**प्रश्न –** हे तुम्ही राहुल गांधी यांना सांगण्याचा कधी प्रयत्न केला आहे का?

– नाही. असे सांगणारा मी कोण? मी साधे निरीक्षण नोंदवतो आहे. मी काही त्यांच्याशी यावर चर्चा केलेली नाही. कारण तशी काही संधी आली नाही आणि माझाही तसा काही विचार नव्हता. माझा मुद्दा असा आहे की, डेटा आपल्याला दाखवतो की, हिंदूंकडून 'हिंदू' म्हणून ज्या प्रकारच्या वर्तणुकीची अपेक्षा भाजप करतो आहे, ते न पटलेले निदान ५० टक्के हिंदू मतदार आहेत. त्यामुळे निदान सुरुवातीला, भाजपच्या विचारसरणीशी सहमत असलेल्या मतदारांचे मतपरिवर्तन करण्यापेक्षा काँग्रेसने त्यांना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

भाजपच्या राष्ट्रवादाच्या मुद्द्याबाबत मला वाटते की, ज्या पक्षाला या देशाच्या स्वातंत्र्याचे श्रेय दिले गेले पाहिजे त्या पक्षाला आज 'राष्ट्रविरोधी' संबोधले जाते आणि तो पक्षही त्या मांडणीला प्रत्युत्तर देऊ शकत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. काँग्रेस तसे का करू शकत नाही हे माझ्या आकलनापलीकडे आहे. परंतु तुमच्या लक्षात असेल की, मोदी गुजरातमध्ये जेव्हा सत्तेत होते तेव्हाही कुणी मोदींविरोधात बोलले तर तो थेट गुजरातशी द्रोह आहे अशा पद्धतीची मांडणी केली जात असे. हेच आता देशपातळीवर चालले आहे.

**प्रश्न –** परवा बांगलादेश युद्धाला ५० वर्षे पूर्ण झाली तेव्हा एक मुद्दा माझ्या लक्षात आला की, सगळी महत्त्वाची युद्धे घडली तेव्हाही काँग्रेस पक्ष होता. अशा प्रसंगी स्मृतिपर मोठे कार्यक्रम करणे वगैरे सोडून द्या; पण निदान एखादा ज्येष्ठ काँग्रेस नेता त्या युद्धाच्या स्मृतिस्थळाला भेट देतानाही दिसला नाही.

– ...माझ्या वतीने तुम्हीच हे उत्तर देता आहात. आपल्या परंपरेवर हक्क सांगण्याचा काँग्रेसमध्ये पूर्णतः अभाव आहे. नेहरूंच्या प्रतिमेवर इतके हल्ले केले गेले, त्या विरोधात किती काँग्रेस नेत्यांनी आवाज उठवले? दिल्लीत त्यांनी पत्रकार परिषदा घेतल्या असतील, पण दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन तुम्ही सबंध भारताला संबोधित करू शकत नाही. एकाच वेळी काँग्रेसचे दोन-तीनशे कार्यक्रम जिल्हापातळ्यांवर होत आहेत असे चित्र गेल्या सात-आठ वर्षांत कधी दिसले आहे का? ७२ तासांपेक्षा जास्त काळ चाललेले देशव्यापी आंदोलन गेल्या वीस वर्षांत काँग्रेस कुठेही करू शकलेला नाही. मला असे वाटते की, काँग्रेस नेहमीच सत्ताधारी होता, त्यामुळे विरोधी पक्ष म्हणून कसे काम करायचे, ते तो अजून शिकतो आहे आणि सत्ताधारी पक्ष म्हणून कसे काम करायचे हे भाजप शिकतो आहे. त्यामुळे या अडचणी येत असाव्यात. काँग्रेसवाल्यांना अजूनही असे वाटते आहे की, लवकरच लोकांना भाजपचा कंटाळा येईल आणि मग ते काँग्रेसला मते देतील. मग आपण पुन्हा सत्तेत येऊ.

**प्रश्न –** लोकांना अक्कल येईल(!) असे त्यांना वाटते आहे?

– काँग्रेसच्या सध्याच्या विचार करण्याच्या पद्धतीअनुसार, 'काँग्रेस पराभूत होण्यात लोकांची चूक आहे; काँग्रेस कुठे कमी पडलेले नाही! त्यामुळे भाजप सरकार ज्या चुका करते आहे त्या लोकांनी स्वतःहून समजून घ्याव्यात आणि त्याचे बक्षीस म्हणून काँग्रेसला पुन्हा निवडून आणावे!' हा 'सत्ताधारी' दृष्टिकोन आहे. आतापर्यंत ते देशातला 'बाय डिफॉल्ट' सत्ताधारी पक्ष होते. त्यामुळे काँग्रेसच्या 'डीएनए'मध्येच ते आहे. मात्र त्यांनी स्वतःत बदल करायला हवा. 'सत्तेतून विरोधी पक्षात गेलेले' अशा दृष्टीने स्वतःकडे न पाहता त्यांनी स्वतःला 'विरोधी पक्ष' म्हणूनच पाहिले पाहिजे.

**प्रश्न –** माझ्या मनात असा विचार आला की, '१९७१ च्या युद्धाच्या स्मृतीनिमित्ताने जे काही कार्यक्रम झाले त्यात इंदिरा गांधींचे स्मरण केले गेले नाही,' अशी तक्रार काँग्रेस आणि इतरही अनेकांकडून केली गेली. मात्र काँग्रेस स्वतःदेखील बाबू जगजीवनराम यांचे स्मरण करण्यास विसरला. ते एक आघाडीचे दलित नेते आणि देशाचे संरक्षणमंत्री होते. काँग्रेस म्हणू शकला असता की, 'यशवंतराव आणि जगजीवनराम यांच्यासारखे दोन संरक्षणमंत्री आम्ही देशाला दिले, ज्यांनी देशासाठी दोन युद्धे लढली.' पण काँग्रेसमध्ये तरी किती जणांना हे ठाऊक आहे माहीत नाही.

– तुम्ही जगजीवनराम यांच्याविषयी सांगताहात; पण सरदार पटेल यांच्यासारख्या प्रसिद्ध नेत्याचाही वारसा काँग्रेसकडून सहज हिरावून घेतला गेला. तुम्ही तुमच्या महापुरुषांचा वारसा राखू शकत नाही, तो सहजासहजी दुसऱ्या पक्षाला त्यांचा म्हणून वापरू देता... या बाबत तुम्हांला नाही तर दुसऱ्या कुणाला दोषी धरायचे?

**प्रश्न –** इंदिरा गांधींची या बाबतीतली समज चांगली होती. त्यांनी अनेक पत्रांमध्ये सावरकरांना ‘वीर सावरकर’ असे संबोधले आहे आणि देशाचे महापुरुष (national hero) म्हणून उल्लेख केलेला आहे.

**–** स्वतःच्या बलस्थानांवर काम करण्याऐवजी काँग्रेस सावरकरांवर वाद घालण्यात आपली ऊर्जा खर्च करतो आहे. ही खेळी माझ्या मते भाजपच्या पथ्यावर पडणारीच आहे. तुमच्याच पक्षातील कित्येक महापुरुषांचा वारसा तुमच्याकडे आहे, ज्यांना आता सोईस्करपणे विस्मृतीत ढकलले जाते आहे. त्यांच्याविषयी तुम्ही का बोलत नाही? भाजपला सावरकरांच्या स्मृती साजऱ्या करायच्या आहेत तर त्यांना ते करू देत, त्याने काय आभाळ कोसळणार आहे? गांधी, नेहरू, पटेल यांच्या बाजू तुम्ही लढवू शकला नाहीत; मग सावरकरांना कोण आणि का साजरे करते आहे याविषयी बोलण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे? सावरकरांचे समर्थन करणे/न करणे हा माझा विषय नाही; माझा मुद्दा इतकाच आहे की, काहीएक रणनीती म्हणून किंवा डावपेचाचा भाग म्हणूनही काँग्रेसचे हे वर्तन फार काही साध्य करणारे नाही. सावरकर खोडून काढण्यात स्वतःची ८० टक्के ऊर्जा खर्च करण्यापेक्षा जगजीवनराम, इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण यांचा वारसा सांगण्याकडे काँग्रेसने लक्ष पुरवले पाहिजे.

**प्रश्न –** भाजपमध्ये मोदींनंतरचा चेहरा कोण असेल?

– याविषयी मला कसे सांगता येईल? हा प्रश्न तुम्ही भाजपलाच विचारला पाहिजे. भाजप स्वतःविषयीची एक चांगली बाब नेहमी सांगतो की, तो पक्ष कोणत्याही एका कुटुंबाकडून चालवला जाणारा पक्ष नाही. इतरही अनेक पक्षांनी यापासून असा धडा घेतला पाहिजे की, तुम्ही ‘विशिष्ट कुटुंबाद्वारे संचलित पक्ष’ या स्वरूपात या देशात फार काळ सत्तेत राहू शकणार नाही. केवळ काँग्रेसच नव्हे तर अनेक स्थानिक पक्षांचीही स्थिती अशीच आहे. अकाली दल स्थापन झाले तेव्हा तिथे घराणेशाही नव्हती. जे कोणी भाजपच्या या वारशाचे रखवालदार आहेत त्यांनी ज्याप्रमाणे वाजपेयी आणि अडवाणींनंतर भाजपचा नेता म्हणून मोदींना पुढे आणले तेच आता त्यांच्या नंतरचा चेहराही ठरवतील. तसेही मोदी अजून बराच काळ नेते म्हणून राहणारच आहेत.

असे म्हटले जाते की, पाकिस्तान आणि भारतात तुम्ही केवळ स्वतःच्या गुणवत्तेवर उत्तम क्रिकेटर होता. ऑस्ट्रेलियासारख्या देशात मात्र उत्तम खेळाडू तयार करणारी व्यवस्था असते. भाजपमध्ये तशी व्यवस्था आहे. तिथे नेतृत्वगुण असणाऱ्या तळागाळातील व्यक्तींना विकसित केले जाते आणि नंतर प्रत्यक्ष कामाची संधी दिली जाते.

**प्रश्न –** भारतीय क्रिकेटमध्ये नेतृत्वाला मारक अशी व्यवस्थाही आहे, सध्या तसेही घडते आहे.

– तुम्ही नव्या व्यक्तीला पुढे आणता आहात आणि प्रस्थापित नेतृत्व स्वतःहून बाजूला होण्यास तयार नसेल तर तुम्हांलाच त्यांना तिथून हटवावे लागेल.

**प्रश्न –** राजकारणाव्यतिरिक्त तुमचे व्यक्तिगत ध्येय काय आहे?

– बिहारच्या लोकांसाठी काहीतरी चांगले करण्याची माझी इच्छा आहे. भारतातील १०-१२ टक्के लोकसंख्या बिहारमध्ये आहे. नितीशकुमारांच्या काळात तिथे काही प्रमाणात विकास झाला असला तरी एकंदर भारताच्या तुलनेत बिहार सगळ्या ‘डेव्हलपमेंटल पिरॅमिड्स’च्या तळाशी आहे. तिथे ‘हळूहळू वाढत जाणारे’ असे नाही तर मूलतः परिवर्तनवादी असे काम मला करायचे आहे.

(शब्दांकन व अनुवाद : सुहास पाटील,
Mob. 8668870869)

संवादक : **शेखर गुप्ता** आणि **नीलम पांडे**

(२०१४ मध्ये नरेंद्र मोदी व भाजप यांच्यासाठी लोकसभा निवडणुकीची प्रचार मोहीम आखण्यात व राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारी व्यक्ती व संस्था म्हणून प्रशांत किशोर व त्यांची आयपॅक देशभर प्रसिद्धीच्या झोतात आले. त्यानंतरच्या साडेसात वर्षांत त्यांची चर्चा चढत्या क्रमाने होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशांत किशोर यांची मुलाखत २२ डिसेंबर २०२१ रोजी ‘द प्रिंट’ या डिजिटल पोर्टलवरून प्रसारित झाली. तब्बल एक तासाची ही ऑडिओ, व्हिडिओ मुलाखत यू-ट्यूबवर उपलब्ध आहे. या मुलाखतीत काँग्रेस पक्षाच्या अवनितीचे आणि भाजपच्या घोडदौडीचे केलेले विश्लेषण तर महत्त्वपूर्ण आहेच, पण त्याहून अधिक महत्त्वाचे आहे या मुलाखतीतून पुढे आलेला राजकीय दृष्टिकोन. म्हणून मुळात हिंदी इंग्रजीत असलेली ही संपूर्ण मुलाखत शब्दांकन व अनुवाद करून प्रसिद्ध करीत आहोत. .... संपादक)

लेख

तेजस्विनी देव

# नरहर कुरुंदकर : आठवणीतले बाबा



आपण काय गमावले आहे हे हळूहळू समजायला लागले. संस्थात्मक कार्याचे झालेले नुकसान, बाबांनी समर्थन केलेल्या आणि पाठिंबा दिलेल्या उदारमतवादी पुरोगामी चळवळींची झालेली हानी, व्याकूळ विद्यार्थी आणि पोरके झालेले तरुण लेखक; साहित्य, सांस्कृतिक, वैचारिक जगताची भरून न येऊ शकणारी हानी या सगळ्यांबद्दल इतके लिहिले गेले आहे की याच्या आड आमचे वैयक्तिक दु:ख, न भरून येणारे पोरकेपण दबलेलेच राहिले. कधीकधी वाटायचे की त्यांचे स्नेही, विद्यार्थी त्यांच्याबद्दल भरभरून बोलताना ते स्वत: कसे बाबांचे लाडके होते, आम्हां कुटुंबीयांपेक्षा बाबांच्या सहवासात जास्त होते, त्यांना बाबा जास्त समजत होते हेच चढाओढीने सांगू पाहत असतात. आश्चर्य याचे वाटे की यापैकी कुणालाही आपल्या वैयक्तिक हानीपेक्षा कुटुंबीयांची हानी न भरून येणारी असेल याची जाणीवही नव्हती.

माझ्या आठवणीतले बाबा म्हणजे पांढरे धोतर आणि पांढरा सदरा घातलेले, कायम लोकांच्या गराड्यात, त्यांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू असलेले, हास्यविनोद, चर्चेत रमलेले, एक उंच, मध्यम वयीन गृहस्थ असे होते. जेव्हा त्यांना भेटायला कोणी आलेले नसे; तेव्हा ते आमच्या बैठकीतील त्यांच्या डेस्कसमोर बसून लिहीत किंवा वाचत असत. त्यांची स्मरणशक्ती आणि एकाग्रता अत्यंत विलक्षण होती. घरातल्या रहाटगाडग्याने निर्माण होणारे आवाज असोत वा आगंतुक पाहुण्याच्या आगमनाने आलेला अडथळा, ते सहजतेने परत आपल्या वाचनात गढून जात किंवा लेखनिकाला सांगितलेल्या शेवटच्या शब्दापासून अचूकतेने सुरुवात करीत. महत्त्वाच्या कामासाठी किंवा अभ्यासासाठी आपण जसे दार बंद करून एकांत निर्माण करण्याचा प्रयत्न करतो, तसे

करताना मी त्यांना कधीही पाहिले नाही. त्यांच्या लांबसडक, निमुळत्या, मऊसूत, सुंदर बोटांशी खेळायला मला खूप आवडत असे. मला त्यांचे हात खूप लांब वाटत असत. आणि मी जेव्हा जेव्हा त्यांची बोटे माझ्या छोट्याश्या मुठीत घेऊन घेऊन बसे तेव्हा कोणी तरी आवर्जून सांगे, की लांबसडक बोटे ही त्या व्यक्तीच्या कलात्मकतेची आणि सर्जनशीलतेची लक्षणे असतात. अशा वेळी मी त्यांच्याकडे अभिमानाने पाहत असल्याचे मला अजून आठवते.

माझी पहिली आठवण मी प्राथमिक शाळेत असतानाची असेल. एके दिवशी आमच्या घरी खूप सारे लोक मोठेमोठे फुलांचे हार, गुच्छ घेऊन आले आणि बाबांचे अभिनंदन करायला लागले, तेव्हा कळले की ते जिथे शिकवत असत त्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून निवडले गेले आहेत. खरे तर त्यापूर्वीच ते शहरातील दोन-तीन शिक्षणसंस्थांच्या कार्यकारिणीवर महत्त्वाच्या पदांवर होते. त्या संस्थांच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान होते. सोबतच ते एक विचारवंत, लेखक आणि समीक्षक म्हणून प्रस्थापित झाले होते. मराठी सारस्वतात त्यांच्या नावाचा आदरयुक्त दरारा होता. त्यांच्या अनेक पुस्तकांना प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरविले गेले होते. अनेक साहित्य संमेलनांतील परिसंवादात आणि प्रतिष्ठित व्याख्यानमालांमधून त्यांची भाषणे होत असत.

मराठवाड्यातल्या आणि बाहेरच्या अनेक साहित्य चळवळींना त्यांचा आधार होता. आडबाजूला असलेल्या मराठवाड्यातील अनेक नवीन लेखक आणि कवी यांच्या पुस्तकांना प्रस्तावना देत, प्रकाशक शोधून देण्याचा त्यांचा अविरत प्रयत्न चालू असे. ते एक विद्यार्थिप्रिय शिक्षक होते. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासोबत विद्यार्थ्यांना त्यांच्या अडीअडचणीच्या काळात वैयक्तिक पत वापरून आणि आर्थिक झीज सोसून मदत करीत. या बाबतीत आयुष्यभर ते एखाद्या शाळेतल्या मास्तरासारखेच वागले. आपल्या विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवण्यासाठी त्यांनी खस्ता खाल्ल्या. त्यांच्या आधाराने अनेक विद्यार्थी व्यक्तिगत आणि व्यावसायिक आयुष्यात अनेक संकटांना धीराने सामोरे जाऊ शकले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण वक्तृत्वशैलीत राजकारण, इतिहास, संस्कृती ते शास्त्रीय संगीतापर्यंत अनेक विषयांवर सहजतेने आणि अधिकारवाणीने मांडणी करत, त्यातील मूलभूत विचार आणि नावीन्यपूर्ण विश्लेषणाने श्रोते भारावून जात असत. खरे तर हे सगळे मला तेव्हा माहीत नव्हते आणि कळत नव्हते. इतके मात्र नक्की लक्षात आले होते की, आपले बाबा इतरांपेक्षा वेगळे आणि महत्त्वाची व्यक्ती आहेत. कधी कधी वाटते की विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर केलेले प्रेम आणि बाबांचा शिकवण्यातला आनंद पाहूनच माझ्या मनावरही प्राध्यापक बनायची मोहिनी पडली असेल का?

दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत बहुतेक वेळा ते एकटेच बरेच दिवस बाहेरगावी जात असत. एकदा ते आईला घेऊन मुंबईला गेल्याचे मला आठवते. मुंबई मराठी साहित्य संघाने आयोजित केलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. त्या वेळी पहिल्यांदा आणि बहुधा एकदाच आमची आई त्यांच्या सोबत व्यासपीठावर बसली होती आणि बाबांचा सत्कार व मोठेपणा यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा योग तिला आला असावा. इतर कोणत्याही कार्यक्रमाला आई-बाबा एकत्र गेल्याचे आठवत नाही. मी आईला सोडून पहिल्यांदाच एकटी, भावंडांसोबत राहिली असल्याने हा प्रसंग माझ्या आठवणीत राहिला.

बाबा लिहीत किंवा वाचत असताना काही तरी अत्यंत महत्त्वाचे कारण असल्याशिवाय त्यात व्यत्यय आणायचा नाही, हा आमच्या घराचा एक सर्वसामान्य नियम होता. आमच्या शंका ते अत्यंत शांतपणे ऐकत असत. त्यावर लगेचच त्यांचे मत सांगत किंवा कधीकधी 'नंतर आठवण कर मी समजावून सांगीन,' असे म्हणायचे. पण आमच्या शंका, अडचणी ते नेहमीच सोडवत असत. त्यांच्या कामात व्यत्यय आणल्याबद्दल बाबा आमच्यावर कधीही ओरडले किंवा रागावल्याचे मला आठवत नाही. ते घरात असताना त्यांना काही त्रास होणार नाही याची आमची आई कटाक्षाने काळजी घेत असे, म्हणून बाबा रागवण्याचा प्रसंग कधी आला नसावा. आम्ही भावंडे तशी शिस्तीची होतो. मला मात्र त्यांचे लक्ष वेधून घ्यायला आवडत असे. ते माझे आहेत, त्यांच्याशी गप्पा माराव्यात, गोष्टी शेअर कराव्यात असेही वाटे. पण विनाकारण त्यांचा वेळ खाऊ नये अशी कुठेतरी जाणीवही असायचीच! त्यांना शंका विचारणे, अवघड शब्दांचे (साधे शब्दही तेव्हा माझ्यासाठी अवघड होऊन जात)

अर्थ विचारणे यासाठी मी बऱ्याच वेळा त्यांच्याकडे जाई. ते नेहमीच लिहीत किंवा वाचत असतात नाही का? त्यात काय वेगळे, असे मला वाटे आणि ते सहसा नाराज करायचे नाहीत- काहीही फुसके प्रश्न विचारले तरीही.

एखादी पाणी भरलेली जड बादली स्वयंपाकघरात उचलून नेऊन देणे किंवा घट्ट बसलेल्या डब्यांची झाकणे कधीमधी उघडून देणे याशिवाय त्यांना घरात काही काम करताना मी कधी पाहिले नाही. पण दोऱ्याच्या रिळाचा झालेला गुंता सोडवायला आम्ही त्यांना देत असू आणि तेही अत्यंत चिकाटीने तो गुंता सोडवून देत असत हे मला आठवते. माझ्या आईला त्यांच्या या चिकाटीने व संयमाने अवघड समस्या सोडवण्याच्या क्षमतेचे फार कौतुक होते. माझ्या भावाला (विश्वासला) सायकल चालवताना झालेल्या एका अपघातात, जेव्हा त्याच्या टाचेवरून बैलगाडी गेली होती; तो प्रसंग त्यांनी अत्यंत ममतेने आणि हळुवारपणे हाताळल्याचे मला आठवते.

मी बाबांना अनाठायी त्रास देणार नाही; याची काळजी घेण्यास माझी सगळ्यांत थोरली बहीण आणि आई अत्यंत दक्ष असत. बैठकीत कोणी बाबांना भेटायला आले असतील, बाबा लिहीत असतील किंवा लेखनिकाला सांगत असतील तर अगदी हळू, शांतपणे प्रवेश करायचा किंवा बैठकीतून न येता मागल्या दाराने घरात यायचे अशी आम्हाला सूचना असे. पण बऱ्याच वेळा ही सूचना पूर्णपणे विसरून मी सर्वांसमोरून धावत-पळत, गोंधळ घालत बैठकीतून घरात येत असे. बैठक ओलांडली की समोर माझी थोरली बहीण ''आता या बेशिस्त मुलीचं काय करायचं?'' अशा आविर्भावात माझ्याकडे रागाने पाहत असल्याचे दिसायचे.

बाबांच्या चहा, जेवणाच्या वेळा ठरलेल्या असत. ते आपल्या वस्तू / पुस्तक विशिष्ट जागी ठेवत असत आणि त्या तशाच राहाव्यात असा त्यांचा कटाक्ष होता. त्यांना विचारल्याशिवाय त्यांच्या वस्तूंना आणि पुस्तकांना अजिबात हात लावायचा नाही, अशी आमच्या आईची आग्रही सूचना असे. तरीही मी मात्र बऱ्याच वेळा त्यांच्या दाढी करण्याच्या ब्लेडने पेन्सिलींना टोक करून त्या ब्लेड खराब करे, कधीकधी लिहिण्यासाठी त्यांचे फाउंटन पेन वापरत असे. मी वापरल्यानंतर त्या पेनचे वळण कसे बदले आणि बाबांच्या ते कसे लक्षात येई, हे मला नेहमीच कोडे होते. पेन्सिल, पेन पाहिजे तेव्हा मिळतील अशा ठिकाणी ठेवण्याइतकी व्यवस्थित आम्ही मुले नव्हतो. कोणी पाहत नसताना त्यांच्या खोलीत गुपचूप जाऊन पाहिजे ती वस्तू उचलून आणणे खूपच सोयीचे होते. या एकमेव बाबतीत बाबांनी मला रागवल्याचे मला आठवते. इतर सर्व खोड्या ते खपवून घेत असत. अशा प्रसंगी त्यांच्या नजरेचा तीक्ष्ण कटाक्ष आणि आवाजातील तीव्र नाराजी- ''तुला किती वेळा सांगितले की माझ्या वस्तूंना हात लावू नकोस म्हणून? तू वस्तू कधी परत जागच्या जागी ठेवत नाहीस,'' असे म्हणणे मनाला एकदम अपराधी करून टाके! मग थोडा वेळ तोंड पाडून इकडे तिकडे फिरायचे की आई म्हणायची ''जाऊ दे पुन्हा नको करूस, बस आपण निवांत खेळायला मोकळे!'' परत काही दिवसांनी, 'ये रे माझ्या मागल्या' या उक्तीप्रमाणे. मला वाटे की फक्त पेन, ब्लेड किंवा नेलकटर तर आहे. आपण घेऊ, वापरू आणि परत ठेवून देऊ, त्यांच्या पेनचे वळण खूप छान असे, बाबांना कळणारसुद्धा नाही. पण त्यांना ते लक्षात येत असे आणि परत बोलणी खावी लागत. त्यांची पुस्तके आणि कागदपत्रे विस्कटायची नाहीत याची आम्हाला जाणीव होती. एक मात्र आवर्जून सांगितले पाहिजे की घरातील सर्व पुस्तकांना हात लावायला, वाचायला आम्हाला मोकळीक होती. फक्त अट एवढीच होती की, विचारून घ्यायचे आणि वाचून झाले की त्याच जागी ठेवायचे.

माझे बालपण अक्षरशः पुस्तकांच्या गराड्यात गेले. वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तके वाचणे ही एक जणू नैसर्गिक बाब होती. काही गंभीर आणि जाडजूड ग्रंथ, कथासंग्रह, कवितासंग्रह, आणि ललित साहित्य असे सगळे साहित्यप्रकार होते. परीक्षण करण्यासाठी प्रकाशकांनी पाठवलेली पुस्तके, प्रस्तावना लिहिण्यासाठी आलेली लेखकांची हस्तलिखिते, साधना, अनुष्टुभसारखी साप्ताहिके /नियतकालिके, मासिके, या सगळ्यांसोबत आम्हा भावंडांसाठी 'किशोर' आणि 'चांदोबा' मागवले जात असत. या सगळ्यांत वेगळी दिसणारी मराठीत भाषांतरित केलेली रशियन पुस्तकेही मला आठवतात. याशिवाय मग दिवाळी अंकांची रेलचेल असेच! एके वर्षी सुट्ट्यात मी शरदचंद्र चटर्जी यांच्या सहा-सात कादंबऱ्या वाचून काढल्या होत्या. मला फार काही कळले नव्हते, तरीही त्या नायक- नायिकांची चांगलीच भुरळ पडली

होती. या कादंबऱ्यांनी माझी थोरली बहीण श्यामल खूप भारावून गेल्याचे मला आठवते.

बाबांनी आमच्यासाठी साने गुरुजी, राजा मंगळवेढेकरांनी लिहिलेला बिरबल, टारझनचा संच, इसापच्या कथांचे संच मागवले होते. विविध साहित्यप्रकारांत दरवर्षी प्रकाशित होणारी सर्वोत्तम पुस्तके ठरवणाऱ्या शासकीय समितीच्या मंडळावर ते होते. एका उन्हाळ्याच्या सुट्टीत आमच्या घरी पोते भरून नवीन, कोऱ्या पुस्तकांचे गठ्ठे येऊन पडले. त्यांत कविता, कादंबऱ्या, नाटके, वैचारिक, बाल-कुमार साहित्य असे सर्व काही ठासून भरलेले होते. त्या कोऱ्या करकरीत पुस्तकांचा गंध अजून माझ्या मनात दरवळतो. मला आठवते की, आमच्या बैठकीच्या गार फरशीवर लोळत संपूर्ण दुपारभर पुस्तके वाचली होती. जोपर्यंत पुस्तके काळजीपूर्वक हाताळली जातील आणि योग्यरीत्या परत ठेवली जातील, तोपर्यंत कोणालाही ज्यात स्वारस्य वाटेल ते वाचू शकत असे. खरे तर ही एक मोठी पर्वणीच होती. पण त्या वेळी ही एक सामान्य गोष्ट वाटत असे. आम्हां चौघांही भावंडांना वाचायला आवडत असे. आणि मला आठवते की कधीकधी आमच्या प्रत्येकाच्या नाकासमोर कायम, अगदी जेवतानाही पुस्तक पाहून माझ्या आईला फार राग येत असे, ती म्हणायची ''कायम थोबाडापुढे पुस्तक, नाकात घास जायचा... जेवणाकडे लक्ष द्या!''

कधी कधी सायंकाळी शाळेतून घरी परतताना माझे वडील त्यांच्या महाविद्यालयातून परतीच्या रस्त्यावर चालत घरी जाताना दिसायचे. एका खांद्यावर त्यांची शबनम पिशवी लटकत असे आणि दुसऱ्या हातात एक पुस्तक. ते रस्त्यावर चालत जात असताना पुस्तक वाचत जायचे. माझ्या मैत्रिणींना ते कोणीतरी मोठे 'गुरुजी' आहेत हे माहीत होते तरी अशा पद्धतीने रस्त्याने वाचत जाण्याची गम्मत वाटत असे. आणि जणू मला दिसलेच नाहीत असे समजून त्या सगळ्या त्यांच्याकडे बोट दाखवून मला सांगत, ''हे बघ, बघ, तुझे बाबा!'' पण खरे सांगू का? त्यांना असे जाताना पाहून मला खूप अभिमान वाटत असे. हे असे रस्त्यावरून वाचत जाणे विचित्र आहे असे मला कधीच वाटले नाही.

माझे बालपण अत्यंत आनंदी, सुरक्षित आणि मजेचे होते. सगळे आयुष्य शाळा, पुस्तके, मैत्रिणी, भावंडे यांच्या भोवती फिरत होते. आमच्या प्रत्येक गोष्टीत सहसा माझी आईच निर्णय घेत असे, तरी बाबांचे आमच्यावर लक्ष असायचेच. ते संध्याकाळी घरी पोहोचेपर्यंत आम्ही सर्वांनी घरी असावे अशी त्यांची अपेक्षा असे. आमच्यापैकी कोणीही अंधार पडल्यानंतर जर घरात गेले तर बैठकीत बसलेल्या लोकांसमोर ते बोलले जरी नाहीत तरीही त्याच्या डोळ्यांत एक प्रश्नचिन्ह नक्कीच असे. आमच्या बंगल्याचा अर्धा भाग भाड्याने दिला होता. पण घराभोवती एक मोठी बाग आणि गच्ची असल्याने मैत्रिणी जमा करून खेळत बसणे फारच सोपे होते.

भाग्यनगर हा त्या वेळचा शांत आणि निवांत परिसर होता. जवळजवळ प्रत्येक जण इतर सर्वांना ओळखत होता. आम्ही दररोज संध्याकाळी मित्रमैत्रिणी एकत्र खेळत होतो. त्यामुळे आमची खूप चांगली मैत्री झाली होती. मैत्रिणींच्या घरी पोहोचण्यासाठी आम्ही एकीच्या अंगणातून दुसरीच्या अंगणात जाताना कुंपणाच्या तारा फाकवून सहजपणे ओलांडून जात असू आणि कोणी आम्हाला रागवायचे नाही. गणेशोत्सव आणि शारदोत्सव साजरे करताना सगळ्यांच्या बागांमध्ये आम्हांला मुक्त प्रवेश होता. या दहा दिवसांत पूजेसाठी हार बनवायला कोणाच्याही बागेत जाऊन सुवासिक फुले जमा करायचो. या उत्सवांत सोसायटीच्या लहानथोरांच्या सहभागातून संपूर्ण होणाऱ्या एकांकिका आणि नाच या सांस्कृतिक कार्यक्रमांत मी नेहमीच पुढे असायचे. महिनाभर प्रॅक्टिस चालायची. बाबा आवर्जून माझा कार्यक्रम बघायला येत. दूरदर्शन सुरू होण्याआधीचे दिवस होते. त्या दिवसांत आजूबाजूचे बरेच नागरिक असे सांस्कृतिक कार्यक्रम बघायला जमायचे. मला आठवते की त्यांनी एकदा माझे नाटक रस्त्यावर, शेवटच्या प्रेक्षकांच्या गर्दीमध्ये उभे राहून पाहिले होते. मला वाटले की ते आलेच नाहीत. ते कार्यक्रमाला आले होते याची खात्री देण्यासाठी त्यांनी जेव्हा नाटकातील माझे संवाद उद्धृत केले तेव्हा मला झालेला आनंद आठवतो. त्यांना गर्दीत उभे राहावे लागल्याबद्दल मला वाईटही वाटले होते. मी त्यांना म्हणाले होते की जर ते थोडे आधी आले असते तर त्यांना बसण्याची एक छान जागा सापडली असती. पण त्यांच्या मागे असलेल्या अनेक व्यवधानातून वेळ काढून ते कसे आले असतील याची मला अजिबातच जाणीव नव्हती.

(मला वाटे, यांची कामे नेहमीच असतात, माझे नाटक तर फक्त गणपतीतच!)

आता आपल्या बहुतेकांच्या घरी पोस्टमन येत नाही. पण त्या काळी आमच्या घरी पोस्टमन रोज येत असे. कधीकधी तरी तर ते गमतीने म्हणत असत की, तुमच्या घरी येऊन गेलो की माझे निम्मे ओझे कमी होते. बाबांना पत्रे खूपच येत असत. पण अगदी अपुरा पत्ता असलेली पत्रेसुद्धा आमच्या घरी पोहोचत. फक्त बाबांचे नाव आणि नांदेड एवढेच लिहिलेली अनेक पत्रे आलेली मी स्वतः पाहिली आहेत. आम्हांला गम्मत वाटत असे, पण अभिमानही होता की सगळे बाबांना ओळखतात. आलेली मासिके उघडून वाचण्याची आम्हां भावंडांत चढाओढ असे, पण पत्र मात्र कोणीही फोडत नसे. इतरांची पत्रे वाचायची नसतात हे वेगळे शिकवावे लागले असे कधी वाटले नाही.

घरचा बाजारहाट करण्याची जबाबदारी आईकडेच होती. बाबांनी त्यात कधी लक्ष घातले नाही. कधीकधी तर त्यांच्या सदऱ्यासाठी कापड आणून शिंप्याकडे आईच नेऊन देत असे. बाबांचे माप त्याच्याकडे सांभाळून ठेवलेले असेच! कपडे शिवून घरी येत. पण दिवाळीचे फटाके आणण्याचे काम त्यांच्याकडे होते. बाबा मला आणि विश्वासला घेऊन फटाके आणायला जात. त्यांना खूप लोक ओळखायचे, दुकानदार वाकून नमस्कार करायचे आणि स्वतः उठून सामान काढून द्यायचे हेही नवलाईचेच वाटायचे. त्यांच्याबरोबर बाहेर फिरायला जायचे प्रसंग वर्षातून दोन/तीन वेळाच येत असावेत. महालक्ष्मीचा सण, दसरा, दिवाळी, या सणांना आमच्या आजी-आजोबांना भेटायला आम्ही बाबांसोबत बसने वसमतला जात असू. याशिवाय बाबांबरोबर आमचा एक आइस्क्रीम खाण्याचा वार्षिक कार्यक्रम असे. नांदेड येथील जनता कोल्ड ड्रिंक हाऊसमध्ये जाऊन आम्ही सगळे आम्हाला पाहिजे ते आणि वाटेल तितके आइस्क्रीम बिना रोकटोक खात असू. आइस्क्रीम खाणे झाल्यानंतर कधीकधी सिनेमा पाहायला जात असू. बाबांसोबत मी एकदा गणेश टॉकीजमध्ये 'लॉरेल अँड हार्डी', कधीतरी दादा कोंडकेंचा एक सिनेमा, आणि एकदा बाकी सगळी भावंडे दुसरा सिनेमा पाहायला गेले असताना मी आई-बाबांसोबत 'धर्मात्मा' पाहिल्याचे आठवते.

त्यानंतर रोजच्या कामाला जेव्हा आईने सुरुवात केली तेव्हा ती पूर्णपणे बदलली होती. तिच्या डोळ्यांतील चमक, चालीतली धमक आणि ओठावरली गाणी कायमची हरवली होती. त्या पंधरवड्यात माझा भाऊसुद्धा लक्षात येईल एवढा बदलून गेला. बाबांचे अंत्यविधी करून गोवर्धन घाटावरून परत आलेला माझा भाऊ अचानक मोठा, जबाबदार झालेला दिसायला लागला. आजी रात्री झोपेतही रडत असल्याचे मला आठवते. आजोबा सांत्वनाला येणाऱ्या लोकांना आयुष्यभर वाचलेल्या भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान सांगत बसायचे. कदाचित तो त्यांचा आपले दुःख लपवण्याचा मार्ग होता, किंवा स्थितप्रज्ञ बनायचा प्रयास असावा. त्यांचा शब्द न् शब्द मला पोकळ वाटायचा, उसने अवसान म्हणतात ना तसे!

आईबाबांनी क्वचितच एकत्र प्रवास केला असेल. बाबा कधीकधी दोन-तीन आठवडे प्रवासात असायचे, त्यांचे कार्यक्रम, व्याख्याने आधीच ठरलेली असायची. बाबांच्या साताऱ्याच्या मित्रांच्या आग्रहाखातर असेल किंवा त्यांनाच आईला घेऊन जावे वाटले असेल, पण एक दुर्मिळ आठवण आईबाबा एकत्र सहलीला गेल्याची आहे. सगळ्यांत लहान असल्याने मलाही न्यायचे ठरले असावे. पंढरपूर, कोल्हापूर, सांगली आणि शेवटी सातारा असा आमचा प्रवास ठरला. पंढरपूरला विठ्ठलाचे दर्शन घेतले. सकाळी सकाळी चंद्रभागा नदी पाहिली. पण साताऱ्याला येईपर्यंत मला अचानक चांगलाच ताप चढला. मग आई आणि ज्यांच्या घरी आम्ही गेलो होतो त्या (विश्वास दांडेकर यांच्या पत्नी) दांडेकर काकू, दोघीही जणी माझी शुश्रूषा करण्यात अडकल्या. मग कुठचे फिरणे आणि कुठची मौजमजा! माझ्या शेजारी बसून दांडेकर काकूंनी-त्यांनी केलेले किती तरी बेत मला सांगितले. कोणते किल्ले पाहायचे ठरले होते, कोणती पक्वान्ने खाऊ घालायचे ठरवले होते, ''पण आता तू आजारी पडल्याने ते काही

होणार नाही, तू पुढच्या वेळी आलीस ना की आपण हे करू'', अशी त्यांनी माझी समजूत घातली. त्या माझी समजूत घालत असतील का स्वतःची आणि आईची- असा मला आता प्रश्न पडतो. खैर, ती पुढची वेळ अर्थातच कधी आलीच नाही. तेव्हा मला जाणवले नाही, पण नंतर मोठे होताना समजले की माझ्या आईने या सहलीची किती वाट पहिली असेल, बेत केले असतील. माझ्या अचानक आजारी पडण्याने सगळ्यांचाच हिरमोड झाला. बाबा गेल्यानंतर कधी बोलता बोलता हा विषय निघाला की मला जाम अपराधी वाटायचे. एरवी मी चांगली धडधाकट होते. तेव्हाच नेमके काय झाले देव जाणे!

मघाशी वर्णन केलेले बाबांसोबत प्रवास, पाहिलेले सिनेमे आणि फटाके आणणे या बहुतेक सगळ्या घटना माझी थोरली बहीण श्यामल हिच्या १९७९ मध्ये झालेल्या लग्नाआधीच्या होत्या. यानंतर त्यांची व्यवधाने आणि कामे खूपच वाढली, त्यांना वेळ मिळत नसे. श्यामलचे लग्न हे आमच्या घरचे पहिले कार्य आणि माझ्यासाठी एक अत्यंत आनंदाचा समारोह होता. या लग्नानंतर जवळपास एक महिनाभर मी आणि माझ्या तीन-चार मैत्रिणी उरलेल्या बुंदीच्या लाडवांवर ताव मारत होतो. या कार्यक्रमाला आलेले हजारो लोक, त्या सोबत एक मैत्रीपूर्ण व सौहार्दाच्या वातावरणात, हास्यविनोदात रमत, गाण्यांच्या भेंड्या खेळत केलेली सगळी कामे आणि पाहुण्यांना सोयी पुरवण्यासाठी आपल्या घराचे कार्य म्हणून काम करणारा मित्रपरिवार याबद्दल इतर अनेक जणांनी बरेच लिहिले आहे, म्हणून मी परत त्याबद्दल लिहीत नाही. तेव्हा मला प्रत्येक फोटोत मी असायलाच हवे अशी काय हौस होती देव जाणे! पण त्या लग्नात प्रत्येक ग्रुप फोटोत कुठे ना कुठे मी डोकावताना दिसतोच. माझी दुसरी बहीण रेवा, तिच्या १९८१ मधील लग्नापर्यंत माझी फोटोची अपूर्वाई खूपच कमी झाली होती. आजकाल सगळ्यांना फोटो काढणे, शेअर करणे इतके नित्याचे झाले आहे, किती तरी मित्रमैत्रिणी त्यांचे वडिलांसोबतचे फोटो समाजमाध्यमांवर पोस्ट करतात, भरभरून लिहितात तेव्हा मनाच्या कोपऱ्यात ईर्षा वाटते आणि बाबांसोबत आपला एकटीचाच असा एकही फोटो नाही याचे खूपच वाईट वाटते.

श्यामलच्या लग्नानंतर आम्ही सगळे, अगदी आजी-आजोबा आणि काकांच्या कुटुंबीयांसमवेत कुलाचार करायला आंब्याची आई, टोकाची आई या ग्रामदेवता आणि पोखर्णी येथील आमचे कुलदैवत असलेल्या नृसिंहाच्या मंदिरात गेलो होतो. यातल्या प्रवासाचा काही भाग अगदी बैलगाडीतून केला होता. या सहलीतील प्रत्येक क्षण नि क्षण माझ्यासाठी फारच आनंददायी होता. पहिल्यांदाच मी बाबांना सगळ्यांसोबत खेळताना, हास्यविनोदात रमलेले पाहत होते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे, लवकरच रेवतीचे लग्न झाले आणि त्यानंतर ते वाढत्या जबाबदारीमुळे फारसे आमच्या वाट्याला आले नाहीत आणि त्यानंतर वर्षभरात त्यांचे आकस्मिक निधन झाले नि मग आमचे जगच बदलून गेले.

बाबांचे दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचे कार्यक्रम खूप आधीपासून ठरलेले असत. या काळात ते महाराष्ट्रभर व्याख्यान देण्यासाठी फिरत असत. प्रवासात असताना बाबा आम्हांला नियमितपणे पत्र पाठवत असत. आपल्या पत्रात ते पुढच्या मुक्कामाचा पत्ताही देत असत आणि तिथे आम्हीही पत्र पाठवावे अशी त्यांची अपेक्षा असे. जर तीन /चार दिवसांत आमच्याकडून पत्र मिळाले नाही तर त्यांचे आईला जरा रागात किंवा कुरकुरवजा पोस्टकार्ड येई. फोन, इंटरनेटसारख्या सुविधा नसलेल्या आणि रेल्वे, बससहित एकूणच जीवनाचा संथ वेग असलेल्या त्या काळात बाबांची पत्रे हा आमच्या जीवनाचा एक मोठा भावनिक आधार होता. ते मजेशीर पत्र लिहायचे, त्यांची खुशाली कळायची आणि आम्हांला करमणूकही व्हायची.

वेगवेगळे विषय अगदी मुळातून, तासन्तास समजून सांगणे हा त्यांच्या आवडीचा भाग होता. कधीकधी आई काळजीपोटी त्यांना विचारे, ''तुम्ही इतके का समजून सांगता? ज्या माणसाने प्रश्न विचारला त्याला तरी ही सगळी माहिती समजून घेण्यात रस असतो का?'' बाबा म्हणत की माझ्या विद्यार्थ्यांनी यातील १० टक्के जरी समजून घेतले तरी मला आनंद आहे. गरजू विद्यार्थ्यांसाठी, नवोदित लेखकांसाठी आमच्या घराची दारे कायम उघडी असत. बाबांच्या सगळ्या उपक्रमांमधून त्यांची मराठवाड्यातील समाजाला सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या उभारी देण्याची तळमळ आणि बांधिलकी जाणवत असे. लोक कॉलेजमध्ये, घरी येऊन बोलत

असतच, पण बाबांना घरी वेळ नसेल तर कॉलेज ते घर किंवा घर ते कॉलेजला त्यांच्या सोबत चालत चालत आपली कामे, अडचणी शेअर करत जायचे.

बाबा घरी असताना त्यांच्या असण्याचे दडपण किंवा धाक कधीच नसायचा. उलट त्यांच्या भोवती आम्ही सगळे खुशीत असायचो. बाबा लिहीत किंवा वाचत असतील तर तेव्हा आम्ही सगळे आवर्जून शांतता राहील याची काळजी घेत असू. ही शांतता भारावून टाकणारी असे. लेखनिकाला डिक्टेशन देत असताना बाबांचा धीर–गंभीर स्वर वातावरणात भरून जात असे. बाबा लिहीत किंवा वाचत नसतील तर घर चैतन्याने सळसळत असे. त्यांचे लाडके विद्यार्थी, नवलेखक किंवा प्रथितयश साहित्यिक, इतिहासकार, असे वेगवेगळ्या विषयांत रस असलेले लोक बाबांच्या बैठकीत समोर बसलेले असत. त्यांच्यात होणाऱ्या हजरजबाबी आणि मिस्कील चर्चांमधून हास्याचे फवारे उडत असत. या चर्चांमधून बाबा आपले विचार मांडत, त्यांच्या प्रवासातील रंगतदार अनुभव सांगत. आलेले लोक तासन्‌तास बसून राहत. रात्री उशीर व्हायला लागला, तर घरातील सगळ्यांत लहान मुलगी म्हणून मला बैठकीत जाऊन जांभया देणे, कंटाळा आला असे दाखवण्याचे काम, आई किंवा मोठी बहीण देत असे. ते लक्षात येऊन लोक नाइलाजाने उठून जायला लागत.

बाबा आमच्या सर्वांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू होते. मी लहानच होते. पण त्या काळातल्या माझ्या आठवणी मनात अत्यंत ताज्या आहेत. कारण बैठकीत बाबांच्या बाजूच्या एका कोपऱ्यात बसून मी एकाग्रतेने सगळ्या चर्चा ऐकत असे. कदाचित आम्हां कुटुंबीयांना आणि मी सगळ्यांत धाकटी म्हणून ते आमच्या वाट्याला न येण्यातून काढलेला, त्यांच्या सहवासात राहण्याचा हा माझा मार्ग असावा. कधी सहज बोललेले काही वाक्य, एखादा विनोद किंवा लाडाने माझ्या टोपण नावाने बोलवून पाणी आणायला सांगणे याचे मला अप्रूप होते. मी एक हुशार मुलगी होतेच, बाबांकडे आलेला एखादा पाहुणा किंवा विद्यार्थ्याने जर माझ्या वाचनाचे कौतुक केले आणि म्हटले, ''ही एक दिवस तुमचं नाव नक्की मोठं करणार आहे,'' की मी फुशारून जायचे.

इतिहास असो, विज्ञान असो किंवा राजकारण वा



साहित्य– मला शाळेतील वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धेत भाग घ्यायचा असला की बाबांशी अर्धा तास गप्पा मारल्या की झाले... डार्विनच्या उत्क्रांतीपासून ते रशियन राज्यक्रांती, मार्क्स, लेनिन, लोकमान्य टिळक, शिवाजी, बी. रघुनाथ, केशवसुत ते देसाई अथवा खांडेकर कोणताही विषय असला तरी त्यांच्याकडे नेहमीच काहीतरी इंटरेस्टिंग डिटेल्स असायचे, जे नेहमीच्या पुस्तकांत कधी मिळायचे नाहीत. शाळेत मित्रमैत्रिणी माझ्यावर जळत असतील, कदाचित हेवा करत असतील. मला मात्र तयारी करायची, नोट्स बनवायच्या आणि मग वेगवेगळ्या शाळांमध्ये स्टेजवर जाऊन आत्मविश्वासात वादविवाद वगैरे करायचे ही अगदी सहज आणि आनंदाची गोष्ट होती.

बाबांचे साहित्यातील योगदान किंवा मराठवाड्यातील नवोदित साहित्यिक, चळवळीतील कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांसाठी त्यांनी केलेले प्रेरणादायी काम यांबद्दल मी लिहिले पाहिजे असे मला वाटत नाही. इतर लोकांनी

याबद्दल विस्ताराने लिहिले आहे. मी ह्या घरगुती आठवणी लिहायचे कारण म्हणजे विचारवंत, विद्वान आणि प्रसिद्ध व्यक्तीबद्दल साधारण एक प्रवाद असतो की ते आपल्या जवळच्या लोकांकडे, कुटुंबीयांकडे दुर्लक्ष करून, फक्त अभ्यास, लिखाण, भाषण करून प्रसिद्ध झाले आहेत. अडीअडचणींच्या प्रसंगी कुटुंबीयांना किंवा इतरांना जेव्हा त्यांची अत्यंत आवश्यकता असते; तेव्हा ते मदतीला उपलब्ध नसतात. बाबांच्या बाबतीत अशी परिस्थिती अजिबात नव्हती. ते निश्चितच खूप कामात असत, एक प्राचार्य, एक प्रसिद्ध साहित्यिक, स्थानिक संस्थांच्या कार्यकारिणीवर विविध भूमिका करणारे माझे बाबा माझ्यासारख्या प्राथमिक/माध्यमिक शाळेतल्या मुलींच्या शंका-समाधानासाठी आवर्जून वेळ काढत, कधीही एखादी क्षुल्लक बाब म्हणून त्यांनी दुर्लक्ष केले किंवा टाळले असे झाले नाही. ते गेल्यानंतर त्यांच्या विद्यार्थ्यांकडून आणि सहकाऱ्यांच्या आठवणीतून समजले की ते त्यांच्या वैयक्तिक अडचणी आणि सुख-दुःखातसुद्धा त्यांच्या सोबत, त्यांच्या मागे ठामपणे उभे असत. इतर कुटुंबीयांप्रमाणे आम्ही रोज गप्पा मारत बसलो, एकत्र जेवलो, किंवा आजकालच्या पालकांप्रमाणे बाबांनी आम्हांला खेळायला नेले, आमच्या सोबत आठवड्याच्या शेवटी सहलीला गेले असे मात्र कधी झाले नाही. खरे तर त्या काळी इतर मुलांचे पालकही असे काही करत असतील असे वाटत नाही. आमचे मित्रमंडळही खूप मोठे होते, त्यामुळे पालकांना मित्रांच्या भूमिकेत शिरण्याची आणि आमच्या करमणुकीची काळजी करण्याचे काही कारण नव्हते. त्यामुळे आम्हांला आमच्या सोबत काही वेगळे घडले असे कधी वाटले नाही. पण जेव्हा एकत्र वेळ मिळायचा तो खरेच मोलाचा वाटायचा.

एकंदरीत आयुष्य आनंदात चालले होते. दोन्ही मोठ्या बहिणी आपापल्या संसारात रुळायला लागल्या होत्या, भाऊ बारावी आणि मी पौगंडावस्थेच्या अर्धवट वयात, नववीत शिकत असताना अचानक ते कोसळले, गेले! ऐन उमेदीच्या काळात, प्रसिद्धीच्या शिखराकडे जात असताना त्यांचा प्रवास अचानक खंडित झाला. त्या दिवशीचे त्यांचे पहाटेच्या गाडीने औरंगाबादला भाषण द्यायला जाणे ही आमच्या घरची एक सर्वसाधारण घटना, आणि संध्याकाळ होता होता कार्यक्रमाच्या व्यासपीठावर त्यांना हृदयविकाराच्या तीव्र झटका काय आला आणि श्रोत्यांमध्ये डॉक्टर असूनही कोणी काही मदत करायच्या आत ते गेले हा आमच्यासाठी फार मोठा धक्का होता आणि जे घडले यावर विश्वास बसत नव्हता. त्यांना दिवसभर ॲसिडिटी वाटत होती म्हणे. बाकी काहीच त्रास किंवा लक्षण नाही, नंतर विचार केला की मला खूप अस्वस्थ वाटायचे की जेव्हा माझ्या बाबांना स्टेजवर हॉर्टअटॅक येत होता, त्यांच्या शेवटच्या क्षणीच्या वेदना होत होत्या तेव्हा मला काहीच संकेत, intuition नाही झाली का? मी जवळपास त्याच वेळी रोजच्यासारखे घरासमोर जोशात बॅडमिंटन खेळत होते. घरी बहिणीच्या मुलीच्या बारशाची तयारी चालू होती.

रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास ते आजारी असल्याचे आणि त्यांना नांदेडला परत आणण्याची सोय केल्याचा फोन आला असा निरोप बहुतेक सुधाकर डोईफोडे काकांकडून कुणीतरी सांगितला. आम्ही सारे अस्वस्थ झालो, वाट पाहत राहिलो; पण इतके वाईट काही होईल याची शंकाही आम्हांला आली नव्हती. थोड्या वेळाने आईला प्रश्न पडला की ते खरेच इतके आजारी असतील तर औरंगाबादमधील उत्तम इस्पितळात इलाज करण्याऐवजी नांदेडला का घेऊन येत आहेत? साधारण मध्यरात्रीच्या सुमारास जेव्हा घराच्या आसपास लोकांची गर्दी व्हायला लागली तेव्हा कुठे लक्षात आले की काहीतरी भयंकर विपरीत झाले आहे. तरी विश्वास बसत नव्हताच! रक्तदाब, मधुमेह किंवा हृदयविकाराच्या त्रासाचा कोणताही पूर्वइतिहास नसलेल्या बाबांचा मृत्यू जेमतेम पन्नाशीत पहिल्याच हृदयविकाराच्या धक्क्याने, कोणताही इलाज करण्याची संधी न देता व्हावा यासारखी दुर्दैवी घटना कोणती असेल?

बाबांच्या अंत्ययात्रेचे दृश्य, मला आपल्या कुशीत कवटाळून घेतलेली इंदू मावशी, आजूबाजूला सगळे अश्रूभरलेले डोळे, कोणते डोळे कोणाचे- काय फरक? त्यामागचे चेहरे अगदीच अर्थहीन. माझ्या मनात ही दृश्ये कोरली गेली आहेत. पुढचे काही दिवस एक भ्रमिष्ट, गोंधळलेल्या आणि भान हरपलेल्या मानसिकतेचे, सर्व जाणिवांच्या पलीकडचे होते. पूर्ण विस्कटलेल्या घरात धक्का बसलेल्या, दुःखावेगाने व्याकूळ माणसांच्या गर्दीच्या लाटा डोळ्यांसमोर फक्त मागेपुढे होत राहिल्या...

प्रत्येकाला खरे तर आधी आपल्याच दुःखाला सावरता येत नसेल; पण ज्या कुटुंबाच्या डोक्यावर आकाश कोसळले आहे, त्यांचे सांत्वन करणे हा प्रयत्नही ही सगळी मंडळी करत होती. पण सगळेच व्यर्थ! काहीच कुठे पोहोचत नव्हते. पुढचे अनेक दिवस हे असेच चालू होते. रोजचे चहा, खाणे शेजारी-पाजारी, बाबांचे विद्यार्थी आणि सहकारी अनेक दिवस आणून देत होते. मी अत्यंत कृतज्ञतेने याचा उल्लेख करते. कारण आजकालच्या धावपळीच्या शहरी जीवनात इतकी आपुलकी दुर्मिळ होत चालली आहे. या सर्वांनी आमच्या अत्यंत वाईट काळात आमची खूप काळजी घेतली.

बाबांच्या अशा अचानक जाण्याने माझी आई एकदम सुन्न झाली होती आणि मी पारच गोंधळून गेले होते. आईला नेहमीच खंबीरपणे, उत्साहात सगळे घरकाम आणि व्यवहार सांभाळताना पाहिले होते. गाणी गुणगुणत, उत्साहात आणि झपाट्याने घरकाम, बाजारहाट, स्वतःच्या हाताने सगळे बागकाम- अशी जास्तीत जास्त कामे तीच करायची. हेतू हा की बाकी सर्वांना त्यांचे अभ्यास आणि नाद जोपासता यावेत. आई मधल्या एका खोलीत, सांत्वन करण्यासाठी येणाऱ्या लोकांच्या गर्दीत नुसती बसून होती, कितीतरी दिवस लोक भेटायला यायचे. कुणी आठवणी सांगत, कुणी बाबांनी त्यांना कशी मदत केली ते सांगत, कुणी आम्ही पोरके झाले म्हणून रडायचे. सगळ्यांनाच हा अनपेक्षित धक्का होता. आई काहीच बोलत नव्हती. दिवसभरात आणि रात्रीही नुसते लांब सुस्कारे! तिला ह्या धक्क्यातून सावरायला बरेच दिवस लागले, खरे तर ती कधीच त्यातून बाहेर आली नाही. रोजच्या कामाला जेव्हा तिने सुरुवात केली तेव्हा ती पूर्णपणे बदलली होती. तिच्या डोळ्यांतील चमक, चालीतली धमक आणि ओठावरली गाणी कायमची हरवली होती. त्या पंधरवड्यात माझा भाऊसुद्धा लक्षात येईल एवढा बदलून गेला. बाबांचे अंत्यविधी करून गोवर्धन घाटावरून परत आलेला माझा भाऊ अचानक मोठा, जबाबदार झालेला दिसायला लागला. आजी रात्री झोपेतही रडत असल्याचे मला आठवते. आजोबा सांत्वनाला येणाऱ्या लोकांना आयुष्यभर वाचलेल्या भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान सांगत बसायचे. कदाचित तो त्यांचा आपले दुःख लपवण्याचा मार्ग होता, किंवा स्थितप्रज्ञ बनायचा प्रयास असावा. त्यांचा शब्द न् शब्द मला पोकळ वाटायचा, उसने अवसान म्हणतात ना तसे! असे वाटायचे की या मोठ्या मोठ्या शब्दांऐवजी कोणी फक्त जवळ घ्यावे, हातात हात घेऊन सगळे ठीक होईल म्हणावे! सगळेच मनाने कोलमडून पडले होते वर वर काहीही आव आणला तरी, हेच खरे! पुढच्या दीड वर्षातच माझे आजोबाही गेले. बाबा त्यांचा अभिमान होते; आधार, गौरव सगळेच होते, दाखवायचे नाही म्हटले तरी हे दुःख पचवू शकले नाहीत ते.

यानंतर सगळे घर झपाट्याने बदलून गेले. भाऊ पुढील शिक्षणासाठी गोव्याला निघून गेला, मी आणि आई दोघीच त्या रिकाम्या, सुनसान घरात राहिलो. माझी आई, जिला घरातले आणि बाहेरचे काम, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची सरबराई करायला दिवस पुरा पडत नसे. तिला हे अचानक आलेले रिकामपण आणि जिम्मेदारीचा ताण... सगळेच किती जड गेले असेल. तेव्हा आई फक्त शेहेचाळीस वर्षांची होती. बाबांनी कधी तिच्या (नवरा बिलकूल वाट्याला न येण्याच्या) तक्रारीची समजूत घालताना त्यांच्या संसारातले मोलाचे दिवस, प्रवास, अभ्यास, भाषण, लिखाण, चर्चा वगैरे गोष्टींसाठी देताना म्हातारपणी ह्या सगळ्यांची पुरेपूर भरपाई करायचे आश्वासन दिले होते. निवृत्तीनंतर असणाऱ्या भरपूर वेळेत सोबत प्रवास करण्याचे ठरवले होते, ती म्हणेल तिथे तिला घेऊन जाण्याचे आणि दोघांनी मिळून शांत-निवांत आयुष्य घालवायचे ठरवले होते. बाबा अनेक वेळा आईला तिच्या मुलांकडे अति लक्ष देण्यावरून, त्यांच्यात गुंतण्यावरून चिडवायचे. ते म्हणत की म्हातारपणी फक्त तेच सोबत असतील, मुले मोठी झाली की जातील पळून! तिला आता आपली फसणूक झाल्यासारखे वाटत होते. मी तिला आपल्या वयाला न शोभणाऱ्या भाषेत; या गोष्टी कशा आपल्या हातात नसतात, आपण खंबीर होऊन आयुष्याला सामोरे जायला पाहिले असे काही लंबे-चौडे उपदेशाचे डोस पाजत होते. मी फारतर १३ वर्षांची असेन, तिला कितीही समजावून सांगण्याचा आव आणला तरी मलाही आपली फसवणूक झाल्यासारखेच वाटत होते, जणू काही ते आम्हांला मुद्दाम सोडून गेले होते. नवीन वास्तवाशी जुळवून घ्यायला बरीच वर्षे जावी लागली.

आपण काय गमावले आहे हे हळूहळू समजायला

लागले. संस्थात्मक कार्याचे झालेले नुकसान, बाबांनी समर्थन केलेल्या आणि पाठिंबा दिलेल्या उदारमतवादी पुरोगामी चळवळींची झालेली हानी, व्याकूळ विद्यार्थी आणि पोरके झालेले तरुण लेखक; साहित्य, सांस्कृतिक, वैचारिक जगताची भरून न येऊ शकणारी हानी या सगळ्यांबद्दल इतके लिहिले गेले आहे की याच्या आड आमचे वैयक्तिक दु:ख, न भरून येणारे पोरकेपण दबलेलेच राहिले. कधी कधी वाटायचे की त्यांचे स्नेही, विद्यार्थी त्यांच्याबद्दल भरभरून बोलताना ते स्वत: कसे बाबांचे लाडके होते, आम्हां कुटुंबीयांपेक्षा बाबांच्या सहवासात जास्त होते, त्यांना बाबा जास्त समजत होते हेच चढाओढीने सांगू पाहत असतात. आश्चर्य याचे वाटे की यापैकी कुणालाही आपल्या वैयक्तिक हानीपेक्षा कुटुंबीयांची हानी न भरून येणारी असेल याची जाणीवही नव्हती. एकूण आविर्भाव असा की बाबांवर पहिला हक्क त्यांचाच होता, आम्ही तर आनुषंगिक, योगायोगाने तिथे होतो बस्स!

यानंतरचे रस्ते आणि केलेला प्रवास पूर्णपणे वेगळा आणि डोळे उघडणारा होता. त्या प्रवासात वेळोवेळी जाणवले ते हे की बाबांवर प्रेम करणारे आमच्याशीही आपुलकीनेच वागले, सोबत राहिले. पण काही वेळा अनपेक्षितपणे, कधी वाटले नव्हते तिथून खोटेपणा, मत्सर, कोतेपणाला सामोरे जावे लागले. सुरुवातीला जेव्हा दु:ख ताजे ताजे होते, आणि जगरहाटीची कल्पना नव्हती तेव्हा अशा अनुभवांनी ठेच लागल्यासारखे झाले, कडवटपणाही आला. नंतर या सगळ्यांकडे आम्ही दुर्लक्ष करायला शिकलो. पण त्या कसोटीच्या दिवसांत मार्ग काढताना आणि नंतरही मला नेहमीच असे वाटले की बाबांच्या माघारी त्यांच्या आशीर्वादाची अदृश्य ढाल नेहमीच माझी पाठराखण करत आली आहे. मी नांदेड आणि महाराष्ट्रापासून इतक्या दूर, दिल्लीत राहते तरीही कायम सगळ्या चॅलेंजिंग प्रसंगी नेहमीच हा विश्वास वाटला की त्यांनी मनापासून इतक्या लोकांसाठी धडपड केली, त्या सगळ्यांच्या सदिच्छा आपल्या पाठीशी आहेत, मग आपलेही चांगलेच होईल. हा भोळसटपणाच वाटेल कुणाला, पण मला बळ मिळते खरे! इतक्या लहान वयात बाबांसारख्या पित्याचे छत्र गमावण्यातील वेदना इतकी तीव्र होती की, ती विसरणे आणि परिस्थितीशी जुळवून घेणे फारच अवघड होते. यातून आम्ही सगळे अंतर्बाह्य बदलून गेलो, अनेक गोष्टी बदलल्या, त्या सोबत आम्ही पुढील आयुष्यात घेतलेले निर्णय वेगळे झाले. पण खरी गोष्ट ही आहे की इतक्या शक्यता असलेला, त्यांच्यासारखा विविध क्षेत्रांत सामर्थ्याने संचार करणारा विचारवंत जेव्हा अचानक कोसळतो तेव्हा त्याच्या बरोबरच त्याच्या आजूबाजूच्या किती तरी शक्यताही कोलमडून पडतात. आमची जी काही वैयक्तिक हानी होती त्यापेक्षा किती तरी मोठी हानी त्या प्रदेशाची झाली, त्या भाषेची, सांस्कृतिक वारश्याची झाली... इतक्या कमी वेळात त्यांनी एवढे प्रभावित केले, ती बौद्धिक झेप, त्यांचे अफाट वाचन, आकलन... किती अर्धवट राहून गेले सगळे. जेव्हा कोणाला ज्ञानपीठ पुरस्कार, किंवा सरस्वती सन्मानाने गौरविल्याची बातमी येते तेव्हा वाटते, नियतीने अजून निदान पंधरा-वीस वर्षे दिली असती तर...?

(अनुवाद : विश्वास कुरुंदकर, Mob.9834149934)

**तेजस्विनी देव**, नवी दिल्ली, Mob.9818002028)

१९३२ ते ८२ असे जेमतेम ५० वर्षांचे आयुष्य लाभलेल्या नरहर कुरुंदकर यांनी जेमतेम २५ वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यात इतके दर्जेदार वैचारिक लेखन केले आहे की, त्यांच्या हयातीत दोन दशके आणि त्यांच्या मृत्यूनंतरची चार दशके ते महाराष्ट्राच्या वैचारिकतेचा मानबिंदू म्हणूनच ओळखले जातात. त्यांच्यातील लेखक व विचारवंत याविषयी आतापर्यंत अनेक लहान-थोरांनी विपुल लेखन केले आहे. मात्र एक माणूस म्हणून ते कसे होते, हे सांगणारा अप्रतिम असा दीर्घ लेख त्यांची कन्या प्राध्यापक तेजस्विनी देव यांनी अलीकडेच लिहिला आहे. कुरुंदकर यांचा ४० वा स्मृतिदिवस येत्या १० फेब्रुवारीला येत आहे. त्या निमित्ताने, मुळात अहमदपूर येथील अक्षरवाङ्मय या मराठी त्रैमासिकाने हा लेख त्यांना लिहायला सांगितला आणि त्यांच्या ताज्या अंकात घेतला आहे. अर्थात, त्यांनी तो इंग्रजीत लिहिला आणि त्याचा उत्तम मराठी अनुवाद त्यांचे बंधू विश्वास यांनी केला आहे. विषयाचे महत्त्व आणि कुरुंदकर व साधना यांचे नाते लक्षात घेऊन, तो मराठी लेख साधना साप्ताहिकातही प्रसिद्ध करीत आहोत. आणि मूळ इंग्रजी लेख kartavyasadhana.in या डिजिटल पोर्टलवर प्रसिद्ध करीत आहोत. .... संपादक

चिकित्सा

डॉ. अभय बंग

# गांधीजींच्या कार्यपद्धतींमागचे विज्ञान

प्रचलित पद्धतीअनुसार शास्त्रज्ञांचे ज्ञान हे त्यांची वैयक्तिक मालमत्ता मानले जाते. गांधीजींच्या दृष्टीने विज्ञानाचा आणि संशोधनाचा उद्देश आणि त्यातून निर्माण झालेल्या ज्ञानाची मालकी हे प्रचलितापेक्षा वेगळे आहे. ते म्हणत, ''माझे आश्रम हे गावासाठीच्या आणि सामाजिक पुनर्रचनेच्या प्रयोगशाळा झाल्या पाहिजेत.'' ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशनची स्थापना केली. या असोसिएशनच्या सल्लागार मंडळातील सर सी.व्ही. रमण, जगदीशचंद्र बोस आणि पी.सी. रे ही तीन नावे तुमच्या चांगल्याच परिचयाची असतील. हे त्या काळातले भारतातील तीन सर्वोत्तम शास्त्रज्ञ होते. त्यांना गांधीजींनी त्यांच्या ग्रामोद्योगाच्या सल्लागार मंडळावर काम करण्यासाठी आमंत्रित केले. नंतर गांधीजींनी 'सत्याग्रही वैज्ञानिक' असा अतिशय अर्थपूर्ण शब्द तयार केला.



गांधी आणि विज्ञान ह्या मालिकेमध्ये भाषण करण्यासाठी मला आमंत्रित केल्याबद्दल मी इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्स आणि त्याचे अध्यक्ष प्रा.पार्थ मजुमदार यांचे आभार मानतो. इथे भाषण करण्याची संधी मिळणे हा मला सन्मान वाटतो. माझ्या भाषणाचे शीर्षक आहे, 'गांधीजींच्या कार्यपद्धतींमागचे विज्ञान'.

न्यू यॉर्कमधील 'टाइम' साप्ताहिकाच्या कार्यालयापासून आपण सुरुवात करू. १९९९ चा डिसेंबर महिना आहे, म्हणजे विसाव्या शतकाच्या अखेरीचा काळ. 'टाइम'ला २० व्या शतकातील सर्वांत लोकप्रिय महान व्यक्तीची निवड करायची आहे. विविध क्षेत्रांतल्या अनेक व्यक्तींची नावे सुचवण्यात आली आहेत, पण अल्बर्ट आइनस्टाईन आणि महात्मा गांधी ही दोन नावे सर्वांत जास्त लोकप्रिय ठरत आहेत. संपादकांपुढे निवड करण्याचा पेच निर्माण झाला.

अखेर त्यांनी विसाव्या शतकातील सर्वांत लोकप्रिय महान व्यक्ती म्हणून आइन्स्टाईनची निवड केली. विज्ञानाने आणि वैज्ञानिकाने गांधींवर विजय मिळवला– पण लोकप्रियतेच्या बाबतीत. शिवाय, तो २० व्या शतकातला निर्णय होता. आज एकविसाव्या शतकात विज्ञान आणि गांधी यांच्यातील संबंध पुन्हा एकदा तपासून पाहण्याची आणि आपल्या निर्णयावर येण्याची गरज आहे. मी या व्याख्यानात तेच करण्याचा प्रयत्न करणार आहे. आज मी स्वत:बद्दल किंवा मी केलेल्या कामाबद्दल मुळीच बोलणार नाही. कारण गांधीजी आणि विज्ञान यांच्यातील परस्पर संबंध हा विषय माझ्या स्वतःच्या कामाबद्दल बोलण्यापेक्षा जास्त वेधक वाटतो!

**सहा प्रश्न**

हा शोध घेण्यासाठी मी सहा प्रश्न निर्धारित केले आहेत.

१. गांधी विज्ञानविरोधी होते का?

२. त्यांचा विज्ञानाशी संबंध कसा होता?

३. त्यांचे वेगळेपण काय आहे?

४. त्यांच्या अहिंसेमागे कोणते विज्ञान होते?

५. सत्य जाणून घेण्याची गांधींची पद्धत कोणती होती?

६. एकविसाव्या शतकात आपल्याला गांधीजी कशा प्रकारे समयोचित आणि उपयुक्त आहेत?

'गांधीजी विज्ञानविरोधी होते', या त्यांच्यावरील आरोपापासून आपण सुरुवात करू या. तसेच विज्ञानाशी असलेल्या त्यांच्या संबंधाचाही शोध घेऊ. पण त्यांच्या पद्धती काय होत्या याचा अधिक सखोलपणे विचार करू आणि शेवटी, आज त्यांचे विचार आपल्याला समयोचित असलेच तर ते कसे– याचाही धांडोळा घेऊ.

सुरुवातीला मला हे सांगितले पाहिजे की, मी एका गांधीवादी कुटुंबात जन्माला आलो आणि गांधीजींच्या आश्रमात वाढलो आहे. त्यांनी स्वतः सुरू केलेल्या शाळेतच मी शिकलो. वयाच्या अठराव्या वर्षी मी वैद्यकशास्त्राचा अभ्यास सुरू केला आणि त्यानंतर सार्वजनिक आरोग्य या विषयाचाही अभ्यास केला. गेल्या ३५ वर्षांपासून मी वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य या विषयांवर कार्य व संशोधन करत आहे. साधारणत: पन्नास वर्षांपूर्वी माझी विज्ञानाशी ओळख झाली तेव्हापासून विज्ञानाच्या प्रश्नावर महात्मा गांधींशी माझे एक विचित्र नाते आहे. कधी त्यांच्या विचारांची मला लाज वाटली, कधी माझा गोंधळ झाला, तर कधी मला रागसुद्धा आला. विज्ञानाच्या मुद्द्यावरून माझे त्यांच्याशी मानसिक पातळीवर अनेक वाद झाले आहेत; मतभेदसुद्धा झाले आहेत. आणि आज मला सांगायला आनंद वाटतो की, प्रत्येक वेळी मी हरलो आणि ते जिंकले! गांधीजींच्या सोबतचा हा ५० वर्षांचा संघर्ष, तसेच विज्ञान आणि गांधीजी यांच्या परस्पर संबंधांचा शोध घेण्याचा माझा प्रवास आज मी तुमच्या समोर मांडणार आहे.

गांधीजींचे स्वत:चे लिखाण, त्यांच्या अनेक चरित्रकारांनी केलेले वर्णन आणि गांधीजींचे अग्रगण्य शिष्य विनोबा भावे यांचे विचार या सगळ्यांचा आधार घेऊन ही मांडणी मी करणार आहे. तसेच सुमारे २० वर्षांपूर्वी श्री.शंभूप्रसाद यांनी इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकलीमध्ये लिहिलेल्या एका सुंदर लेखाचा आणि अर्थातच माझ्या स्वत:च्या आयुष्यातील अनुभवांचा आणि प्रयोगांचाही मी आजच्या भाषणात उपयोग करणार आहे.

**गांधीजी विज्ञानविरोधी होते का?**

जवाहरलाल नेहरू व रवींद्रनाथ टागोर, हे त्यांच्या इतक्या जवळचे होते त्यांनी आणि पाश्चिमात्य देशांतील ऑल्डस हक्सले यांच्यासारख्या लोकांनीही गांधींवर विज्ञानविरोधी असल्याचा आरोप केला आहे. भारताच्या राष्ट्रीय विज्ञान धोरणाचे शिल्पकार– डॉ.मेघनाद साहा म्हणतात, 'आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा त्याग करून आणि चरखा, पंचा आणि बैलगाडीकडे वळल्यामुळे अधिक चांगली आणि आनंदी परिस्थिती निर्माण होऊ शकते यावर आमचा

कणभरही विश्वास नाही.'[१]

या वाक्याचा रोख महात्मा गांधीजींच्या धोरणांवर आणि त्यांनी चरखा, पंचा आणि बैलगाडीसारखी जी प्रतीके वापरली त्यावर आहे ते तर उघडच आहे. मेघनाद साहा, जवाहरलाल नेहरू आणि एकूणच भारतातील बुद्धिजीवी वर्ग असे मानतो की 'गांधी विज्ञानविरोधी होते; म्हणून आजच्या काळात गांधीजी मोठ्या प्रमाणावर अप्रस्तुत ठरतात' असे त्यांना वाटते. असा समज होण्यासाठी आंशिकरीत्या स्वत: गांधीजीदेखील जबाबदार आहेत.

आपण ज्याला 'विज्ञान' मानतो अशा काही गोष्टींवर 'हिंद स्वराज' या पुस्तकामध्ये गांधीजींनी कठोर टीका केली आहे. हे पुस्तक त्यांच्या आत्मचरित्रानंतर सर्वांत महत्त्वाचे मानले जाते. पण सावधान! त्यांनी विज्ञानावर टीका केलेली नसून आधुनिक विज्ञानातून तयार झालेली काही यंत्रे आणि वैद्यकीय पद्धती यांसारख्या काही बाबींवर त्यांचा आक्षेप आहे. पण त्यामुळे आपल्याला ते विज्ञानविरोधी वाटू शकतात. शिवाय, त्यांची प्रार्थनेवरची श्रद्धा आणि त्यांचे रामनाम; यामुळे तर आपल्या बुद्धिवादीपणाच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखेच वाटू शकते. या सगळ्यांमुळे स्वत:ला विज्ञानवादी आणि बुद्धिनिष्ठ मानणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला गांधी हे अगदीच विरुद्ध टोकाचे आहेत असे वाटू शकते. आणि म्हणूनच त्यांना सोईस्करपणे 'विज्ञानविरोधी' असे लेबल लावले जाते.

पण १९२१ मध्ये नवी दिल्लीतल्या टिब्बिया कॉलेजच्या उद्‌घाटनप्रसंगी ते वैज्ञानिकांबद्दल काय म्हणाले आहेत बघा! त्या व्याख्यानात गांधीजी म्हणतात की सत्याच्या शोधात मग्न झालेल्या आधुनिक शास्त्रज्ञांचा उत्साह, त्यांची मेहनत आणि त्याग यांबद्दल माझ्या मनात फक्त आदर व कौतुकाचीच भावना आहे.[२]

गांधीजींना वैज्ञानिक वृत्तीचे, वैज्ञानिक संशोधन पद्धतीचे खूप कौतुक होते. त्यांचे स्वत:चे प्रत्यक्ष जीवन हाच त्याचा वास्तविक पुरावा आहे. ते स्वतःच म्हणायचे की माझे जीवन हाच माझा संदेश! म्हणून आपल्याला खरीखुरी तपासणी करायची असेल तर त्यांच्या विधानांच्या पलीकडे जाऊन ते कसे जगले आणि वागले हे आपण पाहिले पाहिजे. जर आपण तसे पाहायला लागलो, तर त्यांना आयुष्यभर आरोग्य, आहार, स्वच्छता, रोगजंतू, व्यायाम अशा विविध वैज्ञानिक मुद्द्यांबद्दल किती कुतूहल होते ते आपल्या लक्षात येईल. त्यांना विविध प्रकारच्या पदार्थांचे रासायनिक विश्लेषण जाणून घ्यायचे असे. मायक्रोस्कोपसह त्यांचे छायाचित्र प्रसिद्धच आहे. त्या वेळी ते कुष्ठरोग निर्माण करणारा जीवाणू पाहण्याचा प्रयत्न करत होते. येरवडा कारागृहात असताना १९४२ नंतर त्यांना दुर्बिणीची भुरळ पडली आणि त्यांनी आकाश दर्शनाचा छंद जोपासला. एकूण, गांधीजींनी वैज्ञानिक साधने आणि वैज्ञानिक पद्धतींचा मोकळ्या मनाने वापर केला.

पण शब्द व कृतींपेक्षाही अधिक संवेदनशील आणि कठीण भाग असतो वृत्तीचा! आपण जर काळजीपूर्वक बघितले तर आपल्या लक्षात येईल की गांधीजींची प्रयोग करण्याची, पुरावे शोधण्याची तयारी आणि स्वतःमध्ये बदल घडवणे, सुधारणा करत राहण्याची वृत्ती हे सगळे शास्त्रज्ञाचे गुणधर्म आहेत. त्यांचे एक विधान तर अतिशय प्रसिद्धच आहे! ते म्हणत, ''जर एखाद्या वाचकाला माझी दोन विधाने परस्परविरोधी असल्याचे आढळले तर माझे नंतरचे विधानच योग्य समजावे.''

आपले पूर्वीचे मत चुकीचे होते आणि नवे मत हे नव्याने झालेल्या जाणिवेवर आधारित आहे असे कुठलेही राजकीय नेते किंवा संत सहसा मान्य करत नाहीत. उलट आपण कधीही बदलत नसल्याचा त्यांना अभिमान असतो. मात्र गांधीजी या बाबतीत एखाद्या शास्त्रज्ञासारखे आहेत. ते जणू काही असे म्हणतात की, 'मी बदलतो. जर वेगळे पुरावे समोर आले, तर मी माझे मत बदलतो.'

एकदा प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ जॉन मेनार्ड केन्स यांच्यावर एका राजकारण्याने आरोप केला की, त्यांनी पूर्वी वेगळेच काहीतरी सांगितले होते; आता ते बदलले. तेव्हा केन्सने उत्तर दिले, ''होय महाशय, जर तथ्य बदलले तर मी माझे मत बदलतो. तुम्ही वेगळे काय करता?''

त्या दृष्टीने गांधी हे अगदी एखाद्या वैज्ञानिकासारखे आहेत. त्याचा सर्वांत मोठा पुरावा म्हणजे चौरीचौराची घटना. आपण नुकतीच चौरीचौराच्या घटनेची शंभरी साजरी केली. (पण सरकारने ते चुकीच्या कारणांसाठी केले). महात्मा गांधींनी १९२० मध्ये राष्ट्रीय असहकार चळवळ सुरू केली तेव्हा भारत अहिंसक राष्ट्रीय चळवळीसाठी सज्ज आहे, असा त्यांना विश्वास वाटत होता. पण १९२१ मध्ये उत्तर प्रदेशात जमावाने चौरीचौरा येथील पोलिस स्टेशन जाळले आणि २२ पोलिस ठार झाले. तेव्हा गांधीजींना धक्काच बसला. त्यांनी जाहीरपणे म्हटले की, ''मी हिमालयाएवढी प्रचंड मोठी चूक केली. भारतीय लोक अहिंसक

आंदोलनासाठी तयार आहेत हा माझा समज चुकीचा ठरला.''

एखाद्या शास्त्रज्ञाने म्हणावे की, माझे जे गृहीतक होते, त्याचे प्रत्यक्ष पुराव्यांनी खंडन झाले आहे आणि मला ते मान्य केले पाहिजे– तसे गांधीजींचे हे म्हणणे आहे. ते म्हणत होते की, ''माझे गृहीतक चुकीचे असल्याने, मी ते सोडले पाहिजे आणि स्वतःची भूमिका सुधारली पाहिजे. त्यामुळे मी संपूर्ण राष्ट्रीय आंदोलन मागे घेत आहे.''

महात्मा गांधींच्या सार्वजनिक जीवनातील हा सर्वांत जोखमीचा क्षण होता. ते नुकतेच भारतात राष्ट्रीय नेते म्हणून प्रस्थापित झाले होते. अशा वेळी संपूर्ण देशाच्या मताच्या विरोधात जाऊन त्यांनी राष्ट्रीय आंदोलन मागे घेतले आणि स्वत:चे नेतृत्वपद धोक्यात आणले.

हे तर निखळ शास्त्रज्ञाचे गुणधर्म आहेत. केवळ राष्ट्र हीच त्यांची प्रयोगशाळा नव्हती, तर गांधीजींनी स्वत:वरही प्रयोग केले. त्यांचे ब्रह्मचर्याचे प्रयोग तर प्रसिद्धच आहेत; एक प्रकारे कुप्रसिद्धही आहेत. 'मी ज्यापासून मुक्त होऊ इच्छितो अशा लैंगिक वासनांचा माझ्यामध्ये काही अंश उरला आहे का? जर मी खरोखर अहिंसक असेन किंवा मी जर तथाकथित संत अथवा महात्मा असेन, तर मी लैंगिक इच्छांपासून, वासनांपासून पूर्णपणे मुक्त असले पाहिजे. तसा मी आहे का?' हे पडताळून बघण्यासाठी ते स्वतःवर प्रयोग करत असत. आपले शरीर आणि मन यांच्यातील खोलवर दडलेल्या वासनांचा शोध घेण्यासाठी त्यांनी स्वत:वर सर्वांत अवघड आणि जोखमीचा प्रयोग केला. या प्रयोगामुळे गांधींबद्दल बरेच गंभीर गैरसमज आहेत आणि त्यांच्यावर टीकादेखील झाली आहे.

पण जेव्हा मी याबद्दल वाचले तेव्हा मला जॉन हंटर या नावाची आठवण झाली. सुमारे २०० वर्षांपूर्वी जॉन हंटर हा एक प्रसिद्ध शरीरशास्त्रज्ञ होऊन गेला. सिफिलीसचा संसर्ग कसा होतो हे शोधण्यासाठी त्याने स्वतःवर एक धाडसी प्रयोग केला. त्याने सिफिलीसच्या रुग्णाच्या फोडातून काही द्रव काढून घेतला आणि आपल्या लिंगावर टोचून घेऊन स्वत:चे निरीक्षण केले. काही आठवड्यांत तिथे सिफिलिटीक अल्सर विकसित झाला आणि त्यावरून सिफिलीस रोग कसा लैंगिक संबंधातून संक्रमित होतो ते त्याने सिद्ध केले. गांधीजींचा स्वतःवरचा ब्रह्मचर्याचा प्रयोगदेखील जॉन हंटरच्या प्रयोगाइतकाच धाडसी होता. तो त्यांनी दडवून ठेवला नाही. त्यांनी त्याबद्दल जाहीरपणे लिहिले.

त्यांनी आत्मचरित्राला 'माझे सत्याचे प्रयोग' असे शीर्षक दिले यात आश्चर्य नाही. सत्य समजून घेणे हे त्यांचे अंतिम ध्येय होते. हे सर्व खऱ्या शास्त्रज्ञाचे गुण आहेत. ते जीवनाचे शास्त्रज्ञ होते.

**त्यांचा विज्ञानाशी संबंध कसा होता?**

आता आपण पुढच्या प्रश्नाकडे येऊ. गांधीजी जर विज्ञानविरोधी नव्हते तर त्यांनी विज्ञानाचा कसा उपयोग केला? ते विज्ञानाशी कशी सांगड घालत असत?

गांधींचे रचनात्मक कार्यक्रम ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम आणि सामाजिक सुधारणाह्व यांमध्ये त्यांनी केलेला विज्ञानाचा उपयोग आणि त्यांचे विज्ञानाशी असलेले नाते आपण पाहू शकतो.

गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमांमध्ये खादी आणि चरखा हे सर्वांत महत्त्वाचे होते. खेड्यातल्या सामान्य विणकराला जास्त चांगले कापड तयार करता यावे, अधिक रोजगार मिळावा आणि लोकांनी जास्त खादी वापरावी म्हणून खादीमध्ये सुधारणा करण्यासाठी गांधीजींनी वैज्ञानिक पद्धती वापरल्या. अधिकाधिक चांगली तांत्रिक साधने शोधली. त्यांनी 'खादी सायन्स' असा शब्दही वापरला आहे. चरख्याला ते एक उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचे यंत्र म्हणत. आज यावर विश्वास ठेवणे कठीण आहे, परंतु सुमारे ८० वर्षांपूर्वी अधिक कार्यक्षम चरखा शोधून काढण्यासाठी गांधींनी एक लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर केला होता. कदाचित आज त्याची किंमत काही कोटी रुपये होईल.

विज्ञानाचा उपयोग गांधीजी भरपूर प्रमाणात करीत, असे आपल्याला आढळते. तसेच ते आपल्या खादी क्षेत्रातील कार्यकर्त्यांकडूनही वैज्ञानिक वृत्तीची अपेक्षा करतात. ते काय म्हणतात बघा– 'खादीच्या विज्ञानाला उच्च दर्जाचे तांत्रिक आणि यांत्रिक कौशल्य आवश्यक आहे. सर जगदीशचंद्र बोस यांनी त्यांच्या प्रयोगशाळेतील वनस्पतींच्या छोट्याशा पानांकडून निसर्गाची रहस्ये समजून घेण्यासाठी जितकी एकाग्रता वापरली तशा एकाग्रतेची आवश्यकता आहे.' [३]

आणखी एका ठिकाणी ते म्हणतात, 'माझ्या कल्पनेतील योजनेअनुसार आपल्याकडे भरपूर उत्तमोत्तम ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि संशोधन संस्था असाव्यात. त्या अंतर्गत आपल्याकडे केमिस्ट, अभियंते आणि इतर तज्ज्ञांची फौज

असली पाहिजे. ते राष्ट्राचे खरे सेवक असतील आणि लोकांच्या विविध आणि वाढत्या गरजांना उत्तरे देतील. त्यांनी मिळवलेले ज्ञान ही सर्वांची सार्वजनिक मालमत्ता असेल.'[४]

ते वैज्ञानिकांना राष्ट्राचे खरे सेवक म्हणतात आणि लोकांच्या विविध आणि वाढत्या गरजांसाठी वैज्ञानिक उपाय देतील, असे सांगतात. यातले शेवटचे वाक्य महत्त्वाचे आहे. शास्त्रज्ञ आणि संशोधनाच्या संस्था कशासाठी? 'त्यांनी मिळवलेले ज्ञान ही सार्वजनिक मालमत्ता असेल,' हे गांधीजींचे वक्तव्य प्रचलित बौद्धिक संपदा हक्क आणि पेटंटपेक्षा अगदी वेगळे आहे. प्रचलित पद्धतीअनुसार शास्त्रज्ञांचे ज्ञान हे त्यांची वैयक्तिक मालमत्ता मानले जाते. गांधीजींच्या दृष्टीने विज्ञानाचा आणि संशोधनाचा उद्देश आणि त्यातून निर्माण झालेल्या ज्ञानाची मालकी हे प्रचलितापेक्षा वेगळे आहे.

ते म्हणत, ''माझे आश्रम हे गावासाठीच्या आणि सामाजिक पुनर्रचनेच्या प्रयोगशाळा झाल्या पाहिजेत.'' ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशनची स्थापना केली. या असोसिएशनच्या सल्लागार मंडळातील सर सी.व्ही. रमण, जगदीशचंद्र बोस आणि पी.सी. रे ही तीन नावे तुमच्या चांगल्याच परिचयाची असतील. हे त्या काळातले भारतातील तीन सर्वोत्तम शास्त्रज्ञ होते. त्यांना गांधीजींनी त्यांच्या ग्रामोद्योगाच्या सल्लागार मंडळावर काम करण्यासाठी आमंत्रित केले.

नंतर गांधीजींनी 'सत्याग्रही वैज्ञानिक' असा अतिशय अर्थपूर्ण शब्द तयार केला. त्यांचा आदर्श विधायक कार्यकर्ता, स्वातंत्र्य सैनिक, राजकीय कार्यकर्ता किंवा आश्रमवासी हा 'सत्याग्रही वैज्ञानिक' असावा; असे त्यांना वाटत असे. त्याचा अर्थ काय होता? तर कार्यकर्ता हा सत्याग्रही असावा, म्हणजेच सत्याचा अहिंसक साधक असावा, पण त्याच सोबत, त्याची वृत्ती, त्याच्या पद्धती, आणि प्रयोग हे वैज्ञानिक असले पाहिजेत, अशी त्यांची धारणा आहे. १९४० मधील व्यक्तिगत सत्याग्रह चळवळीसाठी त्यांनी केलेली पहिल्या सत्याग्रहीची निवड अतिशय महत्त्वाची होती. त्यांनी जवाहरलाल नेहरूंना देशाचे पहिले सत्याग्रही म्हणून निवडले नाही. तर त्यांची पहिली पसंती विनोबा भावे यांना होती. त्या वेळी विनोबा फारसे प्रसिद्ध नव्हते. पण त्यांनी विनोबांची निवड केवळ त्यांच्या आध्यात्मिक गुणांसाठीच नव्हे तर त्यांच्या वैज्ञानिक वृत्तीसाठीही केली. विनोबांनी खादी आणि चरख्यावर अभूतपूर्व काम केले होते.

एका घटनेतून गांधींबद्दल आणि त्यांनी विनोबांची निवड करण्याबद्दल बरेच काही लक्षात येईल. खादीतील सूतकताई करणाऱ्या 'कत्तिन' कामगारांनी त्यांची मजुरी अत्यंत तुटपुंजी असल्याची तक्रार महात्मा गांधींकडे केली. खादी ही यंत्रनिर्मिती नव्हती, त्यामुळे आर्थिक दृष्ट्या तसे होणे साहजिकच होते. त्यात हाताने कताई आणि विणकामाचा समावेश होता. त्यामुळे उत्पादनाचा वेग कमी होता. पण प्रत्येकाला खादी परवडली पाहिजे म्हणून कापडाच्या किमती कमी ठेवाव्या लागत. त्यामुळे मजुरीचा दर कमी होता. पण जेव्हा मजुरांनी तक्रार केली तेव्हा गांधीजी म्हणाले की, आपण मजुरांवर अन्याय करू शकत नाही. म्हणून त्यांनी विनोबांना बोलावून खादीतील मजुरांसाठी किमान वेतन सुचवण्यास सांगितले. विनोबांनी थोडा वेळ मागून घेतला.

विनोबा सहा महिन्यांनी परत आले, तेव्हा त्यांचे वजन ३० पौंडांनी कमी झाले होते. ते पाहून गांधीजींना काळजी वाटली. त्यांनी विचारले, 'विनोबा, काय झालंय?' तेव्हा विनोबा म्हणाले – 'मी गेले सहा महिने फक्त सूतकताई हेच काम करतोय. आपण स्पिनरला जे वेतन देतो त्या दराने मी दररोज दोन आणे कमवू शकतो आहे. (दोन आणे म्हणजे रुपयाचा आठवा भाग) या दोन आण्यांत जेवढे अन्न येईल, तेवढ्यातच मी माझी भूक भागवतो. सध्याच्या वेतनामुळे माझे हे असे झाले आहे.'

विनोबांनी स्वतःवरच प्रयोग केला होता; ते स्वतःच एक प्रयोगशाळा बनले होते!

थोडक्यात, गांधींनी त्यांच्या रचनात्मक कार्यात उत्साहाने आणि उदार मताने विज्ञान, वैज्ञानिक पद्धती आणि शास्त्रज्ञांचे स्वागत केले आणि त्यांचा उपयोग केला. आणि लक्षात घ्या, त्यांचे रचनात्मक कार्य त्यांच्यासाठी खूप महत्त्वाचे होते. त्यांनी इतरत्र म्हटल्यानुसार 'अखेर रचनात्मक कार्यक्रमांची परिपूर्णता म्हणजे स्वराज्य, स्वातंत्र्य आणि स्वायत्तता.'

### गांधीजी वैज्ञानिकांपेक्षा निराळे कसे होते?

मग, ते शास्त्रज्ञांपेक्षा कोणत्या अर्थाने वेगळे होते? आपल्यापेक्षा कोणत्या बाबतीत वेगळे होते? गफलत करू नका. गांधीजींकडे वैज्ञानिक दृष्टिकोन होता किंवा त्यांनी

विज्ञानाचा उपयोग केला म्हणून ते महान ठरत नाहीत. आपण सगळे ते करतोच, पण त्यामुळे आपण गांधी बनत नाही. विज्ञानाचा वापर तर सगळे करतात, ते तर सामान्य आहे. गांधीजींचे वेगळेपण कशात होते?

एक म्हणजे, विज्ञान कोणत्या उद्देशासाठी उपयोगात आणले जाते तो उद्देश हा विज्ञानाचे मूल्यमापन करण्याचा त्यांचा मापदंड होता. विज्ञानाला अर्थपूर्ण हेतू असायला पाहिजे, असे त्यांना वाटत असे. ते काय म्हणतात बघा. ''आधुनिक शास्त्रज्ञांमध्ये धगधगत असणाऱ्या संशोधन वृत्तीला मी नम्रपणाने वंदन करतो. त्या संशोधन वृत्तीशी माझे भांडण नाही. पण त्या वृत्तीने जी दिशा निवडली आहे त्याविरुद्ध माझी तक्रार आहे. कारण ते आपल्या ग्राहकांच्या निव्वळ ऐहिक प्रगतीला कारणीभूत असलेल्या निसर्गनियमांचा आणि पद्धतींचा शोध घेण्यात गुंतलेले आहेत.''[५]

गांधीजी वैज्ञानिकांची आणि त्यांच्या वैज्ञानिक वृत्तीची प्रशंसा करतात. परंतु त्यांची कौशल्ये आणि ज्ञान ते केवळ ग्राहकांच्या भौतिक प्रगतीसाठी वापरत आहेत, याबद्दल त्यांची तक्रार आहे. गांधीजींच्या मते हा खूप संकुचित आणि उथळ उद्देश होता. बरेचदा, विज्ञान त्यांच्या हातातले एक साधन बनते– ज्यांच्या हाती भांडवल असते. तिथे विज्ञान नफा कमविण्याचे यंत्र बनते. किंवा सरकारच्या हातात ते जुलूम आणि विनाशाचे हत्यार बनते. त्यामुळे बऱ्याचदा विज्ञान आणि वैज्ञानिकांमुळे भांडवलदार किंवा सरकार जास्त बलवान बनतात. पण विज्ञान हे सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक न्यायाचे साधन व्हायला पाहिजे, असे गांधीजींना वाटत असे. ते म्हणतात, ''जोपर्यंत तुम्ही लावलेल्या सर्व शोधांमुळे गरिबांचे कल्याण होत नाही, तोपर्यंत तुमच्या प्रयोगशाळा सैतानाच्या कार्यशाळेपेक्षा काही वेगळ्या नसतील.''[६]

जनतेचे कल्याण हाच अंतिम उद्देश असला पाहिजे, असे त्यांचे मत होते. ते सांगताना गांधीजी जराही सौम्य शब्द वापरत नाहीत. ते स्पष्टपणे म्हणतात की, 'असे केले नाही तर तुमच्या सर्व प्रयोगशाळा सैतानाच्या कार्यशाळांपेक्षा वेगळ्या नसतील.' ते आपल्याला अशा हादरवणाऱ्या शब्दांनी फटकवतात. आपले विज्ञान, प्रयोगशाळा, वैज्ञानिक कारकिर्द कोणत्या उद्देशाने वापरली जात आहे हे तपासण्यास ते आपल्याला भाग पाडतात.

गांधी वेगळे होते. कारण त्यांनी विज्ञानाला सुखभोग व नफावृद्धीऐवजी सामाजिक परिवर्तन आणि न्यायाचे साधन मानले.

स्वच्छता आणि शौचालयांची साफसफाई यांचे उदाहरण पाहू या. १९१४ मध्ये गांधीजी भारतात आले तेव्हा उच्च वर्गाच्या किंवा वर्णाच्या व्यक्ती शौचालयाकडे पाहतदेखील नसत. समाजातील तथाकथित 'घाणेरड्या' म्हणजे भंगी लोकांकडून साफ केली जाणारी ती घरातील सर्वांत घाण जागा होती. गांधींनी आपल्या आश्रमात शौचालय स्वच्छ करण्याची प्रथा सुरू केली. प्रथम त्यांनी स्वतः ते काम केले आणि मग ती एक सामान्य प्रथा बनवली. शौचालय स्वच्छ करण्यासाठी त्यांनी विज्ञानाचा अवलंब केला.

अशा प्रकारे, त्यांनी स्वच्छता साधली, आरोग्य प्राप्त केले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जातिभेदापासून मुक्त होण्यासाठी एका मोठ्या सामाजिक सुधारणेला सुरुवात केली. स्वतःच्या शौचालयाची स्वच्छता सुरू करणारे आणि त्यातून सार्वजनिक आंदोलन उभारणारे ते पहिले राजकीय नेते असावेत. अगदी जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद आणि वल्लभभाई पटेल हेदेखील जेव्हा त्यांच्या आश्रमात येत असत तेव्हा त्यांना स्वतःची शौचालये स्वच्छ करावी लागत असत. गांधींच्या ह्या भंगीमुक्ती चळवळीत महाराष्ट्रातील भावे, बापट आणि पटवर्धन या ब्राह्मणांनीही स्वतःचीच नव्हे तर इतरांचीही शौचालये साफ करण्यास सुरुवात केली.

महाराष्ट्रातले आप्पा पटवर्धन नावाचे एक गृहस्थ गांधींच्या चळवळीत सामील झाले. ते सुवर्णपदक विजेते पदवीधर ब्राह्मण होते. त्यांना जेव्हा तुरुंगात टाकण्यात आले; तेव्हा ते ब्राह्मण असल्यामुळे इंग्रजांनी त्यांना शौचालय स्वच्छ करण्याचे काम दिले नाही. कारण तुरुंगाच्या नियमानुसार ब्राह्मणांना असे हलक्या दर्जाचे काम देता येत नसे. पण आप्पा पटवर्धन म्हणाले, ''मी गांधींचा सैनिक आहे. स्वतःचे शौचालय स्वच्छ करणे हे माझ्या आयुष्यातील एक धर्मकार्य आहे. तुम्ही मला भंगीकामाची परवानगी दिलीच पाहिजे. ते माझे स्वातंत्र्य आहे.'' ब्रिटिश सरकारने त्याला नकार दिल्याने त्यांनी उपोषण केले. लक्षात घ्या, भंगीकामासाठी उपोषण करणारा ब्राह्मण! शेवटी ब्रिटिश सरकारला माघार घ्यावी लागली. अशा प्रकारे गांधींनी शौचालयांची स्वच्छता या कार्यातून 'स्वच्छ भारत' हे उद्दिष्ट तर साधलेच, पण जातिभेदाचा अडथळाही पार केला. ही क्रांती होती!

गांधीजी आणखी एका बाबतीत वेगळे होते. त्यांनी

विज्ञानाला नैतिकतेची कसोटी लावली. वैज्ञानिक प्रगतीमुळे युरोपच्या नैतिकतेमध्ये किंचितही भर पडलेली नाही. त्यामुळे समाजातला द्वेष आणि अन्याय कमी झालेला नाही.[७] असे त्यांचे म्हणणे होते.

युरोपमधील तत्कालीन विज्ञान, आज आपण ज्याला अमेरिकन विज्ञान म्हणू त्यावर गांधीजी अशी टीका करताहेत की, विज्ञानाच्या प्रगतीमुळे युरोपची नैतिक पातळी मुळीच उंचावली नाही. त्यामुळे द्वेष आणि अन्याय कमी झाला नाही; म्हणजे गांधीजींची अशी अपेक्षा आहे की विज्ञानामुळे समाजातला द्वेष, अन्याय कमी व्हावा आणि नैतिक दर्जा उंचावला जावा.

त्यांची तक्रार आहे की, विज्ञान तसे करत नाही. गांधीजी विज्ञानाला नैतिक कसोटी लावतात. या दृष्टीने विज्ञान आणि वैज्ञानिक, किमान त्या काळी तरी अपयशी ठरले होते. आज त्यांची कामगिरी कशी आहे, त्याबद्दल आपल्याला आत्मपरीक्षण करावे लागेल.

जिवंत प्राण्यांचे विच्छेदन ही गांधींच्या दृष्टीने विज्ञानाच्या नैतिकतेची एक कसोटी होती. शरीरशास्त्र किंवा प्राणिशास्त्राच्या ज्ञानासाठी ते आवश्यक मानले जात असे. गांधीजींना त्यांच्या किशोर वयात डॉक्टर व्हायची इच्छा होती. पण त्यांनी ते करिअर निवडले नाही. याचे एक कारण म्हणजे त्या काळी वैद्यकीय प्रशिक्षणात जिवंत प्राण्यांचे विच्छेदन आवश्यक मानले जाई; (त्यानंतर ऐंशी वर्षांनी मी मेडिकल शिक्षण घेतले तेव्हाही ते कायम होते. तो एक निर्दय, घृणास्पद अनुभव होता.) आणि गांधीजींचे मन त्याविरुद्ध बंड करून उठले. गांधीजींचा विरोध दोन कारणांसाठी होता. अगदी प्राण्यांच्या आतील गोष्टींचे ज्ञान मिळवण्याच्या हेतूनेही जिवंतपणी विच्छेदन करायला त्यांचा विरोध होता. प्राण्यांना होणाऱ्या वेदना, दुःख आणि मृत्यू हे एक कारण होते.

पण दुसरे कारण म्हणजे जिवंत प्राण्याच्या विच्छेदनाचे क्रूर कृत्य करण्यामुळे शास्त्रज्ञावर होणारा परिणाम. जरी ते फक्त बेडूक, ससा, माकड, गिनीपिग असे प्राणी असले तरीही! त्यांना मारण्याचे कृत्य हे मानवावर केल्या जाणाऱ्या क्रूरतेपेक्षा आणि मानवाची हत्या करण्यापेक्षा काही फार निराळे नाही. गांधींनी व्हिव्हिसेक्शनचे समर्थन केले नाही, किंबहुना सक्रियपणे त्याचा विरोधच केला, कारण त्यामुळे वैज्ञानिकाच्या मानवी हृदयात क्रौर्याला प्रोत्साहन मिळते.

आज प्राण्यांवरील क्रूरतेच्या विरोधात जागतिक चळवळ उभी राहिली आहे. पण शंभर वर्षांपूर्वी नेहरू, ऑल्डास हक्सले किंवा मेघनाद साहांसारखे विज्ञानवादी लोक गांधींना हसायचे. ते कदाचित म्हणत असतील की– अरे, हा माणूस विज्ञानविरोधी आहे, त्याला विच्छेदन नकोय, तो वैज्ञानिक कुतूहलाला मान्यता देत नाही! गांधीजी मृतदेहांच्या विच्छेदनाच्या विरोधात नव्हते, परंतु ते जिवंत प्राण्यांच्या विच्छेदनाच्या विरोधात होते. त्यांच्यासाठी हा नैतिकतेचा प्रश्न होता, त्यांच्या दृष्टीने विज्ञान हे नैतिकतेपासून दूर असू शकत नाही.

**तुम्हाला काय वाटते?**

आपल्यासारखे विज्ञानवादी लोक आणि गांधी यांच्यात आणखी एक मोठा फरक आहे. विज्ञान हे स्वभावत:च काहीसे संकुचित म्हणजे reductionist आहे. शास्त्रज्ञाला ज्या गोष्टीचा सखोल अभ्यास करायचा असेल त्यावर तो आपल्या संशोधनाच्या साधनांसह सूक्ष्मपणे लक्ष केंद्रित करतो. त्यामुळे काय होते?

एकदा मी एक व्यंगचित्र पाहिले होते. एक शास्त्रज्ञ गॅलरीत दुर्बीण घेऊन बसला आहे. आकाशात कुठे तरी धूमकेतू उगवणे अपेक्षित आहे. त्यामुळे धूमकेतू उगवण्याच्या दिशेचा अंदाज घेऊन शास्त्रज्ञाने आपली दुर्बीण त्या दिशेने केंद्रित केली आहे. तो वाट पाहतोय आणि दुर्बिणीतून आकाशाच्या एका अरुंद कोनातील भागाचे लक्षपूर्वक निरीक्षण करतोय. तेवढ्यात घरातील मोलकरीण चहाचा कप घेऊन येते आणि ती मोकळ्या आकाशाकडे पाहते. ती दुसरीकडे कुठे तरी बोट दाखवते आणि म्हणते, ‘अरेच्या, तो पाहा धूमकेतू!’ शास्त्रज्ञ चुकला आहे, कारण त्याने फारच कमी भागावर लक्ष केंद्रित केले आहे. ती मोलकरीण कदाचित अशिक्षित असेल, पण ती संपूर्ण आकाश पाहते आहे. म्हणून धूमकेतू इतरत्र उगवताना तिला दिसू शकतो.

गांधीजी संपूर्ण आकाश पाहतात. संपूर्ण सत्य पाहतात. त्यांना फक्त एक संकुचित चित्र दिसत नाही, जीवनाचे एक खंडित दृश्य दिसत नाही. ते जीवनाकडे एकात्मिक सत्य म्हणून पाहतात. इथे प्रत्येक गोष्ट इतर सर्व गोष्टींशी जोडलेली आहे. त्यांनी खादीला प्रोत्साहन दिले होते तेच उदाहरण पाहा. खादी शेतकऱ्याच्या कापसाला बाजारपेठ उपलब्ध करून देते, सूतकताई करणाऱ्याला आणि विणकराला मजुरी देते, स्थानिक उत्पादन आणि वापराला प्रोत्साहन देते. म्हणजे स्वदेशी, आणि स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देते.

खादी उच्च वर्गातील लोकांना गरीब लोकांच्या जवळ आणते. एका खादीमधून ते एकाच वेळी अनेक परिणाम साधतात. असा त्यांचा एकात्मिक, सर्वांगीण दृष्टिकोन आहे.

**ईश आवास्यं इदं सर्वम्**

गांधीजी आणि आपल्यासारख्या विज्ञानवादी लोकांमधला आणखी एक फरक म्हणजे गांधींसाठी काहीही जड नाही! काहीही नुसतेच भौतिक, निर्जीव, मृत नाही. विश्वातील प्रत्येक गोष्ट जीवनतत्त्वाने व्यापलेली आहे.

एकदा महात्मा गांधी अलाहाबादला गेले, तेव्हा जवाहरलाल नेहरूंनी त्यांना घरी जेवायला बोलावले. जेवण आटोपल्यानंतर हात धुण्यासाठी स्वतः जवाहरलाल गांधीजींच्या हातावर पाणी ओतत होते. त्याच वेळी ते आपसांत कोणत्या तरी राष्ट्रीय मुद्द्यावर बोलण्यात गढून गेले होते. गांधीजींचे हात धुण्याचे काम पूर्ण झाले तरीही जवाहरलाल मात्र गांधीजींच्या चेहऱ्याकडे बघत हातांवर पाणी ओतत राहिले.

महात्माजी म्हणाले, 'जवाहर, तू पाणी वाया घालवतो आहेस.'

जवाहरलाल थट्टेने म्हणाले, 'बापू, हे अलाहाबाद आहे. येथे गंगा आणि यमुना वाहतायत. पाण्याची काही कमतरता नाही.'

त्यावर गांधीजींचे उत्तर होते, 'होय जवाहर, गंगा आणि यमुना इथे वाहतात, पण त्या तुझ्यासाठी वाहत नाहीत!'

इथे त्यांनी जवाहरलालना आठवण करून दिली की, पाणी हा एक भौतिक पदार्थ जरी असला तरी त्यांना पाण्याचा एक थेंबदेखील वाया घालवण्याचा अधिकार नाही. इथली प्रत्येक गोष्ट पवित्र आहे. 'ईश आवास्यम् इदं सर्वम्'. इथली प्रत्येक गोष्ट परमात्म्याने, सत्य तत्त्वाने भारलेली आहे. हा त्यांचा दृष्टिकोन आपल्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा आहे. आपण प्रत्येक गोष्टीकडे फक्त निर्जीव वस्तू म्हणून, जड म्हणून पाहतो. पण गांधीजी प्रत्येक भौतिक गोष्टीकडे पवित्र आणि ईश्वरमय म्हणून पाहतात. अशा प्रकारे, गांधीजींचे मोठेपण विज्ञानाच्या कक्षेबाहेर स्थित आहे. त्याला नैतिकतेचे परिमाण आहे.

या नैतिक परिमाणाचा सारांश केवळ दोन शब्दांत सांगायचा तर- सत्य आणि अहिंसा. शंभूप्रसाद यांनी हे अतिशय छान मांडले आहे ते म्हणतात, 'त्यांचा विज्ञानावर मोठा विश्वास असला, तरी या विश्वातील विज्ञानाची भूमिका काय असावी, याबद्दल त्यांना स्पष्टता होती. सत्य आणि अहिंसेपेक्षा त्यांनी विज्ञान वरचढ मानले नाही. अनेक तथाकथित वैज्ञानिक तथ्यांपेक्षा सत्य आणि अहिंसा त्यांच्यासाठी जास्त खरे होते.'[८]

त्यामुळे गांधीजींनी विज्ञानाचा जो उपयोग केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना, गांधीजींचे वैशिष्ट्य विज्ञानात नसून सत्य आणि अहिंसेत आहे- हे आपल्याला विसरून चालणार नाही. विज्ञान हे सर्वोच्च दैवत नाही, राम-सीतेच्या पायांशी बसलेला हनुमान आहे.

**गांधींचे सत्य आणि त्यांचे विज्ञान**

गांधीजींच्या अहिंसेचे आणि सत्याचे काय विज्ञान आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करू या.

'सत्य' या संकल्पनेत अंतर्निहित असलेले विज्ञान काय आहे? वैज्ञानिक आणि गांधीजी यांचे ध्येय समान आहे; दोघेही सत्याचा शोध घेत असतात. गांधीजींच्या दृष्टीने सत्य हेच जीवनाचे अंतिम ध्येय आहे. सुरुवातीला ते म्हणायचे, 'सत्य ईश्वराइतकेच महत्त्वाचे आहे'. नंतर ते म्हणू लागले, 'सत्य हे ईश्वरासारखे आहे'. शेवटी ते म्हणू लागले, 'सत्य हाच ईश्वर आहे'. काय विधान आहे! एक श्रद्धावान आणि धार्मिक व्यक्ती हे म्हणते आहे! यातून असा अर्थ होतो की, सत्याशिवाय दुसरा ईश्वर नाही.

सत्य हाच ईश्वर आहे. हीच गांधीजींची सत्याविषयीची भूमिका आहे.

जीवनातील भौतिक पैलूंचा शोध घेण्यासाठी गांधींनी तराजू, सूक्ष्मदर्शक आणि दुर्बिणीसारख्या वैज्ञानिक उपकरणांचा वापर केला. पण सत्याच्या नैतिक किंवा आध्यात्मिक पैलूंना स्पर्श करण्यासाठी त्यांच्याकडे दुसरी पद्धत होती. ती पद्धत कोणती होती? त्याविषयी त्यांनी १९२९ मध्ये बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांना काहीशी कल्पना दिली. ते त्यांना काय सांगतात ते पाहा- ''मी तुम्हाला सांगतो, तुम्ही अतिशय उत्तम वायरलेस साधन तयार करू शकता, पण त्यासाठी बाह्य संशोधनाची गरज नसून आंतरिक संशोधनाची आवश्यकता आहे. आंतरिकशी संबंध नसेल तर सर्व (बाह्य) संशोधन निरुपयोगी ठरेल.''[९] या आंतरिक संशोधनासाठी त्यांच्याकडे दुसरे एक साधन होते. ते काय होते?

राजगोपालाचारी यांच्याशी झालेल्या एका चर्चेदरम्यान त्यांनी सांगितले की, उपवासाच्या कलेमध्ये पारंगत

असलेली त्यांची आई त्यांना वैज्ञानिकासारखीच वाटते. का? तर, 'जो शुद्ध आहे, जो सत्याला चिकटून आहे आणि सत्यालाच चिकटून राहू इच्छितो तो एखाद्या भौतिक-शास्त्रज्ञाइतकाच वैज्ञानिक आहे.'[१०] भौतिकशास्त्रज्ञ अर्थातच सर्वांत शुद्ध वैज्ञानिक आहे, परंतु गांधी म्हणत आहेत की त्यांची आई जवळजवळ तशीच होती. कारण ती शुद्ध होती. उपवास करून तिने स्वतःला शुद्ध केले.

इथे आपल्याला गांधींच्या पद्धतीची थोडी झलक मिळते. सत्याचे आध्यात्मिक आणि नैतिक पैलू जाणून घेण्याची गांधींची पद्धत आत्मशुद्धी करण्याची होती. त्यांचे 'एकादश व्रत' हे अकरा नियम आणि अकरा प्रतिज्ञा यांनी बनलेले होते. हे सर्व आचार, मन आणि जीवन शुद्ध करण्यासाठी होते. याव्यतिरिक्त त्यांनी स्वतःला शुद्ध करण्यासाठी, स्वत:चे मन शुद्ध करण्यासाठी उपवासाचा उपयोग केला. आणि शेवटी येते प्रार्थना. प्रार्थना म्हणजे काय? तर 'माझ्या सामर्थ्याची एक मर्यादा आहे, जिच्या पलीकडे मी जाऊ शकत नाही;' ह्याची जाणीव व स्वीकृती म्हणजे प्रार्थना. म्हणून मी शरणागती पत्करतो, मी सत्याच्या प्रतीकाची, रामनामाची प्रार्थना करतो.

तुम्ही स्वतःला शून्य बनवू शकलात, तर तुमचा अहंकार शून्य होतो. आता तुम्ही सत्य जाणू, स्वीकारू शकता. तुमचे मन निर्मळ व तुमचे जीवन स्वच्छ व्हायला हवे. गांधींनी स्वतःला तसे बनवण्याचा प्रयत्न केला. मनाच्या त्या शुद्ध आणि स्वच्छ स्थितीत, तुमच्या अहंकारशून्य हृदयाच्या आरशात जे दिसते, ते नैतिक सत्याचे प्रतिबिंब आहे. गांधी याला 'आतला आवाज' म्हणतात. चौरीचौरा प्रकरणामुळे जेव्हा त्यांनी राष्ट्रीय आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला तेव्हा ते म्हणाले, ''माझा आतला आवाज मला सांगतो की तू चुकलास. संपूर्ण जग माझ्या विरोधात गेले तरी मी माझ्या आतल्या आवाजाचे अनुसरण करीन.'' तो आतला आवाज त्यांच्यासाठी ईश्वराचा संदेश किंवा विवेकाचा आवाज होता.

गांधींजी त्या सत्याशी एका विशिष्ट पद्धतीने संपर्क साधत असत. तो काही चमत्कार किंवा अपघात नव्हता, त्यांची एक पद्धत होती- तुमचे बोलणे शुद्ध असले पाहिजे, ते सत्य असले पाहिजे, वर्तन अहिंसक असले पाहिजे, तुम्ही ब्रह्मचर्य पाळले पाहिजे, शिस्तबद्ध आणि संयमी जीवन जगले पाहिजे. शरीरश्रम, उपवास, प्रार्थना आणि शेवटी ईश्वराला समर्पित होणे हे एक प्रकारे तुमच्या चश्म्याचे लेन्स साफ करण्यासारखे आहे. अशा निर्मळ अवस्थेत तुम्हांला सत्याचे दर्शन होते.

अर्थातच, हे आपल्याला समजत नाही. ते आपल्याला गूढ, अगम्य वाटते. आपल्याला मोजमापाच्या आणि पडताळणीच्या फक्त भौतिक पद्धती माहीत आहेत. आपले मन स्वच्छ करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करायचे नसतात. कशाला त्रास घ्यायचा? आपण आपले शरीर स्वच्छ करतो, पण आपले आचरण, आपले मन स्वच्छ करत नाही. म्हणून आतल्या आवाजासारख्या गोष्टींबद्दल बोलणाऱ्या गांधीजींना शास्त्रज्ञांनी आणि बुद्धिजीवी लोकांनी सोईस्करपणे अंधश्रद्धाळू असे लेबल लावले. आपण आतल्या आवाजाशी कनेक्ट होऊ शकत नाही, म्हणून आपण म्हणतो की कोणीच तसे करू शकत नाही. परंतु या विशिष्ट प्रकारच्या प्रक्रियेतून गांधीजी नैतिक आणि आध्यात्मिक सत्यापर्यंत पोहोचले, पोहोचू शकत होते.

**अहिंसेचे विज्ञान**

गांधींच्या मते अहिंसा हा सत्य जाणून घेण्याचा, सत्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग होता. तुम्ही सत्याची हिंसा करू शकत नाही; तुमच्या इच्छा, तुमचा अहंकार यांची सत्यावर जबरदस्ती करता येत नाही. हे वैज्ञानिकाने आपल्या डेटाशी वस्तुनिष्ठ असण्यासारखे आहे. जर तुम्ही तुमच्या डेटाची हिंसा केलीत तर तुम्हांला सत्य जाणून घेण्याची आशा धरता येणार नाही. जीवनाचे शास्त्रज्ञ असलेल्या गांधीजींसाठी सत्यापर्यंत पोहोचण्याकरता अहिंसा अत्यंत आवश्यक होती. अगदी राजकीय आणि सांसारिक जीवनातही.

आज आपण गांधींना त्यांच्या अहिंसेसाठी, त्यांच्या सत्याग्रहासाठी स्मरतो. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या राजवटीविरुद्ध, भारतातील इंग्रजांविरुद्ध, कलकत्ता येथील जातीय दंगलींविरुद्ध त्यांची अहिंसा अत्यंत प्रभावी ठरली. लॉर्ड माउंटबॅटनच्या शब्दांत सांगायचे, तर लष्कराची संपूर्ण कंपनी जे करू शकली नाही, ते या एका दुर्बल वृद्धाने साध्य करून दाखवले. सांप्रदायिक आगीने जळत असलेल्या कलकत्त्यात त्यांनी शांतता प्रस्थापित केली. मार्टिन ल्यूथर किंग यांनी गांधींच्या तत्त्वांचे अमेरिकेत अनुसरण केले. परिणामी एक काळा माणूस- बराक ओबामा अमेरिकेचा अध्यक्ष होऊ शकला. नेल्सन मंडेला यांनी गांधींचे अनुसरण केले आणि दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्य मिळवून दिले. या सर्वांनी महात्मा गांधींच्या अहिंसामार्गाचे अनुसरण केले.

अहिंसा माणसावर काय परिणाम करू शकते?

मी एकदा केपटाऊनजवळील रॉबिन आयलंडला गेलो होतो. इथे नेल्सन मंडेला यांना दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या सरकारने २७ वर्षे तुरुंगात ठेवले होते. नेल्सन मंडेला यांच्या मनात गोऱ्या लोकांविरुद्ध काय भावना असू शकेल, याची कल्पना करा. मी तुरुंग बघायला गेलो तेव्हा एक कृष्णवर्णीय माणूस माझा गाइड होता. तो नेल्सन मंडेलांसोबत आठ वर्षे तुरुंगात कैदी म्हणून राहिला होता. मी त्याला उत्सुकतेने विचारले, ''नेल्सन मंडेलांच्या व्यक्तिमत्त्वात विशेष काय होते? तुझ्यावर त्यांचा सर्वांत मोठा प्रभाव काय पडला?''

त्याने उत्तर दिले, ''नेल्सनचा माझ्यावर खोलवर प्रभाव पडला. त्याने मला गोऱ्या लोकांबद्दलच्या द्वेषातून मुक्त केले!''

**त्यांच्या अहिंसेने हे केले म्हणून मंडेला महान!**

ॲटनबरोच्या 'गांधी' चित्रपटातील धारासनामधील मिठाच्या सत्याग्रहाचे दृश्य विसरणे कठीण आहे. ब्रिटिश सैनिक सत्याग्रही स्त्री-पुरुषांना हत्यारांनी मारहाण करत आहेत. कवट्या फुटत आहेत, रक्त वाहत आहे, पण अहिंसक सत्याग्रही हातही उचलत नाहीत. ते उचलू शकतात, पण ते उचलत नाहीत. आणि त्याचा जागतिक प्रभाव निर्माण झाला. का? येशू ख्रिस्त म्हणाले की, जर कोणी तुमच्या एका गालावर चापट मारली तर दुसरा गाल पुढे करा. ती काही निव्वळ काल्पनिक गोष्ट नाही. अहिंसा प्रभावी ठरली त्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे आहेत. अहिंसा प्रभावी का ठरते असा प्रश्न पडतो.

**अहिंसेच्या मुळाशी असलेले विज्ञान कोणते?**

हा अनपेक्षित परिणाम समजून घ्यायचा असेल तर आपल्याला शास्त्रज्ञ म्हणून विचार करावा लागेल. प्रत्येकाच्या हृदयात प्रेम आणि कोमलता असते. हा निसर्गाचा सार्वत्रिक आविष्कार आहे. प्रसिद्ध शिकारी जिम कॉर्बेट याने एका प्रसंगाचे वर्णन केले आहे. एकदा तो जंगलातून चाललेला असताना, त्याला कोकराच्या बें...बें ओरडण्याचा आवाज ऐकू आला. ते कोकरू जंगलात हरवले होते; आईसाठी आवाज करत होते. कॉर्बेटने कोकरू पाहिले आणि त्याच वेळी त्याला एक वाघीण त्या चिमुकल्या, असहाय कोकरावर झेपावण्यासाठी तयारीत असलेली दिसली. जिम कॉर्बेटने वाघिणीवर बंदूक रोखली. वाघीण दबकत दबकत कोकराकडे जाऊ लागली. कॉर्बेट गोळीबार करायला सज्ज झाला होता. तेवढ्यात अचानक वाघीण थबकली, पूर्ण उभी झाली आणि सावकाश चालत कोकराजवळ गेली आणि त्याला चाटू लागली. ती थोडा वेळ त्याच्या सोबत खेळली आणि नंतर त्याला काहीही इजा न करता जंगलात गायब झाली. तुमच्यापैकी बऱ्याच जणांनी डिस्कव्हरी चॅनलवरही एका सिंहिणीला हरिणाच्या छोट्याशा पाडसाशी मैत्री करताना आणि त्याचे रक्षण करतानाचा असाच भाग पाहिला असेल. अत्यंत क्रूर प्राणीदेखील कोकरू किंवा पाडस यांच्याबद्दल प्रेमाची कोमल भावना प्रदर्शित करतात. ती नैसर्गिक कोमल भावना, ते प्रेम, प्रत्येकात निर्माण होते. हा अहिंसेच्या परिणामकारकतेचा आधार आहे.

अहिंसेच्या विरुद्ध हिंसेमध्ये काय होते? कोणीतरी तुम्हांला मारतो, त्यामुळे तुम्हांला राग येतो आणि तुम्ही उलटून परत मारता. ती प्रतिक्रिया मारण्यामुळे घडते. म्हणूनच गांधीजी म्हणतात की, डोळ्याच्या बदल्यात डोळा असा विचार केला तर लवकरच संपूर्ण जग आंधळे होईल.

हिंसेच्या विरोधात हिंसाच निर्माण होते. किंबहुना, हिंसा न्यूटनच्या तिसऱ्या नियमाचे पालन करते. 'प्रत्येक क्रियेसाठी तेवढीच- पण विरुद्ध प्रतिक्रिया असते'. भौतिकशास्त्राचा हा नियम मानवी मानसशास्त्राला लागू होतो. हिंसा हिंसाचाराला जन्म देते, क्रोधाने क्रोध उत्पन्न होतो, कडक शब्दांना तसेच कठोर उत्तर मिळते, म्हणजेच समकक्ष पण विरुद्ध प्रतिक्रिया. न्यूटनचा हा नियम अहिंसेने उलट दिशेने वळवता येतो. जर हिंसेतून हिंसा निर्माण होते, तर प्रेमाने प्रेम निर्माण केले पाहिजे. जर इतरांबद्दलच्या माझ्या आक्रमक हिंसक कृतीमुळे तेवढीच- पण विरुद्ध प्रतिक्रिया निर्माण होत असेल, तर माझ्या सौम्य कृतीमुळे प्रतिक्रियादेखील सौम्य येईल.

विनोबा भावे यांनी ते सुंदर रीतीने समजावून सांगितले आहे. समजायला कठीण असलेली ही संकल्पना जेव्हा ते समजावून सांगत होते तेव्हा माझ्या सुदैवाने मी तिथे हजर होतो. ते म्हणाले की, 'हिंसक युद्धात तुम्हांला अधिकाधिक विनाशकारी शस्त्रे वापरावी लागतात. अहिंसक संघर्षात याच्या उलट परिस्थिती असते. तुमचा प्रतिसाद सौम्यात सौम्य असावा म्हणजे हिंसाचाराचे चक्र खंडित होईल आणि तुम्हांला अधिक सौम्य परिणाम मिळतील.'

त्यांचे हिंदी शब्द होते 'सौम्य, सौम्य-तर और सौम्य-

तम'. हे अहिंसेचे शास्त्र आहे! जेव्हा तुम्ही नम्र आणि कोमल बनता, अधिकाधिक अहिंसक होत असता, तेव्हा विरुद्ध पक्षाकडून येणाऱ्या प्रतिक्रियेची तीव्रता कमी होत जाते. विनोबा पुढे म्हणतात, ''खऱ्याखुऱ्या अहिंसक स्थितीमध्ये कोणीही तुमचा प्रतिपक्षी नसतो, कोणीही तुमचा शत्रू नसतो''. जर तुमचे मन इतरांबद्दलच्या प्रेम आणि मैत्रीने भरलेले असेल तर कोणीही तुमचा शत्रू असूच शकत नाही. जर तुम्हांला इतरांविषयी, अगदी तुमच्या तथाकथित विरोधक किंवा शत्रूंबद्दलही प्रेम वाटत असेल, तर त्यातून प्रेमच निर्माण होईल इतके हे सोपे आहे. अहिंसेला कोणी शत्रू नाही, शत्रू तुमच्यात होता. हिंसेला प्रतिक्रिया हिंसक, अहिंसेला प्रतिक्रिया अहिंसक मिळेल. न्यूटनचा तिसरा नियम!

सत्य आणि अहिंसा या अत्यंत शक्तिशाली, अजिबात पराभूत न होणाऱ्या शक्ती आहेत. जेव्हा तुम्ही त्यांचे अनुसरण करता, जेव्हा तुम्ही सत्याचे अहिंसक साधक बनता, तेव्हा तुम्ही सत्याग्रही बनता. अहिंसेचा वापर करून सत्याचा आग्रह धरणारे, सत्याग्रही! म्हणूनच आपल्या कार्यकर्त्यांनी 'सत्याग्रही वैज्ञानिक' व्हावे अशी गांधींची

तिथे एकूण तीन वेगवेगळे गट होते. एक पर्यावरणवाद्यांचा होता. ते ग्लोबल वॉर्मिंगच्या विरोधात निषेध करत होते आणि क्योटो प्रोटोकॉलवर स्वाक्षरी करण्यासाठी ब्रिटिश सरकारला आवाहन करत होते. दुसरा शांततावादी गट होता. ते लोक इराकमधून सैनिक परत आणण्याचे आवाहन ब्रिटिश सरकारला करत होते. तिसरा गट ब्रिटिश मजुरांना जास्त मजुरी आणि कामाची चांगली परिस्थिती मिळावी म्हणून मागणी करत होता. तीन वेगवेगळ्या राजकीय गटांची वेगवेगळ्या मागण्यांसाठी ब्रिटिश संसदेसमोर निदर्शने सुरू होती. पण त्यांच्या मागे एकच भला मोठा सामायिक बॅनर होता. त्यावर लिहिले होते, Be the change yourself, that you wish to see in the world. (तुम्हांला जगात जो बदल पाहायचा आहे, तो तुम्ही स्वतःमध्ये घडवून आणा.) – महात्मा गांधी.



इच्छा होती. सत्याग्रही हा वैज्ञानिक असला पाहिजे आणि वैज्ञानिक हा सत्याग्रही झाला पाहिजे. सत्याग्रही म्हणजे सत्याचा आग्रह धरणारा. अर्थात दुराग्रह, असत्याचा आग्रह नको. अहंकार-आग्रह नको.

सत्याचा शोध घेण्यासाठी, वैज्ञानिक वृत्ती जोपासण्यासाठी आपल्याला अहिंसक असायला पाहिजे. इतरांच्या मतांविषयी आपल्यात खुलेपणा असला पाहिजे, सत्य स्वीकारले पाहिजे, आपल्या गृहीतकाचे खंडन आपण स्वीकारले पाहिजे. म्हणूनच सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी अहिंसा आवश्यक आहे. किंबहुना, अहिंसा हे मनाचे शास्त्र आहे, मनाच्या प्रतिक्रियेचे शास्त्र आहे. म्हणूनच गांधीजी म्हणतात, ''सत्य आणि अहिंसा हे डोंगराइतके प्राचीन आहेत.'' म्हणजे एक प्रकारे ते म्हणतात की, त्यांचा शोध मी लावलेला नाही; ते निसर्गाच्या नियमांवर आधारित आहेत. निसर्गात जशी हिंसा असते, तशीच अहिंसा आणि प्रेमही निसर्गात असतात.

माझ्या समजुतीअनुसार गांधीजींच्या अहिंसेच्या पद्धतींच्या मागे हे विज्ञान आहे.

**२१ व्या शतकात गांधींची समयोचितता**

आपण शेवटच्या प्रश्नाकडे येऊ. आपल्यासाठी २१व्या शतकात गांधीजी किती औचित्यपूर्ण आहेत?

एकविसाव्या शतकासमोर तीन जागतिक आव्हाने आहेत. भांडवलशाहीचे पाप, कमालीचा लोभ आणि प्रचंड आर्थिक आणि राजकीय विषमता. दुसरे, पृथ्वीला आलेला ताप. अतोनात उपभोगामुळे झालेला हवामान बदल, ग्लोबल वार्मिंग (जागतिक तापमानवाढ). आणि तिसरे, वांशिक आणि आंतरधर्मीय हिंसाचाराकडे नेणारा सांप्रदायिकतेचा शाप. ही तिन्ही मानव जातीसमोरील सर्वांत महत्त्वाची जागतिक आव्हाने आहेत. या प्रश्नांवर गांधीजी काय उपाय सुचवतात?

ही आव्हाने बाह्य आणि जागतिक असली तरी गांधीजींनी सुचवलेले उपाय हे आंतरिक आणि वैयक्तिक आहेत. आपण साधारणत: जागतिक समस्येसाठी जागतिक पातळीवरचे उपाय शोधतो. तसेच बाह्य समस्येसाठी आपण बाहेरचे स्पष्टीकरण आणि उपाय शोधतो. गांधीजी हास्यास्पद वाटतील इतके साधे आहेत; पण म्हणूनच ते निराळे आहेत. अद्वितीय आहेत. जागतिक समस्यांवर त्यांच्याकडे आंतरिक आणि वैयक्तिक स्वरूपाची उत्तरे आहेत.

भांडवलशाहीमधील लोभ आणि परिग्रह (अनावश्यक संग्रह) यावर त्यांचा काय उपाय आहे? सध्याच्या नफेखोर भांडवलवादी जगात लोभाला चांगले मानतात. एका हॉलीवूड चित्रपटात, (बहुधा 'वॉलस्ट्रीट'मध्ये) नायक म्हणतो, "Greed is good!" (लोभ चांगला असतो). जितका जास्त लोभ तितका नफा जास्त, संचय जास्त. अर्थातच त्यातून आर्थिक विषमता निर्माण होत राहते. आपण ऑक्सफॅमचा अहवाल पाहिला आहे; जगातल्या २% लोकांकडे जगातली ५०% संपत्ती आहे. भारतातील नऊ व्यक्तींकडे भारताच्या लोकसंख्येच्या अर्ध्याहून अधिक, म्हणजे सत्तर कोटी लोकसंख्येपेक्षा जास्त संपत्ती आहे. फक्त नऊ व्यक्ती! केवढी भयानक विषमता आहे!! असा समाज अनेकदा क्रूर, अलोकतांत्रिक आणि अस्थिर असतो. भांडवलशाहीचा हा अपरिहार्य शाप आहे.

यावर गांधींचा उपाय भांडवलदाराना किंवा त्या नऊ व्यक्तींना मारणे हा नाही. तर त्यावर त्यांचे एक उत्तर वैयक्तिक स्वरूपाचे आहे तो म्हणजे अपरिग्रह. अपरिग्रह म्हणजे शक्य तितक्या कमी गोष्टींचा संचय करणे, कमीतकमी गोष्टी बाळगणे. जैन धर्मातून, बौद्ध धर्मातून आणि पतंजल योगातूनही हे तत्त्व आले आहे. अपरिग्रह हा लोभाच्या म्हणजेच जास्तीतजास्त गोष्टी ताब्यात घेण्याच्या इच्छेच्या विरोधी तत्त्व आहे.

भांडवलशाहीच्या शापावर त्यांचा दुसरा उपाय म्हणजे ट्रस्टीशिप, विश्वस्त वृत्ती. तुमच्याकडे पुष्कळ भांडवल, पुष्कळ संपत्ती असली तरी तुम्ही स्वेच्छेने त्याचे विश्वस्त बनून सामाजिक हितासाठी त्याचा वापर केला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. गांधींच्या काळात डाव्या विचारसरणीने त्यांची खिल्ली उडवली, यात नवल नाही. 'भांडवलदार हा नरभक्षक वाघ आहे, तो कधीच विश्वस्त होणार नाही,' असे डाव्यांना वाटत असे. त्यांनी गांधींना आदर्शवादी बावळट ठरवले. किंवा त्याहूनही वाईट, 'बजाज आणि बिर्ला यांच्यासारख्या त्यांच्या भांडवलदार समर्थकांना गांधी पाठीशी घालत आहेत,' असेही म्हटले.

पण आता आपण पाहतो की बिल आणि मेलिंडा गेट्स, वॉरन बफे, अझीम प्रेमजी, टाटा आणि इतर अनेक जण आपली संपत्ती सामाजिक कामासाठी देत आहेत. एका विशिष्ट मर्यादेनंतर आपण संपत्तीतून कोणताही अतिरिक्त आनंद मिळवू शकत नसतो, हे त्यांच्या लक्षात आलेले दिसते. म्हणून ती संपत्ती इतरांसाठी वापरणे त्यांना चांगले,

समाधानकारक वाटत असणार. एक प्रकारे, गांधीजींनी मानवी मनाचे अचूक निदान केले होते.

अशा प्रकारे, भांडवलशाहीच्या आजारावर अपरिग्रह आणि विश्वस्त वृत्ती हे गांधींचे उपाय आहेत. ते मानवी मनाच्या सखोल आकलनावर आधारित आहेत. ते वैयक्तिक आणि आंतरिक आहेत तसेच ते वास्तवाला धरून आहेत. भांडवलशाहीचे दुष्परिणाम यावर गांधीजींचे अन्य उपाय आहेत- उत्पादन प्रक्रिया विकेंद्रित व शरीरश्रम आधारित करणे.

अपरिमित उपभोगामुळे खनिज इंधनाच्या वापरात कमालीची वाढ होते आणि जागतिक तपमानवाढ (ग्लोबल वार्मिंग) देखील होते. त्यामुळे मानवासह पृथ्वीवरील सगळी जीवसृष्टी नष्ट होऊ शकते. जणू काही यावर उपाय म्हणून गांधीजींनी माणसाच्या वागणुकीत एक सोपा बदल सुचवला तो म्हणजे शरीरश्रम. निसर्गाने मानवाला शरीर दिले आहे; त्याचा वापर आपण उत्पादक आणि उपयुक्त शारीरिक श्रमासाठी केला पाहिजे. याला गांधीजी पवित्र नैतिक कर्तव्य मानतात. तुम्ही दररोज शरीरश्रम केले पाहिजे. तुम्ही तुमची भाकरी शारीरिक कष्ट करून मिळवली पाहिजे, असे त्यांचे सांगणे आहे. ते याचे एक व्रत बनवतात, आचरणाचा नियम करतात. जर तुम्ही शारीरिक कष्ट करून जगत असाल तर तुम्ही परावलंबी होणार नाही. जर तुम्ही तुमच्या शरीराच्या श्रमाने जेवढे उत्पादन केले तितकाच उपभोग घेतला तर तुम्ही निसर्गाची मर्यादित संसाधने अनियंत्रित पद्धतीने वापरणार नाही.

गांधींच्या या उपायात अनेक संभाव्य परिणामांच्या शक्यता दडलेल्या आहेत. त्यामुळे लठ्ठपणावर (शारीरिक भांडवलशाही), आर्थिक विषमतेवर आणि अगदी वर्ण-वर्ग असमानतेवरदेखील काही प्रमाणात तोडगा निघू शकतो. शरीरश्रमाचे व्रत सर्वांना एकाच पातळीवर आणते. त्यामुळे खनिज इंधनाचा अतिरिक्त वापर कमी होतो.

सुख मिळवण्याच्या आपल्या अमर्याद इच्छेवर गांधीजी 'अ-स्वाद', हा उपाय सुचवतात. अ-स्वाद म्हणजे जिभेचे चोचले पुरवण्यापासून दूर राहणे. गीतेत म्हटले आहे, 'विषयातील जे भोग ते दुःखासचि कारण.' ऐंद्रीय सुखाच्या मागे न लागणाऱ्याला विवेकी म्हटले आहे. विवेकाने इंद्रियसुखाच्या इच्छांना लगाम घालणे. 'अ-स्वाद' व्रत ही त्याचीच साधना आहे. हे सर्व वैयक्तिक उपाय तुम्ही आणि मी; आपण सर्व जण अमलात आणू शकतो.

तिसरी जागतिक समस्या, सांप्रदायिक द्वेषाची जागतिक लाट आली आहे आणि परिणामी हिंसाचार होतो आहे. आंतरधर्मीय हिंसाचार, वांशिक हिंसाचार, दहशतवाद, तालिबान, बजरंग दल. या सर्वांवर उपाय बॉम्ब विरुद्ध बॉम्ब, किंवा बंदुकीच्या विरोधात बंदूक, किंवा मुर्दाबाद विरुद्ध झिंदाबाद नाही, तर प्रेम आणि अहिंसा हेच त्याचे समाधान आहे.

आजच्या या तीन तातडीच्या समस्या ह्या जागतिक आहेत. समस्या बाह्य असल्या तरी गांधीजींचे त्यावरचे उपाय आंतरिक आणि वैयक्तिक आहेत. म्हणूनच त्यांची सुरुवात स्वतःपासून होते.

काही वर्षांपूर्वी मी लंडनला एका आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी गेलो होतो. ती एक उच्च स्तरीय परिषद मानली जात होती. आम्हां प्रतिनिधींना प्रथम राणीच्या राजवाड्यात आणि नंतर संसदेत, हाउस ऑफ लॉर्ड्समध्ये नेण्यात आले. आमच्यासाठी रिसेप्शन होते. या सगळ्यांमुळे मी अस्वस्थ होतो. हे माझे नेहमीचे जग नव्हते. आम्ही ब्रिटिश संसदेच्या इमारतीतून बाहेर आलो, तेव्हा समोरच्या मोकळ्या जागेत काही लोक निदर्शने करताना दिसले. मला स्वाभाविकतः त्यांच्याशी जवळीक वाटली. म्हणून मी शिष्टमंडळ सोडले आणि त्या निषेध करणाऱ्यांच्या जवळ गेलो. तिथे एकूण तीन वेगवेगळे गट होते. एक पर्यावरणवाद्यांचा होता. ते ग्लोबल वॉर्मिंगच्या विरोधात निषेध करत होते आणि क्योटो प्रोटोकॉलवर स्वाक्षरी करण्यासाठी ब्रिटिश सरकारला आवाहन करत होते. दुसरा शांततावादी गट होता. ते लोक इराकमधून सैनिक परत आणण्याचे आवाहन ब्रिटिश सरकारला करत होते. तिसरा गट ब्रिटिश मजुरांना जास्त मजुरी आणि कामाची चांगली परिस्थिती मिळावी म्हणून मागणी करत होता. तीन वेगवेगळ्या राजकीय गटांची वेगवेगळ्या मागण्यांसाठी ब्रिटिश संसदेसमोर निदर्शने सुरू होती. पण त्यांच्या मागे एकच भला मोठा सामायिक बॅनर होता. त्यावर लिहिले होते, Be the change yourself, that you wish to see in the world. (तुम्हांला जगात जो बदल पाहायचा आहे, तो तुम्ही स्वतःमध्ये घडवून आणा.) - महात्मा गांधी.

मला असे वाटले की, मृत्यूनंतर साठ वर्षे उलटून गेल्यावरदेखील हा म्हातारा आजही ब्रिटिश संसदेसमोर उभा राहून जागतिक शक्तींना आव्हान देत होता. तो आम्हांला आवाहन करत होता, 'तुम्ही जगात जो बदल पाहू इच्छिता,

त्याची सुरुवात स्वत:पासून करा.' तुम्हांला शब्दांच्या मागे धावण्याची गरज नाही, तुम्हांला इतरत्र जाऊन युद्धे लढण्याची गरज नाही. जागतिक धोरणे आणि राजकीय, आर्थिक व्यवस्था बदलेपर्यंत तुम्हांला प्रतीक्षा करण्याची गरज नाही. बदलाची सुरुवात स्वतःपासून इथे आणि आत्ताही होऊ शकते. गांधीजी आपल्याला तत्काळ क्रांती देतात! म्हणूनच ते आजही अतिशय औचित्यपूर्ण ठरतात!

**सारांश**

'महात्मा गांधी व विज्ञान' यांचे संबंध समजून घेण्याच्या या प्रयत्नांत आपल्याला असे आढळते की, गांधीजी विज्ञानविरोधी होते हा समज निराधार आहे. दुसरा महत्त्वाचा निष्कर्ष असा आहे की, शास्त्रीय ज्ञान आणि कार्यपद्धती तसेच प्रयोगशीलता यांचे ते प्रखर समर्थक व अनुयायी होते. तिसरे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी भौतिक विज्ञानाच्या पद्धतींना नैतिकतेच्या कसोटीची जोड दिली. जिवंत प्राण्यांचे शरीर-विच्छेदन असो की प्रचंड प्रमाणात उत्पादन किंवा विनाश करण्याच्या पद्धती असोत – त्यांनी प्रत्येक गोष्ट नैतिकतेच्या कसोटीवर पारखली. गांधींजींचे अद्वितीय सामर्थ्य, त्यांची महानता विज्ञानाचा वापर करण्यामध्ये नाही. विज्ञानाचा वापर करणे तर सर्वसामान्य आहे. त्यांची महानता त्यांच्या नैतिकतेमध्ये होती. ते त्यांचे वैशिष्ट्य होते.

सत्य आणि अहिंसा ही त्यांची दोन प्रमुख नीतितत्त्वे होती. सत्य हेच त्यांच्यासाठी अंतिम होते. ही एका वैज्ञानिकाची निष्ठा आहे. नैतिक सत्य जाणून घेण्यासाठी गांधींनी अत्यंत संवेदनशील आणि विशुद्ध, परंतु व्यक्तिनिष्ठ आणि विवेकपूर्ण पद्धत वापरली. त्यांचे अहिंसेचे तत्त्व एक प्रकारे न्यूटनच्या भौतिकशास्त्राच्या तिसऱ्या नियमाशी सुसंगत आहे. ते सखोल मानसशास्त्र आहे, तरीही ते न्यूटनच्या नियमानुसारदेखील आहे.

२१ व्या शतकातील तातडीच्या तीन जागतिक समस्यांसाठी गांधीजी वैयक्तिक आणि नैतिक उपाय सुचवतात. गांधी आणि विज्ञान यांच्या संबंधाचा शोध घेताना आणि २१व्या शतकातील गांधीजी किती समयोचित आहेत ते समजून घेतानाही आपल्याला हेच आढळते.

शेवटी आता परत 'टाइम'च्या संपादकांच्या मूळ दुविधेकडे वळू या. 'टाइम'ने २०व्या शतकातील सर्वांत प्रभावी व्यक्ती म्हणून अल्बर्ट आइनस्टाईन यांची निवड केली. पण अल्बर्ट आइनस्टाईनने स्वत:च या प्रश्नाचे उत्तर गांधींच्या मृत्यूनंतर दिले होते. ते म्हणाले होते, ''असा एक हाडामांसाचा प्रत्यक्ष माणूस या पृथ्वीतलावर कधी चालला होता यावर भावी पिढ्यांचा विश्वास बसणार नाही.''

हीच महात्मा गांधींना खरी श्रद्धांजली आहे. आजवरच्या सर्वांत महान वैज्ञानिकाने त्याच्या काळातील सर्वांत महान माणसाला केलेला सलाम!

एका अर्थाने, 'टाइम'चे बरोबर होते. जर अल्बर्ट आइनस्टाईन ही २० व्या शतकातील सर्वांत लोकप्रिय व्यक्ती असेल, तर मी म्हणेन- महात्मा गांधी हे २१ व्या शतकातील सर्वांत प्रभावशाली व्यक्ती असतील.

(अनुवाद : **वंदना खरे**)

**डॉ.अभय बंग,** गडचिरोली, search.gad@gmail.com

**संदर्भ**

१. मेघनाद साहा; शंभूप्रसाद, इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली, (२००१) यांनी उद्धृत केलेले.
२. महात्मा गांधी; टिब्बिया कॉलेज, नवी दिल्लीचे उद्घाटन. १९२१ (Collected Works (CW), १९ : ३५७-३५८)
३. महात्मा गांधी; (CW ५९ : १२७)
४. महात्मा गांधी; (CW ७३ : २७०)
५. महात्मा गांधी; (CW १९ : ३५७-३५८)
६. महात्मा गांधी; (CW ३४ : १५६-५७)
७. महात्मा गांधी; (CW १२ : १४६; १६ : १०६-०८ आणि १८ : २३५-३६)
८. शंभूप्रसाद; (EPW, 2001, p. 3732)
९. महात्मा गांधी; (भारतीय विज्ञान संस्था, बंगलोर १९२७)
१०. महात्मा गांधी; (CW ५५ : ४४१)

(१९३४ मध्ये इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्स या संस्थेची स्थापन नोबेलविजेते भारतीय वैज्ञानिक सी.व्ही. रमण यांनी केली. मागील जवळपास नऊ दशके ही संस्था इतर अनेक प्रकारचे अभ्यास व संशोधन यासोबतच, 'विज्ञान आणि समाज' या विषयांवर व्याख्यानमाला आयोजित करते. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी 'फ्रंटिअर्स ऑफ ह्युमॅनिटी' या विषयावरील व्याख्यानमालेत रामचंद्र गुहा, अनिल गुप्ता आणि डॉ. अभय बंग या तिघांची इंग्रजीत ऑनलाईन व्याख्याने झाली. त्यातील डॉ. बंग यांचे इंग्रजी भाषण kartavyasadhana.in वर २ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रसिद्ध केले आहे. मात्र त्याचा मराठी अनुवाद प्रथमच प्रसिद्ध होत आहे. गांधीजींनी सुरू केलेल्या सेवाग्राम येथील शाळेत शालेय शिक्षण व बालपण गेलेल्या आणि गांधीजींच्या विचारानेच शोधग्रामची उभारणी करून गेली पस्तीस वर्षे आरोग्याच्या क्षेत्रांत कार्यरत असलेल्या डॉ. बंग यांचे हे भाषण विशेष मननीय आहे. ... संपादक)



BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
(SCHEDULED BANK)
Enjoy New Reduced Rates
on BCCB Retail Loans
Home Loan 6.90%
Car Loan 8.00%
Ornament Loan 8.00%
Solar Loan 8.50%
MSME Loan 8.75%
Education Loan 9.00%
Household Appliances & Furniture Loan 9.00%
Agricultural Loan 9.50%
PMLN Loan 10.00%
Cash Credit / Bill Discounting 10.00%
BDLN Loan 10.25%
Personal Loan 11.00%
* T & C Apply # If the Cibil Score is Above 700
# # If the Cibil Score is Above 700 & Principal Borrower is women
Head Office : Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy, Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra
Board Lines : 9527441600 / 9527451600 / 9527461600 / Toll Free : 1800-266-2407 | www.bccb.co.in

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 24-1-2022/ Date of Publication : 24-1-2022

सेवाग्राम कलेक्टिव्ह आणि साधना प्रकाशन यांचा संयुक्त प्रकल्प

तीन खंडांचा संच ९०० रुपये
पोस्टाने हवे असल्यास १०५० रुपये

# गांधींविषयी

संच उपलब्ध झाला...

संपादक मंडळ

किशोर बेडकिहाळ, अशोक चौसाळकर, रमेश ओझा, सुगन बरंठ, रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ, प्रदीप खेलुरकर, विजय तांबे


खंड १

गांधी : जीवन आणि कार्य
संपादक : किशोर बेडकिहाळ
(२४ लेख, पृष्ठे ५५०,
किंमत ५५० रुपये)


खंड २

गांधीविचार आणि
समकालीन विचारविश्व
संपादक : अशोक चौसाळकर
(३२ लेख, पृष्ठे ४५०,
किंमत ४५० रुपये)


खंड ३

गांधी : खुर्द आणि बुद्रुक
संपादक : रमेश ओझा
(२० लेख, पृष्ठे ३००,
किंमत ३५० रुपये)

या तीन खंडांमध्ये मिळून ७६ लेख आहेत, ते साधना, नवभारत, समाजप्रबोधन पत्रिका, गांधीमार्ग इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत किंवा वेगवेगळ्या पुस्तकांतून घेतलेले आहेत. १९१५ ते २०१५ या शंभर वर्षांत लिहिले गेलेले हे लेख पुढील ४३ लेखकांचे आहेत (अर्थातच काहींचे लेख एकापेक्षा अधिक आहेत)

लोकमान्य टिळक, रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, आचार्य विनोबा भावे, आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, आल्डस हक्सले, रावसाहेब पटवर्धन, ना. ग. गोरे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मे. पुं. रेगे, वसंत पळशीकर, नलिनी पंडित, इंदुमती केळकर, अम्लान दत्त, राम जोशी, मधु दंडवते, दि.के. बेडेकर, गं.बा. सरदार, वि.स. खांडेकर, गो.म. कुलकर्णी, कुमार गंधर्व, फक्रुद्दीन बेन्नूर, भागवत क्षीरसागर, नरहर कुरुंदकर, पन्नालाल सुराणा, नरेंद्र चपळगावकर, सुरेश द्वादशीवार, सु. श्री. पांढरीपांडे, गणेश देवी, रामदास भटकळ, यशवंत सुमंत, अशोक चौसाळकर, किशोर बेडकिहाळ, प्रभाकर नानावटी, रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ, पराग चोळकर, भारती पाटील, राजेश्वरी देशपांडे, चैत्रा रेडकर, नीलकंठ लोखंडे, माधव चोंडे, श्याम पाखरे.

**दर्जेदार निर्मिती व हार्डबाऊंड अशा तिन्ही खंडांची** एकूण किंमत १३५० रुपये
प्रकाशनपूर्व सवलतीत ९०० रुपये । पोस्टाने घरपोच हवे असल्यास १०५० रुपये

शेजारील QR code स्कॅन करून google pay अथवा phone pay द्वारे रक्कम भरून बुकींग करता येईल.

खालील पत्त्यावर रोख/चेकद्वारे रक्कम पाठवून बुकिंग करा.
साधना प्रकाशन 431, शनिवार पेठ, पुणे 411030
sadhana.prakashan@gmail.com
Ph. 020 24459635, Mob.7058286753